

# महाराष्ट्राचे जिल्हे

## ठाणें

REFBK-0028954

प्रसिद्धि विभाग महाराष्ट्र सरकार मुंबई

# महाराष्ट्राचे जिल्हे

## ठाणें

REFBK-0028954

REFBK-0028954

किंमत २५ नये पैसे

महाराष्ट्र सरकारच्या प्रसिद्धि विभागाचें प्रकाशन

# अनुक्रमणिका


| अनुक्रम | प्रकरणाचें नांव | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | पौराणिक व ऐतिहासिक पार्श्वभूमि | ५ |
| २ | भौगोलिक रचना | ९ |
| ३ | शेती | १८ |
| ४ | शैक्षणिक प्रगति | ३७ |
| ५ | स्थानिक स्वराज्य संस्था | ४४ |
| ६ | वैद्यकीय सोयी आणि सार्वजनिक आरोग्य | ६३ |
| ७ | उद्योगधंदे व कारखाने | ७० |
| ८ | देवस्थानें, तिर्थयात्रेचीं ठिकाणें व ऐतिहासिक स्थळें | ७४ |
| ९ | येथील आदिवासी | ७८ |
| १० | कोणाकडे कशाची चौकशी करावी | ८३ |


मुखपृष्ठावरील रेखाचित्र–नावेच्या साह्यानें खाडयांतून लांकडें वाहून नेण्यांत येत आहेत.

# ठाणें जिल्हा

## पौराणिक व ऐतिहासिक पार्श्वभूमि

ठाणें जिल्ह्याला अत्यंत उज्ज्वल अशी पौराणिक व ऐतिहासिक परंपरा आहे. जिल्ह्यांतील डहाणू, पालघर, वसई, वाडा, जव्हार व भिवंडी यांचा उल्लेख पूर्वी " अपरान्त " प्रदेश म्हणून केला जात असे.

जिंकलेली पृथ्वी काश्यप ऋषींना दान केल्यावर स्वत: परशुरामाला राहावयास जागाच शिल्लक राहिली नाहीं. नेमक्या ह्याच वेळीं एकाएकीं प्रचंड धरणीकंप झाला. समुद्रांतून एक प्रदेश(भू–प्रदेश)बाहेर आला. तो म्हणजेच आजचा ठाणें जिल्हा. परशुरामावर संतुष्ट होऊन समुद्रानें केलेलें हें उदार दान म्हणजे ठाणें जिल्ह्याची भूमि होय. त्या वेळेपासून ह्या भू–प्रदेशावर मानवी वस्तीस प्रारंभ झाला, अशी पौराणिक आख्यायिका आहे.

**धरणीकंपांतून निर्माण झालेला जिल्हा**

पांडव वनवासांत असतांना त्यांनीं या भागांत आश्रय घेतला. त्यावेळीं ह्या अपरान्त ( पश्चिमेकडील टोळांचा प्रदेश ) प्रदेशाची राजधानी "शूर्पारक" म्हणजेच हल्लींचें सोपारा, ही होती.

**सोपरा हेंच शूर्पारिक**

**सहसा जामदग्नस्य सोपारान्तो महाविलम् ।**

वनवासांत असतांना पांडव शूर्पारक तीर्थावर आले व किनाऱ्यापासून आंत गेल्यावर तपस्वी ब्रा ह्मणांनीं गजबजलेली परशुरामाची वेदी त्यांनीं अवलोकन केली. त्या ठिकाणीं पांडवांना वसु,

अश्विनीकुमार, यश, सूर्य, इन्द्र, विष्णू, शंकर, आदि देवतांचीं सुंदर मंदिरें आढळलीं. तेथून पांडव परत शूर्पारक तीर्थावर गेले.

**परशुरामाचें मन्दिर**

वज्रेश्वरीला लागूनच जो डोंगर आहे, त्याला आसपासचे लोक मद्राग्नि किंवा मंदाग्नि असें म्हणतात. यावरून प्राचीन काळीं येथें ज्वालामुखी असावा असें दिसतें. याच डोंगरशिखरावर भस्म सांपडतें. ह्या डोंगरांत परशुरामाचें एक मंदिर आहे.

**बौद्ध भिक्षूंचा प्रवेश**

अशी थोर परंपरा असलेल्या या भूमींत इ. स. पूर्वीं तिसऱ्या शतकांत अशोकाच्या कारकिर्दींत बौद्ध धर्मीयांनीं प्रवेश केला, आणि आपला पंथ स्थापन करण्यास प्रारंभ केला. त्यामुळें परशुरामाची अनुयायी प्रजा दक्षिणेकडे सरकूं लागली व त्यांनीं चिपळूणला वसाहत केली. पुढें बौद्ध भिक्षूंनीं या भागांत बराच जम बसविला. शूर्पारक येथें असलेला बौद्धांचा प्रचंड स्तूप व त्यावर असणारा अशोकाचा शिलालेख हे याची साक्ष देत आहेत.

**सोपारा व्यापारी गांव**

शूर्पारक किंवा सोपारा हें त्यावेळीं व्यापारधंद्यासाठीं फार प्रसिद्ध असावें. येथून परदेशांशीं व्यापार चालत असावा. प्रसिद्ध तत्त्ववेत्ता टॉलेमी यांच्या ग्रंथांत या प्रदेशाचा उल्लेख आहे. यावरून डहाणू सोपारा व कल्याण हा भाग त्याकाळीं अत्यंत भरभराटीस आला असावा असें दिसते. त्या वेळीं तेथें कोण राजा राज्य करीत होता हे नक्की सांगतां येत नाहीं. तथापि आंध्र, भृत्य, अमीर इत्यादि राजांचें राज्य या भागांवर कांहीं काळ असावें. इतिहासावरून असें आढळतें कीं, इ. स. ५ व ६ व्या शतकांत मौर्य राजे येथें राज्य करीत असावेत. पुढें इ. स. ८०० पासून १२६० पर्यंत शिलाहर वंशांतील राजांनीं येथें राज्य केलें. हे शिलाहर राजे चालुक्य व राष्ट्रकूट राजांचे मांडलीक होते. या वंशाच्या कारकीर्दींतच या प्रदेशावर बिंब राजांनीं स्वारी केली. त्या वेळीं त्यांच्या लष्कराचा तळ ज्या ठिकाणीं असायचा त्याला "स्थानक" असें म्हणत. महत्वाच्या सर्व घडामोडी पुढें स्थानकावरच घडूं लागल्यानें येथें वस्ती वाढली. तेंच आजचें ठाणें होय. याच ठिकाणाहून महामंडलेश्वर अपराजित देव यानें भूदान ( सफाळेंपासून २॥ मैल ) हें गांव दान दिल्याचा ( शके ९१९ ) ताम्रपट उपलब्ध आहे. यापुढें "स्थानक" ( ठाणें शहर ) या अपरान्त प्रदेशाची राजधानी झाली. अलवरूणीनें ( इ. स. ९७३–१०४८ ) स्थानक ही कोंकणची राजधानी केली. पुढें इ. स. १२६० च्या सुमारास शिलाहर वंश नष्ट झाला व देवगिरीच्या यादवांचा अंमल येथें सुरूं झाला; आणि जिल्ह्याचा कांहीं भाग बहामनी राज्याच्या आधिपत्याखालीं गेला. पोर्तुगीज लोक यानंतर गोवा सर करून उत्तरेकडे सरकण्याचा प्रयत्न करूं लागले. इ. स. १५०९ मध्यें गुजरातचा सुलतान महमूद यानें चौल येथें पोर्तुगीजांचा पराभव केला. पण पोर्तुगीजांनीं पुन्हा स्वारी करून १५३६ मध्यें या मुलुखाचा कबजा मिळविला. इ. स. १५७० मध्यें विजापूरकरांनीं हा प्रदेश जिंकून घेतला.

**वसईची मोहीम**

शिवशाहीच्या काळांत कल्याण, भिवंडी, मुरबाड वगैरे पूर्वभाग मराठ्यांकडे होता. तर समुद्र किनाऱ्याचा पश्चिम भाग पोर्तुगीजांच्या ताब्यांत होता. सन १७३० च्या सुमारास पोर्तुगीजांनीं साष्टी बेट हस्तगत केलें व इ. स. १७३४ सालीं ठाणें येथें एक किल्ला बांधला. पुढें मराठ्यांनीं वसईची मोहीम सुरू करून शके १६५९ ( इ. स. १७३७ ) मध्यें साष्टीस वस्ती केली. चिमाजी आप्पानें साष्टी बेट घेऊन ठाणें शहरांत प्रवेश केला. त्यानंतर इ. स. १७३९ मध्यें मराठ्यांनीं वसई घेतल्यावर सबंध ठाणें जिल्ह्याचा भाग मराठ्यांच्या संपूर्ण ताब्यांत आला. इ. स. १७७४ सालीं राघोबाला मदत करण्याच्या आमिशानें इंग्रजांनीं साष्टीचा किल्ला सर

केला आणि पुढें सालबाई येथें झालेल्या तहांत इंग्रजांनीं धूर्तपणें शिंद्यांना मध्यस्थी करून भडोच शहर व दुसरा नऊ लाखाचा मुलुख त्याला देऊन त्याच्या बदली साष्टी बेट लुबाडलें. इ. स. १८०२ सालीं, वसई येथें बाजीरावानें इंग्रजांच्या हातावर राज्याचें उदक सोडलें व त्यानंतर ठाणें जिल्ह्याचा सर्व भाग इ. स. १८१८ सालीं इंग्रजांच्या ताब्यांत गेला.

---

# स्वाभाविक रचना



# भौगोलिक रचना

ठाणें जिल्ह्याचें क्षेत्रफळ ३,७२९ चौरस मैल आहे. जिल्ह्याच्या उत्तरेस नगर हवेली व सुरत जिल्हा आहे. दक्षिणेस कुलाबा आणि बृहन्मुंबईची अफाट उपनगरें येतात. पूर्वेकडे पश्चिम घाट असून पश्चिमेकडे अरबी समुद्र पसरला आहे.

**अकरा तालुके**

या जिल्ह्याची विभागणी ठाणें, भिवंडी, आणि डहाणू या तीन मुलकी प्रांतांत करण्यांत आली आहे. त्यांत भिवंडी, कल्याण, वाडा, शहापूर, डहाणू, जव्हार, मुरबाड, पालघर, वसई आणि मोखाडा महाल असे एकंदर अकरा तालुके आहेत. शिवाय नुकतेच तळाश्री ह्या भागाचें महालांत रूपांतर करण्यांत आलें.

**लोकसंख्या**

नुकत्याच पार पडलेल्या १९६१ च्या शिरगणतीनुसार या जिल्ह्याची लोकवस्ती १६ लाख ५३ हजार ३२७ इतकी असल्याचें आढळून आलें. यामध्यें ८ लाख ६२ हजार ४२५ पुरुष व ७ लाख ९० हजार ९०२ स्त्रिया आहेत. पुरुषांमध्यें ३ लाख ५४ हजार ५९५ पुरुष साक्षर आहेत व स्त्रियांमध्यें १ लाख ५१ हजार ७४ स्त्रिया साक्षर आहेत. म्हणजे एकूण लोकसंख्येपैकीं ५ लाख ५ हजार ६६९ लोक साक्षर आहेत.

ठाणें जिल्ह्याची जमीन मध्यम प्रतीची आहे. पिकांना पुरेसा पाऊस पडतो. मुंबईसारखी फार मोठी बाजारपेठ या जिल्ह्याला जवळ आहे. त्यामुळें जिल्ह्यांत अनेक प्रकारचे उद्योगधंदे चालतात.

**हवामान**

वर्षांतील सहा महिने ह्या जिल्ह्याची हवा दमट असते. इतर ऋतूंत हवामानांत फारसा फरक पडत नाहीं. उन्हाळ्यांत नैऋत्य मान्सून वारे वाहतात. या वाऱ्यांमुळें हवा थंड राहते. जिल्ह्यांतील पावसाचें सरासरी प्रमाण ८० ते ९० इंच आहे. हा पाऊस मुख्यत्वें नैऋत्य मान्सून वाऱ्यांमुळें पडतो. पर्जन्यवृष्टी अविरत असल्यानें शेतीचें बरेंच नुकसान होतें. थंडीच्या दिवसांत हवा उबदार असते. परन्तु मध्य भागांत उन्हाळ्यांत खडक व जमीन तापते. त्यामुळें उन्हाळा बराच भासतो. थंडीच्या दिवसांत बरीच थंडी असते. पूर्वेकडील सह्याद्रि पट्टींत ह्या थंडीची फारच जाणीव होते. जिल्ह्याचा कांहीं भाग जंगलानें व्यापला आहे. शिवाय बराच प्रदेश सपाट असल्यामुळें पावसाच्या पाण्याचा ताबडतोब निचरा होत नाहीं.

ठाणें जिल्ह्यांत उल्हास, वैतरणा, तान्सा, भातसा, सूर्या, वरोळी, मुरबाडी आणि काळू या नद्या आहेत.

**नद्या व तलाव**

ठाणें तालुक्यांत पोखरण, विहार व तुळसी हे तलाव व शहापूर तालुक्यांत तान्सा तलाव आहे. हल्ली वैतरणा नदीस धरण बांधून त्याचें पाणी तानसा तलावांत सोडलें आहे. वैतरणा, तान्सा व तुळशी या तलावांचें पाणी नळांनीं नेऊन मुंबईस पुरविलें जातें. मुरबाड, भिवंडी व कल्याण येथेंही लहान तलाव आहेत. बऱ्याच ठिकाणीं विहिरींचें व नद्यांचें पाणी रहाटाच्या व इंजिनच्या सहाय्यानें पंपानें काढतात. त्याचा उपयोग शेतीस व बागायतीस करतात.

**दळणवळणाचीं साधनें**

या जिल्ह्यांत दळणवळण जलमार्ग, रेल्वे, व पक्क्या सडका अशा तीन मार्गांनीं होतें.

या जिल्ह्याला रेल्वे मार्गाचा चांगला फायदा मिळाला आहे. मध्य रेल्वे मुंबईपासून निघते. जिल्ह्याचें ठाणें हें मुख्य ठिकाण मुंबईपासून अवघ्या एक तासाच्या अंतरावर आहे. शिवाय मुंबईहून निघालेला हा रेल्वेमार्ग कल्याणपर्यंत जातो. त्या ठिकाणीं तिचे दोन फाटे होतात. एक फाटा अंबरनाथ या ठिकाणाकडे जातो व पुढें पुण्याकडे निघतो. दुसरा फाटा शहापूर कसाऱ्याकडून नासिककडे निघतो. पश्चिम रेल्वेच्या मार्गावर वसई, पालघर व डहाणू हीं तालुक्यांचीं ठिकाणें आहेत. पुढें तो सुरतेकडे जातो.

**रस्तें**

सरकार व स्थानिक संस्था यांच्या ताब्यांतील रस्त्यांची लांबी अंदाजे एक हजार १७ मैल असून त्यापैकीं ९१० मैलांचे रस्ते खडीचे व १०७ मैल बिनखडीचे आहेत. उन्हाळ्यांत बैलगाड्यांचे कच्चे रस्ते उखडले जातात व पावसाळ्यांत कित्येकदां रस्त्यावरील वाहतुकही बंद पडते. शिरघाट व थळघाट यामधून मुख्य रस्ते सह्याद्रि ओलांडून पलीकडे जातात.

आग्रारोड ही मोठी सडक मुंबईहून ठाणें, भिवंडी, शहापूर, कसारा या गांवांवरून थळघाटांतून नाशिकवरून आग्र्यापर्यंत जाते. म्हणून या सडकेला आग्रारोड म्हणतात. मुंबई-पुणें-बंगलोर रोडहि या जिल्ह्यांतून जातो.

**भिवंडी–मुरबाड रोड–** हा रस्ता भिवंडी ते कल्याणवरून मुरबाडला व तेथून ठाणें घाटांतून पुणें जिल्ह्यांत जातो.

**भिवंडी–मोखाडे रोड–** ही सडक भिवंडीवरून वाडें, खोडाळे इकडे जाऊन पुढें मोखाड्यास मिळते.

**घोडबंदर रोड –** हा रोड ठाण्याहून घोडबंदरला जातो.


**ठाणें–मोखाडे रोड –** ठाण्याहून आशागड, कासें व जव्हारहून मोखाड्यास जातो. हा पुढें नाशिकला जोडला जाणार आहे.

**पालघर–वाडे रोड –** हा रस्ता पालघर, मनोर ते वाडे इथपर्यंत जातो.

**वसई अंबाडी रोड –** हा रस्ता वसईहून मांडवी, पारोळ व वज्रेश्वरीवरून आंबाडीकडे जातो.

याशिवाय अनेक लहान–लहान सडका आहेत.

# दळणवळणाचीं साधनें



राष्ट्रीय मार्ग
रेल्वे
मोटार रस्ते
कच्ची सडक
रेल्वे स्टेशन
बंदर
तालुक्याची सरहद्द
संजाणा
डहाणू
तारापूर
अशेरी
जव्हार
मोरवाडा
शिरघाट
खोंडाळे
मनोर
पालघर
माहीम
कसारा
इगतपुरीकडे
वाडे
दातिवरे
वसई
शहापूर
भिवंडी
बोरीवली
ठाणें
कल्याण
मुरबाड
मुंबईकडे
पनवेलकडे
पुण्याकडे

ठाणें जिल्ह्याचा समुद्रकिनारा व सातपाटी, दातिवरें, मनोर, वसई, ठाणें, कल्याण येथील खाड्यांत पडाव व मचवे यांनीं मालाची ने–आण होते. डहाणू, सावटे, तारापूर, माहीम, मनोर, दांतिवरें, वसई, भाईंदर, ठाणें, कल्याण हीं बेटें मालाच्या वाहतुकीसाठीं प्रसिद्ध आहेत.

**समुद्राजवळचा भाग**

जिल्ह्याची एकूण जमीन २४,४१,५७४ एकर असून त्यापैकीं फक्त ११,२३,८८४ एकरच पिकाखालीं आहे. ९,६६,८९४ एकर जमीन जंगलव्याप्त असून बाकी राहिलेलें क्षेत्र पिकास उपलब्ध नाहीं. जिल्ह्याचें मुख्य पीक भात असून एकूण पिकाऊ जमिनीपैकीं ५० टक्के जमीन या पिकाखालीं येते. भाताच्या खालोखाल या जिल्ह्यांत वैरणीचें पीक काढण्यांत येतें. पालघर, डहाणू या ठिकाणीं गवत व वाळलेली वैरण यांचा व्यापार चालतो.

**पिकाखालील जमीन**

वसई, पालघर आणि डहाणू या ठिकाणीं किनाऱ्याजवळील तालुक्यांत फळफळावळ आणि भाजीपाला यांचें महत्त्वाचें उत्पादन होतें. फळांपैकीं महत्त्वाचें पीक केळ्यांचें असून तें मुख्यत्त्वें वसई तालुक्यांत होतें. जवळजवळ ३००० एकर जमीन या पिकाखालीं आहे. वसई तालुक्यांत नागवेलीची लागवडही मोठ्या प्रमाणांत केली जाते.

**जिल्ह्यांतील उत्पादन**

खनिज द्रव्यांच्या बाबतींत ठाणें जिल्हा फारसा समृद्ध नाहीं, पण प्रभुख आणि माहुली यासारख्या उंच टेकड्यांच्या कुरुंदाच्या खडकांत लोहाचे अवशेष सांपडतात. तसेंच जेथें कोळसा जाळण्यांत आला असेल तेथें लोहकणासारखे दिसणारे चिकण मातीचे गोळे आढळून येतात. कांहीं झऱ्यांतील पाण्यांतही लोहकण असल्याचें दिसतें. गंधक हें दुसरें खनिज द्रव्य असून भिवंडी तालुक्यांतील वज्रेश्वरी येथील गरम पाण्याच्या झऱ्यांत याचे गुणधर्म आढळून येतात. वसई तालुक्यांतील तुंगार टेकड्यांत चांगल्या प्रकारचें बॉक्साइट हें खनिज द्रव्य आढळून येतें.

**गरम पाण्याचे झरे**

जिल्ह्याच्या बहुतेक सर्व भागांत मध्यम आकाराचीं जंगलें असून त्यामध्यें साग व ऐन या झाडांचें प्रमाण अधिक आहे. याशिवाय खैर आणि शिसवीचीं झाडेंही आहेत. बऱ्याच ठिकाणीं चांगल्या प्रकारचा बांबू आढळून येतो. या जिल्ह्यांतील जंगलांत मूल्यवान अशीं झाडें आहेत. दोन रेल्वे स्टेशनें आणि एक बंदर याची सोय असल्यानें यांचें महत्त्व वाढत असून जंगलांतून निघणाऱ्या उत्पन्नाचा व्यापार वाढविण्यास व जिल्ह्यांतील कामगारांना हंगामी स्वरूपाचें काम देण्यास त्यांचा उपयोग होतो.

**जंगलें**

कलेक्टर हे जिल्ह्याच्या शासनयंत्रणेचे मुख्याधिकारी आहेत. जिल्ह्याचा कारभार सुव्यवस्थितपणें सांभाळण्याची फार मोठी जबाबदारी त्यांच्यावर असते. राज्यपालांचे प्रतिनिधि म्हणून ते काम पाहतात. स्वातंत्र्याच्या आधीं जिल्हाधिकाऱ्यांना केवळ जमीन महसूल, कायदा व सुव्यवस्था इतकेंच काम पाहावें लागत असे. आतां जिल्ह्यांतील निरनिराळ्या विभागांतील कामांत सूत्रबद्धता आणणें आणि जनतेच्या अडचणी समजावून घेऊन त्यांना मार्गदर्शन करणें, त्यांच्या आर्थिक व सामाजिक समस्या सोडविणेंहीं कामें त्यांना पार पाडावीं लागतत. जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठीं सरकारनें नियुक्त केलेल्या जिल्हा विकास मंडळाचे व ग्राम पंचायत मंडळाचें ते अध्यक्ष असतात. या मंडळावर सरकारी अधिकारी याखेरीज कांहीं समाजसेवकांची सदस्य म्हणून नियुक्ति करण्यांत येते. त्यांच्या सल्ल्यानें विकासाचीं कामें पार पाडली जातात.

**शासन यंत्रणा**

**विकास गट**

ठाणें जिल्ह्यांत शहापूर, मुरबाड, पालघर, डहाणू ( पार्ट ), वाडा डहाणू आणि जव्हार हे सात पहिल्या अवस्थेचे, कल्याण हा दुसऱ्या अवस्थेचा, मोखाडा हा विविधोद्देशीय व भिवंडी, ठाणें आणि वसई हें तीन पूर्व तयारी अवस्थेचे आणि तळाश्री हाट्रायबल असें एकूण तेरा विकास गट असून जिल्हा विकास मंडळाच्या मार्गदर्शनाखालीं हे गट विकासाचीं कामें करतात. जिल्हाधिकारी हे या मंडळाचे अध्यक्ष असल्यामुळें त्यांची या कामावर देखरेख असते.

**पंचायती**

जिल्ह्याची विभागणी बारा तालुक्यांत करण्यांत आली आहे. त्यांत एकूण ७७५ ग्रामपंचायती आहेत. पंचायत मंडळातर्फे दर वर्षी पंचायतींना जिल्हा व तालुका पातळीवर उत्तम कामगिरीबद्दल रोख रुपयांची पारितोषिकें देण्यांत येतात.

**जिल्हाधिकाऱ्याची जबाबदारी**

मुंबई कुळकायद्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यावरच असते. ‘ कसेल त्याची जमीन ’ या उद्दिष्टाला धरून तारीख १–४–५७ पासून जो कूळ कायदा लागू करण्यांत आला त्याची अंमलबजावणी त्यांनाच करावी लागते. जमीनदार व कूळ यामध्यें असलेले पूर्वापार संबंध तोडून जो कसतो तोच जमिनीचा मालक या तत्त्वानुसार कुळाला संरक्षण देऊन समाजांतील आर्थिक विषमता कमी करण्याचें कार्य त्यांना करावें लागते.

जिल्ह्यांतील दुष्काळाचीं चिन्हें आगाऊ जाणून घेऊन दुष्काळग्रस्त भागांत दुष्काळीं कामें काढून जनतेला काम देण्याची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांना पार पाडावी लागते.

जिल्ह्याच्या सरकारी पैशांचा व्यवहार सांभाळण्यासाठीं ट्रेझरी ऑफिसर असतात. त्यांच्यावर देखरेख करण्याचें काम कलेक्टर यांना करावे लागतें. ठाणें जिल्ह्याची मुख्य ट्रेझरी ठाणें येथें असून प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणीं सब ट्रेझरीची सोय आहे.

कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठीं व शांततारक्षणासाठीं उपाययोजना करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना असतो. त्यासाठीं त्यांना डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट म्हणून काम करावे लागते.

**मुलकी विभाग**

राज्यकारभार सुरळीत चालण्यासाठीं ठाणें जिल्ह्याचें, ठाणें, भिवंडी व डहाणू असे तीन मुलकी विभाग पाडण्यांत आले आहेत. ठाणें व भिवंडी प्रान्ताची कचेरी ठाणें येथें असून ठाणें प्रान्ताच्या अधिकाराखालीं ठाणें, कल्याण आणि मुरबाड हे तालुके व भिवंडी प्रान्ताच्या अधिकाराखालीं भिवंडी, शहापूर, वाडा आणि वसई हे तालुके येतात. मोखाडा प्रान्ताच्या अधिकाराखालीं फक्त मोखाडा हा एकच तालुका आहे. डहाणू प्रान्ताच्या अधिकाराखालीं पालघर, डहाणू, जव्हार व तळाश्री हे तालूकें येतात.

## मुलकी अधिकाऱ्यांचे अधिकार

प्रान्त अधिकाऱ्यांचीं मुख्य कामें व अधिकार खालीलप्रमाणें आहेत :

(१) पाटील नेमणुका करणें, (२) तलाठी नेमणुका करणें, (३) सरकारी पडिक जमिनी वांटणें, (४) सिटी सर्व्हेच्या हद्दीबाहेर पडणाऱ्या वर्ग एक गांवांतील शेतीची जमीन बिनशेतीच्या कामासाठीं देणें, (५) बैलासाठीं रुपये ५०० पेक्षां जास्त परंतु १००० किंवा त्याचे आंत व विहिरी साठीं २५०० रुपयांपर्यंत तगाई मंजूर करणें, (६) रेकॉर्ड ऑफ राईट व कूळ कायदा यांची अपिलें चालविणें वगैरे.

मामलेदारांचीं मुख्य कामें व अधिकार पुढील प्रमाणें–(१) कोतवालांच्या नेमणुका करणें, (२) सरकारी पडिक जमीन लागवडीस देणें, (३) वर्ग दोन मधील शेतीची जमीन बिनशेतीकडे वापरण्यास देणें, (४) वाहत्या पाण्याचा पिकासांठीं उपयोग करण्यास परवानगी देणें, (४) बैलासाठीं रु. ५०० व ताळीसाठीं रु. १००० पर्यंत तगाई मंजूर करणें, (६) गांवच्या हद्दपत्रकांतील नोंदी मंजूर करणें, (७) कूळ कायद्याखालील खटले चालविणें, (७) मामलेदार कोर्टस् अॅक्ट खालील खटले चालविणें, (९) कोर्टांकडून आलेल्या दरखास्तीची रक्कम वसूल करणें, (१०) सर्व तऱ्हेची सरकारी बाकी वसूली करणें.

नवीन विहिरीसाठीं मिळणारी तगाई डिस्ट्रिक्ट सेंट्रल को–ऑपरेटिव्ह लॅन्ड बँकेकडून मिळते. नव्या विहिरीसाठीं जास्तीत जास्त रु. २५०० व जुन्या विहिरींसाठीं जास्तीतजास्त १००० रुपये तगाई मिळते. अर्जाचे फॉर्मस् तलाठी अगर मामलेदार यांच्याकडे मिळतात. अर्जाची चौकशी मामलेदार यांच्या मार्फत होते.

**विकास गट अधिकाऱ्यांचें कार्यक्षेत्र**

ठाणें जिल्ह्यांतील प्रत्येक तालुक्यांत एक विकास गट अधिकारी आहे. त्याचीं मुख्य कामें पुढीलप्रमाणें आहेत.

(१) प्रत्येक गांवीं शाळा बांधणें
(२) प्रत्येक गांवीं एक सहकारी सोसायटी स्थापन करणें
(३) प्रौढांना साक्षर करण्यासाठीं वर्ग चालविणें
(४) तालुक्यांतील होतकरू विद्यार्थ्यांना धंदेशिक्षण देणें
(५) खेड्यांतील स्त्रियांना भरतकाम, शिवणकाम शिकवून सामाजिक सुधारणा करणें
(६) तालुक्याच्या ठिकाणीं शेतकरी संघामार्फत एक इमारत बांधून तालुक्यांत कामानिमित्त आलेल्या शेतकऱ्यांची राहाण्याची सोय करणें
(७) जमीन सुधारण्याकरितां सुधारलेलें बी–बियाणें ह्याचें वांटप करणें व जमीन आणि विहिरीकरितां तगाई देणें
(८) ग्रामपंचायतीच्या कारभारावर देखरेख ठेवणें व पंचायतींमार्फत गांवांत रस्ते दुरुस्ती, मोफत वाचनालयें, औषधोपचार, खत वगैरे गोष्टींची सोय करणें
(९) महिला मंडळ व भजनी मंडळ स्थापणें, खेड्यांतील लोकांना खेड्याबाहेरील जगाची कल्पना आणून देण्यासाठीं मधूनमधून सहली घडवून आणणें

**पोलीस यंत्रणा**

जनतेच्या जीविताची आणि वित्ताची सुरक्षितता कायम ठेवणें आणि कायद्याच्या मदतीनें सामाजिक जीवनांत शांतता ठेवणें हें पोलीस विभागाचें काम आहे. जिल्ह्यांतील पोलीस विभाग जिल्हा पोलीस प्रमुख (डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंट ऑफ पोलीस) यांच्या नेतृत्वाखालीं उपरोक्त कामगिरी पार पाडतो. जिल्हा पोलीस प्रमुखांची कचेरी ठाणें येथें आहे. त्यांच्या हाताखालीं असलेले अधिकारी आणि पोलीस दल यांच्यावर ते देखरेख ठेवतात. जनतेची सेवा करण्याच्या दृष्टीनें पोलिसांनीं काम करावें म्हणून ते पोलिसांवर एक प्रकारचें नियंत्रण ठेवतात. गुन्ह्यांना आळा घालणें आणि गुन्हे शोधून काढणें, तसेंच गुन्हेगारांना यथायोग्य सजा व्हावी म्हणून गुन्हेगारांवर खटले भरण्याचें कामहि पोलीस विभागाकडून पार पाडलें जातें.

कायदा आणि समाज जीवन सुरक्षित राहून वैयक्तिक स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठीं जिल्ह्यांतील दोन हजार ३६१ पोलीस शहरापासून ते थेट ग्रामीण पातळीपर्यंत सेवाकार्य करीत असतात.

**दारुबंदीसाठीं वेगळा विभाग**

दारुबंदीसाठीं पोलिसांचा वेगळा विभाग असून त्यावर ॲडिशनल डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडंट ऑफ पोलीस हे देखरेख करतात. दारुबंदीचे गुन्हे शोधून काढण्याच्या कामीं या पोलिसांना जिल्हा विकास मंडळाच्या दारुबंदी उपसमितीचे सदस्य मदत करतात. या विभागासाठीं दोन सब्इन्स्पेक्टर्स, आठ हेड कॉन्स्टेबल्स्, १८ कॉन्स्टेबल्स्, आठ महिला सर्चरस् आणि १२ हमालांची नियुक्ती करण्यांत आली आहे.

जिल्ह्यांतील पोलिसांच्या कार्याच्या सुलभतेसाठीं जिल्ह्यांत (१) भिवंडी विभाग, (२) डहाणू विभाग (३) कल्याण उपविभाग असे दोन विभाग आणि एक उपविभाग पाडण्यांत आले आहेत.

**भिवंडी विभाग**

ठाणें दारूबंदी विभाग

| | |
|---|---|
| ठाणें तालुका | ( पोलीस स्टेशन, ठाणें ) |
| मुंब्रा –आऊट पोस्ट | |
| बेलापूर–आऊट पोस्ट | |
| ठाणें शहर | ( पोलीस स्टेशन, ठाणें ) |
| शहापूर | ( पोलीस स्टेशन ) |
| कसारा–आऊट पोस्ट | |
| खर्डी–आऊट पोस्ट | |
| भिवंडी | ( पोलीस स्टेशन ) |
| विरार | ( पोलीस स्टेशन ) |
| आगाशी–आऊट पोस्ट | |
| मांडवी–आऊट पोस्ट | |
| वसई | ( पोलीस स्टेशन ) |
| माणिकपूर–आऊट पोस्ट | |
| भुईगांव–आऊट पोस्ट | |
| वाडा | ( पोलीस स्टेशन ) |
| गोऱ्हा–आऊट पोस्ट | |
| पडघा | ( पोलीस स्टेशन ) |
| पालखाना–आऊटपोस्ट | |
| वज्रेश्वरी–आऊट पोस्ट | |
| किनवली | ( पोलीस स्टेशन ) |
| डोलखांब–आऊट पोस्ट | |
| भाईंदर | ( पोलीस स्टेशन ) |
| उत्तान–आऊट पोस्ट | |

**डहाणू विभाग**

मोखाडा ( पोलीस स्टशन )

खोडाला–आऊट पोस्ट

पालघर ( पोलीस स्टशन )

बोईसर–आऊट पोस्ट

सफाळें–आऊट पोस्ट

माहिम–आऊट पोस्ट

विक्रमगड ( पोलीस स्टेशन )

तलवाडा–आऊट पोस्ट

मनोर ( पोलीस स्टेशन )

जव्हार ( पोलीस स्टेशन )

न्याहळा–आऊट पोस्ट

कासा ( पोलीस स्टेशन )

दुंडवली–आऊट पोस्ट

सावटे–आऊट पोस्ट

सायवन–आऊट पोस्ट

तलसारी ( पोलीस स्टेशन )

उद्वा–आऊट पोस्ट

वानगांव ( पोलीस स्टेशन )

चिंचणी–आऊट पोस्ट

डहाणू ( पोलीस स्टेशन )

मल्याण–आऊट पोस्ट

आशागढ–आऊट पोस्ट

धोलवड–आऊट पोस्ट

**कल्याण विभाग ( उपविभाग )**

डोंबिवली ( पोलीस स्टेशन )

चौला–आऊट पोस्ट

अंबरनाथ ( पोलीस स्टेशन )

मुरबाड ( पोलीस स्टेशन )

वैश्य खरे–आऊट पोस्ट

शिरोशी–आऊट पोस्ट

देहरी–आऊट पोस्ट

हील लाईन ( पोलीस स्टेशन )

बदलापूर–आऊट पोस्ट

विठ्ठलवाडी ( पोलीस स्टेशन )

शहद ( पोलीस स्टेशन )

कल्याण शहर ( पोलीस स्टेशन )

कल्याण तालुका ( पोलीस स्टेशन कल्याण )

बापसई–आऊट पोस्ट

महत्त्वाचे गुन्हे शोधून काढणें, त्यासंबंधीची माहिती गोळा करणें हीं कामें लोकल क्राईम् ब्रॅन्च-कडे सोंपविण्यांत आलेलीं आहेत. या विभागाचें कार्य जिल्ह्याच्या सर्व भागांत चालतें. राजकीय प्रश्नांसंबंधी माहिती गोळा करण्याची महत्त्वाची कामगिरी यांच्यावर सोंपवलेली आहे.

**न्यायदानाची व्यवस्था**

डिस्ट्रिक्ट अँड सेशन जज्ज हे जिल्ह्याचे मुख्य न्यायाधीश आहेत. त्यांचे कोर्ट ठाणें येथें आहे. दिवाणी आणि फौजदारी या दोन्ही प्रकारचे खटले आणि अपिलें यांच्या कोर्टांत चालतात. दिवाणी अधिकाराखालीं यांच्यापुढें जेव्हां खटला चालतो तेव्हां त्यांना डिस्ट्रिक्ट जज्ज म्हणतात. फौजदारी स्वरूपाचा खटला ज्यावेळीं ते ऐकत असतात त्यावेळीं त्यांचा दर्जा सेशन्स जज्ज हा असतो. खून, दरोडे, वगैरे सारख्या फौजदारी खटल्यांची प्राथमिक सुनावणी ज्युडिशिअल मॅजिस्ट्रेटच्या कोर्टांत होते. त्यानंतर मॅजिस्ट्रेट तो खटला सेशन्स कोर्टाकडे पाठवितो. जास्तींत जास्त मृत्यूची शिक्षा फर्माविण्याचा अधिकार सेशन्स कोर्टास असला तरी ही शिक्षा हायकोर्टाकडून कायम व्हावी लागते. ज्युडिशिअल मॅजिस्ट्रेटच्या निकालावर सेशन्स जज्जकडे अपील करतां येते.

जिल्हा न्यायाधीशांना मदत करण्यासाठीं ठाणें येथें त्यांच्या हाताखालीं दोन सहाय्यक न्यायाधीश आहेत. शिवाय जिल्ह्यांत खालीलप्रमाणें ज्युडिशियल मॅजिस्ट्रेटचीं न्यायालयें आहेत.

**न्यायालयें**

| | | |
|---|---|---|
| ठाणें | ३ | ( एक ज्यु. मॅ. ) |
| कल्याण | ५ | ( एक कोर्ट रेल्वेसाठीं ) |
| कल्याण कॅम्प | २ | ( एक कोर्ट दारूबंदीच्या खटल्यासाठीं, दुसरें इतर खटल्यासाठीं ) |
| शहापूर | १ | ( एक. ज्यु. मॅ. ) |
| मुरबाड | १ | ( एक. ज्यु. मॅ. ) |
| भिवंडी | २ | ( प्रत्येक कोर्टासाठीं एक ज्यु. मॅ. ) |
| जव्हार | १ | ( एक ज्यु. मॅ. ) |
| डहाणू | ३ | ( प्रत्येक कोर्टासाठीं एक ज्यु. मॅ. ) |
| पालघर | २ | ( प्रत्येक कोर्टासाठीं एक ज्यु. मॅ. ) |
| वसई | २ | ( प्रत्येक कोर्टासाठीं एक ज्यु. मॅ. ) |
| विरार | १ | ( एक ज्यु. मॅ. ) |
| वाडा | १ | ( एक ज्यु. मॅ. ) |

वरील सर्व कोर्टांत दारुबंदीचे खटलेहि चालतात.

# शेती

ठाणें जिल्ह्यांत चार प्रकारची जमीन आढळतें: (१) काळीं भुसभुशीत जमीन, (२) डोंगर-उतारावरील लालसर रंगाची वरकस जमीन, (३) सखल भागांतील चिकण जमीन, (४) समुद्र किनाऱ्यावरील हलकी जमीन. फळबागायतीसाठीं यांचा उपयोग होतो.

या जिल्ह्यांत दोन तऱ्हेच्या जमिनी आहेत. गोडचा आणि खाऱ्या. भाताचे एकच पावसाळीं पीक काढण्यांत येतें. पाणथळ भागांत क्वचित उन्हाळी पीक काढण्यांत येते.

**भाताच्या जातीं**

भाताच्या अनेक जाती आहेत. त्यांत हलक्या आणि गर्वी या प्रमुख आहेत. हलक्या जाती दोन अडीच महिन्यांत तयार होतात. गर्वीला ५–५।। महिने लागतात. हळवी जात जास्त हलक्या जमिनींत होते. परंतु उत्पन्नाच्या मानानें खर्च जास्त होतो. त्याच खर्चांत गर्वी जातीचे भात भारी जमिनींत स्थलान्तर करून लावले तर जास्त फायदा होतो. म्हणून हलक्या जमिनींत स्थलान्तर न करतां नुसते बी फेंकून पेरणी केल्यास खर्च कमी येतो. या पेरणीस बी एकरीं ८० ते १०० पौंड लागते. पाऊस पडण्यापूर्वी जमिनीची मशागत करून ठेवतात. पाऊस पडल्यावर बी फेंकून देतात. म्हणजे तें चटकन उगवते. पण दोन रोपांतील अन्तर सारखे नसते. रोपांची दाटी झाल्यामुळें दाणे कमी येतात. ठाणें जिल्ह्यांत तांदळाच्या पिकाखालीं तीन लाख ८३ हजार एकर जमीन आहे. एक लाख ६५ हजार ५०० एकर जमीन पडिक असून ३३ हजार ८०० एकर जमीन पडिक परंतु लागवडीस योग्य आहे.

**जपानी पद्धति**

भातशेतीची राब पद्धत पूर्वापार चालत आलेली असून राब पद्धतीला भरपूर पावसाची आवश्यकता असते. पण शेतकऱ्यांना तर निसर्गाच्या लहरीवर अवलंबून राहावे लागते. सध्या जपानी पद्धतीच्या भात शेतीचे प्रयोग मोठचा प्रमाणावर सर्वत्र होत असल्यानें तसेंच सुधारलेली बी–बियाणीं खतें व अवजारें यांचा पुरवठा होत असल्यामुळें पीक हमखास हातीं लागत असून त्यांत वाढही होत आहे. त्यामुळें बरेच शेतकरी जमिनीची राब न करतां जपानी पद्धतीचा अवलंब करू लागले आहेत.

१९५२ मध्यें जपानी भातशेतीच्या लागवडीचा पहिला प्रयोग डहाणू तालुक्यांतील कोसबाड येथील शेतकी संशोधन केंद्रांत व कोरा ग्रामोद्योग केंद्रांत करण्यांत आला.

भाताच्या रोपासाठीं तीन इंच उंचीचे गादी वाफे तयार करण्यांत येतात. या वाफ्यांना अडीच पौंड नैट्रोजन, सव्वा पौंड फॉस्फेट व दोन पौंड पोटॅश या प्रमाणांत रासायनिक खतें देण्यांत येतात. दर गुंठ्यास सुमारें आठ ते दहा पौंड बी लागतें व एक एकर लावगडीसाठीं सव्वा गुंठ्याच्या गादी वाफ्यांतील रोपें पुरतात. रोपें ३५ ते ४० दिवसांची झाल्यावर दोरीच्या किंवा लांकडी चौकटीच्या सहाय्यानें ओळींत लावण्यांत येतात. अंतर १०"×६" असें ठेवतात. सामान्यत: एकरीं ८० पौंड नैट्रोजन, ३५ पौंड फॉस्फेट आणि ४० पौंड पोटॅश याप्रमाणें रासायनिक खतें देण्यांत येतात. यापैकीं अर्धा नायट्रोजन व बाकीचीं खतें देण्यांत येतात. बाकीचे नायट्रोजन दोन सारख्या हप्त्यांत—लावणीनंतर चार, पांच आठवड्यांनीं पहिला हप्ता व पीक फुलावर येण्यापूर्वीं चार आठवडे दुसरा हप्ता, याप्रमाणें देण्यांत येतात.

**रोपांसाठीं गादी-वाफे व खतें**

रोपें ताठ राहावी म्हणून पंधरवडाभर दोन ते तीन इंच पातळीपर्यंत पाणी ठेवण्यांत येतें. रोपें चांगली रुजली म्हणजे पाणी काढून टाकण्यांत येते व नंतर आंतरमशागत करण्यांत येते. लावणीनंतर १५ ते २० दिवसांनीं पहिली हातबेणणी करण्यांत येते. दर १५ दिवसांनीं एकदां अशा प्रकारें तीन—चार वेळा रोटरी बिडरनें आंतरमशागत करण्यांत येते. आंतरमशागतीसाठीं पाणी दीड इंच पातळीपर्यंत कमी करतात. पीक पूर्णपणें फुलावर आलें म्हणजे पाण्याचा निचरा करण्यांत येतो.

स्थानिक पद्धतीपेक्षां जपानी पद्धतीच्या लागवडीमुळें पडणारा उत्पन्नांतील फरक सरासरी ३३६ पौंड ते १२७३ पौंडपर्यंत असल्याचे आढळून आलें आहे. जपानी पद्धतीखालीं थोड्या वेळांत जास्तींत जास्त जमीन आणण्याच्या उद्देशानें १९५७ पासून मार्गदर्शी योजना सुरूं करण्यांत आली आहे. या योजने-नुसार जपानी पद्धतीनें भाताची लागवड करूं इच्छिणाऱ्या शेतकऱ्यास एकरीं ७५ रु. प्रमाणें कर्ज देण्यांत येते. या कर्जापैकीं कांहीं भाग रासायनिक खताच्या रूपानें व बाकी रोख रकमेच्या स्वरूपांत सहकारी संस्थेच्या द्वारें देण्यांत येतो. जिल्ह्यांतील ६०,३०० एकर क्षेत्र नाचणीच्या पिकाखालीं असून अंदाजें १५,१०० टन उत्पन्न येतें. डोंगरउतरणीवर नागली व वऱ्ही यांचें पीक निघतें. माळावर उडीद व मूग आणि कुळीथ पिकतात. नदीकाठीं सुपीक जमिनींत उंसाचे मळे आढळतात. त्यामुळें उंसापासून गूळ बनविण्याचा धंदा चालतो. पण त्याचें प्रमाण फार थोडें आहे.

पावसाळा संपल्यावर हिंवाळ्यांत ओल्या जमिनींत वाल, चणे, तूर, चिबुड, कलिंगडे, काकड्या यांचें उत्पन्न काढलें जातें. नदीकांठच्या शेतावर रहाट व लाटी यांच्या सहाय्यानें पाणी काढून कांदे, वांगीं, पालेभाज्या, मिरची-कोथींबीर इ. भाजीपालाही शेतकरी पिकवितात. पावसाळ्यांत पिकणाऱ्या धान्यावर वर्षभर पोट भरत नाहीं. त्यामुळें उन्हाळ्यांत सुद्धां शेतकऱ्यांना शेती करावी लागते. कांहीं शेतकरी नोकरीनिमित्त मुंबईसहि जातात.

डहाणू तालुक्यांतील बोर्डी, घोलवड, डहाणू, चिंचणी या ठिकाणीं आम्बे, केळी, पेरु, पपई, चिकू पपनस, अननस यांच्या बागा आहेत. घोलवडच्या चिकूला बाजारांत चांगलाच भाव येतो. या भागांतील गुलाबाचीं फुलेंहि फार प्रसिद्ध आहेत. रोज दहा ते १२ ट्रक्स, गुलाबाच्या फुलांनीं भरून जिल्ह्याबाहेर जातात.

**फळ बागा**

पालघर तालुक्यांतील के. माहिम या ठिकाणीं राजेळी केळींचें उत्पन्न होतें. पालघरला गवताचे मोठमोठे माळ आहेत. केळवे या ठिकाणीं बागा आढळतात. माहीम, केळवे, शिबरगांव, सातपाटी, तारा-पूर, हा विभाग बागायती समजला जातो. के. माहिम व केळवे हीं ठिकाणें पानवेली व केळी यांच्याबद्दल प्रसिद्ध आहे.

वसई तालुक्यांतील वसईची केळीं व विड्याचीं पानें फार प्रसिद्ध आहेत. येथून भाजीपाला, दूध, केळी व मासे, विड्यांचीं पानें हे जिन्नस मुंबईस जात असतात. याच तालुक्यांतून पापडी येथून केळी व भाजीपाला यांचा मोठा व्यापार चालतो. आगाशी येथील सुकेळी प्रसिद्ध आहेत. गुलाबाची फुलें, केळीं व भाजीपाला मुंबईस जातो.

**विरारहून केळीं व विड्याचीं पानें**

ठाणें तालुक्यांतील उतन आणि राई हीं गांवें भाजीपाल्यासाठीं प्रसिद्ध आहेत. उतन येथें कांदे व कारली यांचें पीक निघतें.

भिवंडी तालुक्यांतील जमीन फार सुपीक असल्यामुळें हा तालुका भाताचें कोठार म्हणून प्रसिद्ध आहे. भिवंडी येथें तांदूळ सडण्याच्या गिरण्या आहेत.

जव्हार तालुक्यांत पुष्कळ पाऊस पडतो. या तालुक्यांत मुख्य पीक भाताचें असून नागली, वरी व उडीद हीं पिकेंही बऱ्याच प्रमाणांत होतात. विक्रमगडहून बराच तांदूळ बाहेरगांवीं विक्रीसाठीं पाठविण्यांत येतो. वाडा तालुक्यांतहि तांदळाचें पीक निघतें.

या जिल्ह्यांतील मुख्य पिकें खालीलप्रमाणें आहेत –

(१) भात, (२) कडधान्य, (३) चिकू, (४) नारळ, (५) आंबे, (६) केळी (७) खाण्याचीं पानें (८) भाजीपाला (९) गवत.

या जिल्ह्यांतील वसई, पालघर व डहाणू या तालुक्यांत केळ्यांचें पीक निघतें. सुमारें तीन हजार एकरांत लागवड केली जाते. या पिकाचें सालिना उत्पन्न ३६ हजार टन होतें. हिरव्या सालीची खास वसईची केळी प्रसिद्ध आहेत. सुकलेल्या केळ्यांपासून तयार केलेली पावडर बालकांचें अन्न, चॉकोलेटस्, मिठाई, आईस्क्रीम वगैरेकरितां व औषधांकरितां वापरतां येते. केळी सुकवून त्यापासून पावडर तयार करण्याची एक सहकारी सोसायटी वसई येथें स्थापन करण्याचे प्रयत्न चालू आहेत. मुंबईसारखी बाजारपेठ जवळ असल्यामुळें केळ्यांची लागवड करण्यास चांगलाच वाव आहे. शिवाय चिकू, अननस, पेरू वगैरे फळांची लागवड बऱ्याच ठिकाणीं करतां येण्यासारखी आहे. विशेषतः तलावाच्या कांठीं फळफळावळ होऊं शकेल.

हा जिल्हा सह्याद्रि पर्वताच्या पायथ्याशीं असून पश्चिमेस अरबी समुद्र आहे; तर जमिनीच्या बाजूनें सूरत, नाशिक, नगर, पुणें व कुलाबा जिल्ह्यांच्या सरहद्दी आहेत. सह्याद्रीच्या अति उंच पर्वतरायीं, लहानमोठ्या नद्यांची देणगी, त्यांचे संगम, सृष्टिसौंदर्यानें युक्त प्रदेश, बंदरपट्टींतील बागायतीची सकस जमीन, त्याचबरोबर विस्तृत खार जमिनी, भात पिकविण्यासाठीं योग्य जमिनी, वरकस जमिनी, जंगल व गवताखालील अफाट क्षेत्रें, अशीं या जिल्ह्याची भौगोलिक परिस्थिति आहे.

जिल्ह्यामध्यें दहा तालुके व दोन महाल असून अंधेरी, बोरिवली हीं उपनगरें सुद्धां शेतीविकासाच्या दृष्टीनें या जिल्ह्यांतच समाविष्ट केलेली आहेत. जिल्ह्याचें क्षेत्रफळ ३,७२९ चौ. मैल म्हणजे सुमारें २४ लक्ष एकर आहे. गांवांची एकूण संख्या १५८१ असून लोकसंख्या १६,५३,३२७ आहे.

## पिकें



गवत
कडधान्यें
चिकू
मासळी
नारळ
सागवान
भाजीपाला
आंबे
विडयाचीं पानें
भात
केळीं
उंबरगाव
डहाणू
डहाणू
जव्हार
मोखाडे
पालघर
वाडा
वसई
शहापूर
भिवंडी
ठाणें
वांद्रे
कल्याण
मुरबाड

**जमिनीचे प्रकार**

शेतीच्या दृष्टीनें लागवडीखालीं असलेल्या जमिनीची खालीलप्रमाणें वर्गवारी केलेली आहे–

**ठाणें जिल्ह्यांतील जमीन**

- जंगलपट्टी किंवा पूर्व भाग
  - भात जमीन
    - हळवी
    - निमगर्वी गर्वी
  - वरकस जमीन
- बंदरपट्टी किंवा पश्चिम भाग
  - बागायती जमीन
  - खार जमीन

**पर्जन्यमान**

जिल्ह्यांतील पावसाचें सरासरी प्रमाण ७० ते १३० इंच असून पश्चिमेकडून पूर्वेकडे पावसाचें प्रमाण वाढत जातें. नैऋत्य मान्सून वाऱ्यापासून पाऊस पडत असून जून ते सप्टेंबर या चार महिन्यांतच तो विशेष पडत असतो.

जिल्ह्यांतील मुख्य पीक भाताचें असून त्याखालीं सुमारें ५० टक्के क्षेत्र येतें. जिल्ह्यांतील महत्त्वाच्या पिकांखालील क्षेत्र पुढीलप्रमाणें आहे.

| | पिकें | क्षेत्रफळ एकर |
|---|---|---|
| (१) | भात | ३,८३,००० |
| (२) | नागली | ५७,००० |
| (३) | वरी | ३२,५०० |
| (४) | कोद्रा | २,५०० |
| (५) | कडधान्यें | ३५,५०० |
| (६) | मसाल्याचीं पिकें | २,४०० |
| (७) | गळिताचीं धान्यें | ८,५०० |
| (८) | ऊंस | १२० |
| (९) | वाखाचीं पिकें | २,००० |
| (१०) | हिरवा चारा | १,००० |
| (११) | भाजीपाला | १०,००० |
| (१२) | फळफळावळ | ६,००० |
| (१३) | औषधीं पिकें | ७७० |
| (१४) | गवताखालील क्षेत्र | २,४०,००० |

पशांचीं पिकें म्हणून केळीं, विड्याचीं पानें, चिकू, आलें आणि सर्व तऱ्हेचा भाजीपाला पिकवला जातो.

या जिल्ह्यांत शेतकी संस्था पुष्कळ आहेत. प्रसिद्ध शेतकी शाळा, कोसबाड, या ठिकाणीं शेत कऱ्यांच्या मुलांना शेती व पशुसंवर्धनाचें शिक्षण दिलें जातें; तसेंच भात व कपाशीच्या लागवडीवर प्रयोग केले जातात.

पालघरला शेतकी संशोधनकेन्द्र असून त्या ठिकाणीं भात, वाल, हरभरा इत्यादि पिकांवर जास्त उत्पन्न देणाऱ्या नवीन जाती निर्माण करण्याचें संशोधन चालू आहे. पालघरलाच डेअरी डेव्हलपमेंट विभागाचें जनावरांचें फार्म आहे. शेतकऱ्यांना सुधारलेल्या बी–बियाणांचा पुरवठा करण्यासाठीं जिल्ह्यांत पालघर, वाडा, मुरबाड तालुक्यांतील खुटल, डहाणू तालुक्यांतील सारावली, भिवंडी तालुक्यांतील चाविंद्रे व वसई तालुक्यांतील पेल्हार या ठिकाणीं बी–उत्पादन केंद्रें (सीड फार्मस ) असून तेथें बी–बियाणें काढलीं जातात.

याशिवाय कोरा ग्रामोद्योग केंद्रांत भात, हिरवी खतें व शेतीचीं सुधारलेलीं अवजारें यांच्यासंबंधी प्रयोग केले जातात. खाजगी संस्था म्हणून पालघर येथील आदर्श डेअरी व मुंबई गोरक्षक मंडळाचे बेटे गांव येथील म्हशींचे व गीर गाईंचे फार्मस् मार्गदर्शन करण्याच्या दृष्टीनें महत्त्वाचे आहेत.

जिल्हा शेतकी अधिकारी, सहाय्यक जिल्हा शेतकी अधिकारी, शेतकी अधिकारी, खरीप आणि रब्बी पिकें योजना, शेतकी अधिकारी, बी–उत्पादन केन्द्र, स्पेशल शेतकी अधिकारी, भात मार्गदर्शक योजना, भिवंडी, पालघर, डहाणू शेतकी अधिकारी, विकास शेतकी मदतनीस, ग्रामसेवक व विकास अधिकारी यांच्याकडून शेतीसंबंधी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केलें जातें. भातशेतीची **सरकारी प्रचार-**
जपानी पद्धत, पिकांच्या जाती, खताचा वापर, आणि पिकांचें संरक्षण यांची प्रात्यक्षिकें **यंत्रणा**
शेतकऱ्यांच्या शेतांवर दाखविलीं जातात. भात, वाल, हरभरा, हिरव्या खतांचीं पिकें गवताच्या जाती व लागवड इत्यादि गोष्टींसंबंधी मार्गदर्शन करण्यासाठीं आपल्या जिल्ह्यांत पुढील तज्ज्ञ आहेत.

शेतकी अधिकारी, शेतकी संशोधन केंद्र, पालघर

शेतकी अधिकारी, गवत संशोधन केंद्र, पालघर

जिल्ह्यांतील वरील सर्व अधिकाऱ्यांच्या तांत्रिक ज्ञानाच्या व मार्गदर्शनाच्या अभावी शेतकऱ्यांना आपलें उत्पादन वाढवतां आलें नव्हतें. पण आतां सर्व प्रकारच्या सोयी शेतकऱ्यांना उपलब्ध होऊं शकतील. ग्रामीण भागासाठीं सरकारनें प्रसृत केलेल्या अनेक शेतीच्या योजना आहेत. त्या शेतकऱ्यांनीं स्वतःचा विकास करून घेण्यासाठीं तसेंच शेतकी उत्पादन वाढविण्यासाठीं राबविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

भातशेतीच्या जपानी पद्धतीचा फायदा सर्व शेतकऱ्यांना, विशेषतः कमी भांडवल असलेल्यांना देण्याच्या उद्देशानें १९५६–५७ सालीं जपानी भातशेतीची मार्गदर्शक योजना जिल्ह्यांत भिवंडी तालुक्यांत प्रथम सुरू केली गेली. ही योजना शेतकी व सहकारी विभागामार्फत आंखण्यांत **मार्गदर्शक भातशेती**
आली. तिचे दोन उद्देश आहेत– **योजना**

विकास गटांत सरसकट पिकणारी भाताची जात तयार करणें.

ज्या शेतकऱ्यांना आपल्या शेतांत ही पद्धत करणें शक्य असेल अशा सर्वांसाठीं जरूरतें आर्थिक सहाय्य, खताचा पुरवठा व तांत्रिक सल्ल्याची सोय करणें

जपानी पद्धतीनें भाताची लागवड करण्यांत येऊन एकरीं सर्वसाधारण दहा मण भाताचें उत्पन्न जादा मिळालेलें आहे. यामुळेंच या जिल्ह्यांत १९५९–६० पासून पालघर व डहाणू या दोन नवीन गटांत भातशेतीची जपानी पद्धत सुरू करण्यांत आली. या योजनेचा फायदा भिवंडी, वाडा, पालघर, वसई, डहाणू

व जव्हार तालुक्यांतील विक्रमगड या भागांस मिळत आहे. १९६१-६२ सालीं वसई, पालघर गटापासून स्वतंत्र करण्यांत येत असून त्यांत वसई, अंधेरी व बोरिवली हे तालुके घेण्यांत येतील.

या योजनेचा फायदा जिल्ह्याच्या मार्गदर्शक भातशेती योजना सुरू नसलेल्या तालुक्यांना मिळावा म्हणून वरील गटाच्या धर्तीवर पैशाच्या व खतांच्या रूपानें पीक-कर्जें देण्याची व्यवस्था तालुका विकास गटामार्फत केलेली आहे.

भातशेती प्रायोगिक योजनेनुसार एकरीं सुमारें ९२ ते १०० रुपयांपर्यंत कर्जाऊ रक्कम ( पैशाच्या व खतांच्या रूपानें ) दिली जाते.

**बी-संवर्धन केंद्र योजना**

सुधारलेल्या जातीचें बीं-बियाणें वापरणें हें अधिक उत्पन्न काढण्याच्या दृष्टीनें फार महत्त्वाचें आहे. या दृष्टीनें शेतकऱ्यांची सुधारलेल्या बियांची गरज भागविण्याकरितां जिल्ह्यांतील सहा तालुक्यांत पुढील बीं-उत्पादन केंद्रें सुरू करण्यांत आलीं आहेत.

| | |
|---|---|
| पालघर | |
| वाडा | |
| खुटल | ता. वाडा |
| सरावली | ता. डहाणू |
| चाविंद्रे | ता. भिवंडी |
| पेल्हार | ता. वसई |

वरीलपैकीं शेवटचीं तीन केंद्रें या वर्षी चालू केलीं असून पुढील वर्षापासून त्यांच्या उत्पादनास सुरुवात होईल.

**बी व खतांसाठीं गुदामें बांधण्याची योजना**

या योजनेप्रमाणें प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणीं तालुक्यास लागणारीं बीं-बियाणीं व खतें सांठविण्या-करितां गुदाम बांधण्यांत येणार आहे. आतांपर्यंत मोखाडा व शहापूर येथील गुदामें बांधून पूर्ण झालीं असून पालघर गुदामाचें बांधकाम चालू आहे. गुदाम बांधकामाचीं कामें विकास गटामार्फत केलीं जातात.

**पालापाचोळयापासून कंपोस्ट**

ठाणें जिल्ह्यांत जंगल जास्त असल्यामुळें त्या ठिकाणीं मिळणाऱ्या पालापाचोळयापासून कंपोस्ट खत तयार करून शेतकऱ्यानें आपल्या शेतांत वापरल्यास प्रत्येक खड्डयास ६ रुपयांप्रमाणें मदत दिली जाते. शेतकऱ्यास कंपोस्ट खत तयार करण्याबद्दल उत्तेजन देऊन जमीन अधिक सुपीक बनविणें हा योजनेमागील हेतु आहे.

**केरकचऱ्यापासून कंपोस्ट**

या योजनेनुसार नगरपालिका व ग्रामपंचायती यांनीं ग्रामीण भागांत मोठ्या प्रमाणांत वाया जाणाऱ्या सेंद्रिय पदार्थांचा नाश थांबवून व ते पदार्थ कंपोस्ट खतासाठीं वापरून आपल्या गांवांची कंपोस्ट खताची गरज भागवावयाची आहे. या बाबतींत अशा संस्थांना मागील दोन वर्षाच्या सरासरी कंपोस्ट उत्पादनापेक्षां जास्त तयार होणाऱ्या कंपोस्ट खताला प्रत्येक टनामागें उत्तेजनार्थ दोन रुपये आर्थिक मदत देण्याची योजना आहे.

**हिरव्या खताची योजना**

हिरव्या खताची लोकांत आवड निर्माण करण्याकरितां या योजनेनुसार हिरव्या खताचें बी शेतकी विभागाकडून पुरविलें जातें व प्रत्येक मण बियाला पांच रु. आर्थिक मदत मिळते.

**पीक–संरक्षण योजना**

पिकांवर जे निरनिराळ्या किडीचे व बुरशीचे रोग पडतात, त्यांना वेळीच तोंड देण्याकरितां शेतकी विभागानें निरनिराळीं औषधें व तीं फवारण्याकरितां किंवा उडविण्याकरितां लागणारीं उपकरणें जिल्ह्यांत सर्व ठिकाणीं ठेवलेलीं आहेत.

हीं औषधें २५ टक्के आर्थिक मदतीनें दिलीं जातात. उपकरणाला दिवसाला २५ नये पैसे भाडें ठेवलेलें आहे.

**फळझाडें लागवडीची योजना**

या योजनेनुसार फळझाडांची लागवड करूं इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांना तगाई म्हणून रोखीनें किंवा कलमांच्या रूपानें मदत केली जाते. प्रत्येक गरजू शेतकऱ्याला एकरीं ३०० रु. प्रमाणें दहा एकरापर्यंत हें कर्ज दिलें जातें. या कर्जाला पहिलीं चार वर्षें व्याज नसतें.

**विहिरी व एंजिनपंपासाठीं तगाई व आर्थिक मदत**

या योजनेनुसार कोठल्याही गरजू शेतकऱ्याला नवीन विहिरी बांधण्याकरितां २५०० रु. व जुन्या विहिरीच्या डागडुजीसाठीं लँड मार्गेज बँकेकडून १००० रु. तगाई मिळते. याच योजनेनुसार विहीर बांधल्यानंतर एकूण खर्चाच्या २५ टक्के किंवा ५०० रुपयांपर्यंत (त्यांत जें कमी असेल तें) आर्थिक मदत मिळते. दुरुस्तीसाठीं मिळणाऱ्या खर्चांत मदत मिळत नाहीं.

त्याचप्रमाणें ऑईल एंजिन पंप किंवा इलेक्ट्रिक मोटर घेण्याकरितां गरजू शेतकऱ्यांना लँन्ड मॉर्गेज बँकेकडून ४०००रु. कर्ज मिळतें. यांत सुद्धां एकूण खर्चाच्या २५ टक्के किंवा ८००रुपयांपर्यंत आर्थिक मदत मिळते. ( त्यांत जें कमी असेल तें.. )

**अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांना विहिरीसाठीं आर्थिक मदत**

या योजनेनुसार अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांना १५०० रु. आर्थिक मदत मिळते. ही मदत ५०० रुपयांचा एक, याप्रमाणें तीन हप्त्यांत मिळते. याबद्दलचे अर्ज त्या भागांतील गट विकास अधिकारी यांच्याकडे करावयाचे असतात.

**विहिरींची योजना**

जिल्ह्यांतील अविकसित भागांत ज्या शेतकऱ्यांचें वार्षिक उत्पन्न ५०० रुपयांच्या आंत आहे, अशा गरजू शेतकऱ्यांना नवीन विहिरी बांधण्याकरितां रु. १५०० आर्थिक मदत व शिवाय ५०० रु. कर्ज मिळतें. वरीलप्रमाणें ही मदत सुद्धां तीन हप्त्यांत मिळते.

**लक्ष्मी कापसाची योजना**

ठाणें जिल्ह्यांत कोसबाड येथील कृषि विद्यालयांत गेल्या दोन वर्षांपासून भाताच्या पिकानंतर लक्ष्मी जातीच्या कापसाचें पीक काढण्याचे प्रयोग चालले आहेत. पीक कापून घेतल्यानंतर केवळ वापश्यावर या जातीचा कापूस होऊं शकतो असें अनुभवास आलें आहे. ठाणें, जिल्ह्यांतील प्रगतिशील शेतकऱ्यांनीं कापसाचे बरेच प्लॉट केले आहेत. या प्लॉटमधील कापसाची वाढ चांगली झाली असून ऑक्टोबर महिन्यांत पेरलेल्या पिकांतून कापूसही निघूं लागला आहे.

लक्ष्मी जातीचा कापूस म्हैसूर ( कर्नाटक ) व आंध्र राज्यांत होतो. त्या राज्यांत कापसाची पेरणी ऑगस्ट-सप्टेंबरमध्यें करतात. तेथें वर्षातून हें एकच पीक काढण्यांत येते. आपण भातानंतर हें दुय्यम पीक म्हणून घेऊं शकतो हें महत्त्वाचें आहे. ह्या जातीचा कापूस पांच-सहा महिन्यांत तयार होतो. लक्ष्मी कापसाला बाजारांत मागणी फार असून भावहि चांगला येतो. कोसबाड येथें तयार झालेला कापूस सर्व बाबतींत कर्नाटकांतील कापसाइतकाच चांगला असतो, असें माटुंगा येथील भारतीय मध्यवर्ती कापूस मंडळाच्या कापूस प्रयोग शाळेंत तपासणीनंतर आढळून आलें आहे.

या कापसाच्या उत्पन्नाची टक्केवारी पुढीलप्रमाणें देतां येईल.
एकरीं उत्पन्न ३७० रत्तल ( बियासह )
जिनिंग—३३.६ टक्के
धाग्याची लांबी ०.९६ ते. ९७ इंच
सुताचा नंबर ३९

गेल्या दोन वर्षांत लक्ष्मी कापसाच्या लागवडीचा खर्च एकरीं ५५ ते ६० रुपये आला. कोसबाड येथील शेतीवर एकरीं ३५० ते ४०० रत्तल उत्पन्न आलें. साधारणपणें एक रत्तल कापसाचा ( बियांसह ) भाव आठ ते दहा आणे असतो. म्हणजे एकरीं १७५ रु. झाले. मशागतीचा खर्च वजा जातां एकरीं १०० ते १२५ रुपये निव्वळ नफा राहिला. ह्या जातीच्या कापसाचें बी सहकारी कापूस विक्री सोसायटी, गदग, जिल्हा धारवाड येथें मिळू शकते.

पेरणीपूर्वी कापसाच्या बियाला सरेसाँन किंवा अॅग्रोसान हीं औषधें लावावीं ( एक औंस औषधाची भुकटी २० पौंड बियाला लावावीं ).

जमिनीची मशागत— हळव्या, निमगरव्या जमिनींतील भाताचें पीक कापून घेतल्यावर जमीन वापशांत असतांना म्हणजे जमिनींत बेताचा ओलावा असतांना लाकडी नांगरानें उभी व आडवी नांगरावी.
कापूस पेरणीचा हंगाम खालीलप्रमाणें राहील—
हळवी जमीन— ऑक्टोबरचा पहिला व दुसरा आठवडा
निमगरवी जमीन— ऑक्टोबरचा शेवटचा आठवडा व नोव्हेंबरचा शेवटचा आठवडा

गरवी जमीन— नोव्हेंबरचा शेवटचा आठवडा व डिसेंबरचा पहिला आठवडा

ह्या जातीच्या कापसाचीं मुळें जमिनींत सुमारें दीड फूट खोल व दोन फूट रुंदीपर्यंत पसरतात. त्यामुळें जमिनीची नांगरट जेवढी अधिक तेवढी मुळाची वाढ अधिक होऊन पीक जोमदार येते. नांगरट झाल्याबरोबर ढेकळें जड ओंडक्यानें बारीक करावींत, नाहींतर बीं पेरणीस लागणारा ओलावा टिकून राहणार नाहीं.

एक एकर लागवडीस आठ ते दहा पौंड बीं लागतें. ह्या जातीच्या कापसाची पेरणी करतांना दोन ओळींतील अंतर दोन फूट व दोन रोपांतील अंतर एक फूट ठेवावें. बीं टोकण पद्धतीनें पेरावें. टोकण पद्धत

**बी—पेरणी**

म्हणजे साध्या कुदळीनें दीड ते दोन इंच खड्डे करून त्यांत दोन बिया पेराव्या. थोडी माती टाकून बीं झांकून टाकावें. कापसाचें बी उगवण्यास थोडा जास्त ओलावा असावा लागतो. याकरितां बी वरवर पेरून चालत नाहीं, हें विशेष लक्षांत ठेवावें. कापसाच्या तंतुमुळें बीं एकमेकांशीं चिकटलेलें असतें, म्हणून पेरणींपूर्वी बी ओलसर राखेंत व शेणांत घोळावें व थोडा वेळ सावलींत वाळवावें म्हणजे बी सुटें होतें व पेरणीस सोपें जातें आणि पेरणी चांगल्या तऱ्हेनें करतां येते. तसेंच राख व शेणांतील अन्नांश देखील नवीन रोपांना अल्पांशानें मिळू शकतो.

**बी उगवणें–** पेरल्यापासून सुमारें आठ ते दहा दिवसांत बी उगवून येतें. त्यानंतर बी उगवलें नाहीं तर बियाला लागणारा ओलावा अपुरा पडला, असें समजावें. अशा वेळीं एका बादलींत पाणी घेऊन एक एक पेला पाणी पेरलेल्या बियांच्या ठिकाणीं टाकावें. असें तीन दिवस पाणी टाकलें म्हणजे सर्व बी उगवून येईल. बी अगदीं खोल पेरून चालत नाहीं व वरवर पेरूनहि चालत नाहीं. खोल पेरलें तर ओलावा मिळून बी उगवून येतें. परंतु कोवळें कोंब ढेकळाखालीं दबले जातात व वर येऊं शकत नाहींत. त्यामुळें बरेचसे बी उगवूनहि तसेंच मरून जातें. वरवर पेरलें तर ओलावा अपुरा पडल्यामुळें तसेंच पडून राहातें. या दृष्टीनें कोसबाड येथील कृषिविद्यालयाच्या शेतीवर अनेक प्रयोग करण्यांत आले आहेत. त्यांतील पुढील प्रयोग यशस्वी ठरला आहे

(१) प्रथम जमीन लांकडी नांगरानें आडवी व उभी नांगरली.
(२) त्यावर फळी फिरवून ढेकळें बारीक केलीं.
(३) भाताचीं धसकटें वेंचून काढलीं.
(४) पेरणीपूर्वी बी १२ तास अगोदर पाण्यांत भिजविलें.
(५) पेरणीपूर्वी बी एक तास अगोदर पाण्यांतून काढून कोरड्या राखेंत टाकलें; त्यामुळें बी सुटें झालें.
(६) बियाला सेरसॉन हें औषध लावलें ( २० पौंड बियाला १ औंस औषध ).
(७) दोरी धरून दोन फूट × एक फूट अंतरावर कुदळीनें तीन ते चार इंच खोल खड्डे खोदले.
(८) प्रत्येक खड्ड्यांत एक मूठ चाळलेलें शेणखत अगर कंपोस्ट टाकून बिया झांकून टाकल्या.
(९) पांच गुंठ्याच्या एका शेताला पांच–सहा घमेलीं चाळलेलें शेणखत लागलें.
(१०) त्यानंतर प्रत्येक खड्ड्यांत एक पेला पाणी घातलें. पांच गुंठ्याच्या शेताला दहा बादल्या पाणी लागलें.
(११) असें केल्यानें सर्व बी उगवून आलें व रोपाला शेणखत मिळाल्यामुळें त्याची सुरुवातीची वाढ जोमदार झाली.

कोंकणांत भात–जमिनींतील वापसा फार लवकर निघून जातो. त्याकरितां सर्व जमीन अगोदर नांगरून टाकावी व मगच कापूस पेरणीचें काम हातीं घ्यावें. कोसबाड येथील शेतीवर शेती नांगरल्यानंतर आठ दिवसांनीं वरील पद्धतीनें पेरणी केली, म्हणून कापूस चांगला उगवून आला.

ओळींत कांहीं ठिकाणीं बीं उगवायचे राहून गेलें तर अशा ठिकाणींहि वरीलप्रमाणें उपाय-योजना करावी. बी जर खराब असेल तर तें पुन्हां पेरावें. शेतांत जर जागा मोकळी **नांग्या भरणें** राहिली तर उत्पन्न कमी येईल.

पेरणीनंतर सुमारें पांच आठवड्यांनीं कमजोर रोपें काढून टाकावींत म्हणजे इतर **रोपें पातळ करणें** राहिलेलीं रोपें जोमदार होतील.

कापसाचें पीक कोरडवाहू असल्यामुळें या पिकास खत वगैरे देतां येत नाहीं. मात्र भाताच्या पिकास दिलेल्या खतापैकी राहिलेल्या भागाचा उपयोग ह्या पिकास होतो. म्हणून भाताच्या पिकाला भरपूर

शेणखत, कंपोस्ट खत यासारखीं सेन्द्रीय खतें दिलीं म्हणजे त्याचा उपयोग भातास तर होईलच; परंतु पुढच्या कापसाच्या पिकासहि होईल. ज्या ठिकाणीं शेणखत टाकलें असेल तेथें कापूस चांगला होतो असें आढळून आलें आहे.

**तण काढणें**

वेळोवेळीं पिकांतील तण काढणें आवश्यक आहे. तण काढलें नाहीं तर किडीचा उपद्रव होतो व जमिनींतील ओलावाहि कमी होतो.

**आंतरमशागत व कोळपणी**

कापसाच्या लागवडींतील हें सर्वांत महत्त्वाचें काम आहे. पेरणीनंतर १५ ते २० दिवसांनीं शेतांतील ढेकळें मोठ्या कुदळीनें अगर लांकडी घणानें बारीक करावीं व तण काढून टाकावें. ढेकळें बारीक केल्यामुळें जमिनीला भेगा पडत नाहींत व ओलावा टिकून रहातो, त्यामुळें कापसाची वाढ चांगली होते. म्हणून १५ ते २० दिवसांच्या अंतरानें चार-पांच वेळा कुदळीनें जमीन हलवावी व ढेकळें बारीक करीत जावे. बैलानें ओढणारी कोळपणीं वापरतां येतील व त्यांचा वापर आवश्यकहि आहे. एक बैलाचा लांकडी नांगरही ह्या कामीं उपयोगी पडेल.

शेतांत जर चांगली कोळपणी केली नाहीं अगर कुदळीनें ढेकळें बारीक केलीं नाहींत तर रोप चांगलें येत नाहीं. यासाठीं कोळपणीकडे लक्ष पुरविणें जरुरीचें असते.

**कापसाची वाढ**

कापसाची रोपें सुरुवातीस फार सावकाश वाढतात. साधारणपणें पहिला दीड महिना तर रोपें फारशी प्रगति करीतच नाहींत. दीड महिन्यानंतर रोपाला एकदां फांद्या फुटूं लागल्या कीं, वाढ झपाटयानें सुरूं होते. कापसाचें मूळ लांब असतें व तें जमिनींत खोल जाण्याचा प्रयत्न करतें. तें खोल गेल्यानंतर जमिनीच्या आंतील भागांतील ओलावा घेऊन झाडाची वाढ झपाटयानें करतें.

**फुलें व बोंडें**

ह्या जातीच्या कापसाला अडीच ते तीन महिन्यांनीं पिवळसर रंगाची फुलें येऊं लागतात. फुलें येण्याच्या वेळीं जमिनींत ओलावा असणें, फार आवश्यक असतें म्हणून ह्या वेळीं कोळपणी करावी. म्हणजे फुलें गळून पडणार नाहींत व ह्यांचीं अधिक बोंडें तयार होतील. कोसबाड येथील प्रयोगक्षेत्रांत एका झाडावर सरासरी १८ बोंडें होतीं. बोंडें लांब व मोठीं असतात. पेरणीपासून साडेचार महिन्यांनीं बोंडें फुटतात व त्यांतून शुभ्र कापूस बाहेर पडतो कोंकणांत हवेंत आर्द्रता भरपूर असल्यामुळें बोंड फुटण्याची क्रिया फार सुलभतेनें होतें. हें विशेष महत्त्वाचें आहे. तसेंच जमिनींतील भरपूर ओलाव्यामुळें कापसाच्या झाडाचीं पानें शेवटपर्यंत हिरवीं राहातात व त्यामुळें वेंचणीच्या वेळीं कापसांत कचरा येत नाहीं. कापूस स्वच्छ मिळतो. कर्नाटकांत वेंचणीच्या-वेळीं कापसाचीं पानें वाळतात व त्यामुळें कापसांत पानांचा चुरा मिसळला जाऊन कापूस अस्वच्छ होतो.

**वेंचणी**

पूर्ण उमललेल्या बोंडांतून कापूस सकाळच्या वेळी वेंचावा. वेंचणी करतांना बोंडांतून बाहेर आलेला कापूस ओढून काढावा. सबंध बोंड तोडण्याची जरुरी नाहीं. चांगल्या बोंडांतील कापूस वेगवेगळा ठेवावा, त्यानंतर दुपारच्या उन्हांत तो चांगला दोन तीन दिवस वाळवून पोत्यांत भरून ठेवावा.

वर दर्शविल्याप्रमाणें जर या पिकाची काळजी घेतली तर एकरीं ३५० ते ४०० रत्तल कापूस ( बियासह ) मिळूं शकतो.

कापसावरील किडी– इकडील पिकावर खालील तीन किडी आढळून आल्या–

**तुडतुडे**—हे पानांतील रस शोषण करतात. त्यामुळें पानें पिवळीं पडतात व रोपांची वाढ खुंटते.

**फुलकिडें**— ( थ्रिप्स् ) ही कीडसुद्धां पानांतील रस शोषण करते. त्यामुळें पानें मुरडलीं जातात.

**बोंडांतील शेंदरी अळी**

ही अळी लहान बोन्डे पोखरते; त्यामुळें बोंडें गळून खालीं पडतात व राहिलेल्या बोंडांत ती आंत राहून उपजीविका करते. त्यामुळें बोंडें कुजून पडून जातात व राहिलेल्या बोंडांतील कापूस खराब होतो.

खालीलपैकीं कोणतेही एक औषध पिकाच्या कालावधींत तीन वेळा फवारलें म्हणजे ह्या कीडीचें बऱ्याच प्रमाणांत नियंत्रण होतें.

**नियंत्रणाचे उपाय**

| औषधाचें नांव | मिळण्याचा पत्ता | औषधाचें प्रमाण | एकरीं येणारें उत्पन्न |
|---|---|---|---|
| (१) एन्ड्रीन | मे. बर्मा शेल, मॅगनेट हाऊस, बॅलार्ड इस्टेट. मुंबई १ | एक औंस अधिक ६ १/४ गॅलन पाणी | ८० गॅलन |
| (२) फॉलीडॉल | पी. के. झवेरी आणि कं. १२ प्रिन्सेस स्ट्रीट, श्रॉफ मॅन्शन, मुंबई २. | एक औंस अधिक १२ १/२ गॅलन पाणी | ८० गॅलन |
| (३) गायगी | टाटा पॉयझन लि. युनियन बँक बिल्डिंग, दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई नं. १. | एक पौंड अधिक २० गॅलन पाणी | ८० गॅलन |

**औषध फवारण्याच्या वेळा**

एन्ड्रीन–पेरणीनंतर दोन, अडीच, व तीन महिन्यांनी फवारावे. फॉलीडॉल व गायगी यांचीही हीच पद्धत आहे.

ह्यांपैकीं फॉलीडॉल व एन्ड्रीन हीं विषारीं औषधें आहेत. तेव्हां ती फार काळजीपूर्वक फवारावी. कापसाच्या पिकावर कीड येवो न येवो, याप्रमाणें तीनदां औषधें फवारल्यास पीक निश्चितपणें चांगलें येते.

कोसबाड येथील कृषि विद्यालयाच्या शेतीवर यासंबंधी अनेक प्रयोग करण्यांत आले आहेत. ह्या कापसाची लागवड कोंकणच्या परिस्थितींत सुलभतेनें कशी करतां येईल या संबंधी संशोधन करण्यांत येत आहे.

**दुग्धव्यवसाय व कुरणें**

मुंबईसारखें दाट लोकसंख्येचें अवाढव्य शहर जवळ असल्यानें दुग्धव्यवसायाच्या वाढीस ठाणें जिल्ह्यांत फार मोठा वाव असणें सहाजिकच आहे. त्यांतून रेल्वे वाहतुकीची सोय, असल्यामुळें ठाणें जिल्ह्यांत दूधव्यवसायाची वाढ फार झपाट्यानें झाली.

मुंबईच्या वाढत्या लोकसंख्येला दूध पुरविण्यासाठीं दुभत्या जनावरांची संख्या वाढून ती पाऊण लाखावर पोंचली. त्यांना दरसाल ४० कोटी पौंड गवत पुरविण्याचें काम ठाणें जिल्ह्यांतील घास उत्पादन व विकास मंडळ करीत असते.

गवताचा हा अवाढव्य व्यापार पद्धतशीरपणें चालविण्यासाठीं घास उत्पादक मंडळासारखी सहकारी संस्था अस्तित्वांत आली.

गवत कापणें, वाहून नेणें, त्याचे गठ्ठे बांधणें, ते डब्यांत चढविणें वगैरे कामासाठीं दर वर्षीं ऑक्टोबर ते मार्चपर्यंत सुमारें ४० हजार मजुरांना काम मिळूं शकतें.

दुधाचा पुरवठा वाढवावयाचा झाल्यास जनावरांच्या संख्येंत वाढ करून त्यांना आवश्यक असलेल्या चाऱ्याचा निश्चत पुरवठा करवयास पाहिजे. या तालुक्यांतील पश्चिम रेल्वेच्या दोन्ही बाजूंच्या सुमारें १,५०,००० एकर जमिनींत उत्तम प्रकारचें गवत होतें. पूर्वीं एक एकर जमिनींत गवताचें सरासरी उत्पन्न १२०० ते १५०० पौंड निघत असे; परंतु सुधारलेल्या पद्धतीनें मशागत केल्यास एकरीं चार ते सहा हजार पौंड गवत सहज येऊं शकतें.

**दापचरी दुग्धयोजना**

या जिल्ह्याच्या डहाणू तालुक्यांतील दापचरी येथें एक दुधवाडी सुरू करण्याची महाराष्ट्र सरकारची योजना आहे.

दापचरी गांवापासून जवळच असलेल्या खुबाळे येथें वडोलीच्या नदीवर धरण बांधण्यांत येणार आहे. त्यामुळें ५०० एकराचा तलाव तयार होणार असून त्यापासून ह्या वसाहतीला पाण्याचा भरपूर पुरवठा होईल. या ठिकाणीं जवळ जवळ एक हजार दुभतीं गुरें ठेवण्यांत येतील व येथून सुमारें दोन हजार मण दूध दररोज मिळेल. शिवाय आदिवासींकडूनही दूध विकत घेतलें जाईल. तसेंच आदिवासींना कसण्यासाठीं दूधवाडींतच जमिनी देण्यांत येतील. त्यांच्याकडून जनावरांसाठीं सरकार गवत विकत घेईल.

याव्यतिरिक्त धरण बांधल्यामुळें आजुबाजूच्या भागांतील आदिवासींना रब्बी पिकांसाठीं पाण्याचा उपयोग होईल. या दूधवाडींतील दूध वरळीला पाठविण्यांत येईल.

**आदिवासी सेवा मंडळ**

पंधरा वर्षांपूर्वी डहाणू तालुक्यांतील श्री महालक्ष्मी देवीच्या मंदिरासमोर आदिवासी जनतेचा एक प्रचंड मेळावा भरला होता. शतकानुशतकें खिचपत पडलेल्या आदिवासींची दारिद्र्याच्या खाईंतून व अज्ञानाच्या अंधःकारांतून मुक्तता होणार होती.

या प्रचंड सभेंत आदिवासी जनतेचे कैवारी मुंबई राज्याचे माजी मुख्य मंत्री कै. बाळासाहेब खेर यांच्या मुखांतून देववाणी बाहेर पडली. " आदिवासी हा यापुढें गुलामाप्रमाणें अहोरात्र काबाडकष्ट करणारा मजूर राहाणार नाहीं. तो यापुढें मालक म्हणून या जिल्ह्यांतील जंगलतोडीचा धंदा करूं लागेल. "

आदिवासी मंडळाचे जनक कै. बाळासाहेब खेर यांनीं आदिवासी जनतेच्या उद्धाराची धुरा स्वतःच्या खांद्यावर घेतली. अत्यंत आपुलकीनें त्यांच्या जीवनांत क्रांति करण्याचा त्यांचा निर्धार होता त्यांच्या वरील निर्णयानंतर लवकरच जागोजागी आदिवासींचे सहकारी संघ स्थापन होऊं लागले.

मानवाची सेवा हीच खरी ईश्वराची सेवा, या थोर ध्येयानें कै. पू. ठक्कर बाप्पांनीं भिल्ल सेवा मंडळाची स्थापना केली व त्यानंतर आदिवासी सेवा मंडळ अस्तित्वांत आलें.

**आदिवासींची लोकसंख्या**

ठाणें जिल्ह्यांतील सुमारें १६,५३,३२७ इतक्या लोकसंख्येपैकीं ३,३२,६५५ आदिवासी आहेत. त्यांची वस्ती डहाणू, जव्हार, शहापूर, मोखाडा तळाश्री या विभागांत विशेष आहे. त्यांच्यांत वारली, कातकरी ठाकूर, धोडिया, दुबळी, ढोर, कोळी, महादेव कोळी इत्यादींचा समावेश होतो.

जंगलांत राहाणारे हे लोक जंगलतोड करून कशीबशी आपली उपजीविका चालवितात. अनेक वर्षांचें अज्ञान व दारिद्र्य ह्यांतून त्यांना वर काढण्याचा एकमेव उपाय म्हणजे त्यांच्यातील नष्ट झालेला स्वाभिमान जागृत करून त्यांना माणुसकीची वागणूक देणें हाच होय. त्या दृष्टीनें जंगल कामगार सोसायटी हें प्रभावीं साधन ठरलें आहे.

**कामगार सहकारी संघ**

जिल्ह्याच्या निरनिराळ्या विभागांत आज सुमारें ३५ जंगल कामगार सहकारी संघ काम करीत असून त्यांतील एकूण सभासदांची संख्या सुमारें ५,४९५ एवढी आहे. त्यांचें शेअर भांडवल एका लाखाच्या आसपास आहे.

एक काळ असा होता कीं, आदिवासींना झोपडी बांधण्यास स्वतःची जागा नव्हती, हक्काची रोजगारी नव्हती, धर्मशास्त्राप्रमाणें स्वतःच्या पत्नीवरील हक्कही तो सांगू शकत नव्हता. सावकार, जमीनदार व जंगल कॉन्ट्रॅक्टर देतील ती जागा, पुरवतील ते अन्न व वस्त्र व सांगतील तें काम त्यांच्या मर्जीप्रमाणें करून आदिवासी लाचारीनें जीवन जगत होता. अशा अवस्थेंत सधन, सुशिक्षित व सुधारलेल्या समाजाला तो आपला शत्रू मानीत होता. जो वाघासारख्या हिंस्र पशूशीं बेडरपणें सामना करीत असे, तो पांढरपेशा स्वार्थांध मानवाला भिऊन रानांत दडून बसत असे.

**अनुभव सिद्ध शिक्षण**

परंतु जंगलतोडीच्या धंद्यास सहकारी पद्धतीनें प्रारंभ झाल्यामुळें आदिवासींना या धंद्याकडे आपुलकीच्या दृष्टिकोनांतून पाहाण्याची संवय झाली. बऱ्यावाईट जंगलाचें ते आतां सहानुभूतिपूर्वक निरीक्षण करूं लागलें. त्यांतून होणाऱ्या मालाचा अंदाज करण्याचें शिक्षण घेऊं लागले. झाडाचीं मोजदाद करणें, त्यापासून होणाऱ्या मालाचा अंदाज घेणें, मालाची प्रतवारी लावणें, मालाला येणाऱ्या बाजारभावाचे अंदाज बांधणें इत्यादींचे अनुभवसिद्ध शिक्षण घेऊन त्यांत ते तरबेज होऊं लागले. हें

जीवनोपयोगी ज्ञान मिळविण्याची दुर्मिळ संधी अनेक शतकानंतर सहकारी चळवळीमुळें त्यांना मिळूं शकली. अन्यथा वैयक्तिक ठेकेदार पद्धतींत या गोष्टींकडे त्यांचें कधीच लक्ष गेलें नसतें.

या योजनेचा दुसरा महत्त्वाचा फायदा म्हणजे ग्रामीण धंद्यासही चालना मिळूं लागली. जंगल सहकारी संस्थांनीं मालाची ने–आण शक्यतों बैलगाडीनें करावी, अशी अट ठेवल्यामुळें बैलगाड्यांच्या संख्येंत वाढ झाली. त्याचबरोबर संबंधित असलेले लोहार, सुतार, आदि लोकांचे व्यवसायही वाढू लागले. सहकारी संस्थांनीं सभासदांना बैल व गाडी खरेदी करण्यासाठीं सहाय्य देण्यास सुरवात केली. आदिवासी जनतेला जीवनोपयोगी असा नवा व्यवसाय मिळाला.

जंगल तोडून व त्यापासून फायदा मिळवून जंगलांची पुन्हां लागवड व जोपासना आपणच केली पाहिजे, याची जाणीवही त्यांना होऊं लागली आहे. कांहीं ठिकाणीं संघांनीं लागवडीच्या प्रयोगास प्रारंभही केला आहे. ज्याप्रमाणें जंगलतोडीचे व्यवहार सहकारी संघाकडे सोपविले जातात त्याप्रमाणें जंगलाची लागवड, संवर्धन व संरक्षण हीं कामें जर ह्या संघाकडे सोंपविलीं तर ती अधिक यशस्वी होतील असा विश्वास निर्माण झाला आहे.

**जंगल कायद्याबद्दल आपुलकी**

**जंगल संपत्ती**

देशांतल्या बहुसंख्य लोकांचें जीवन शेतीवर अवलंबून आहे. ही शेती बहुतांशीं पावसावर अवलंबून आहे. त्यामुळें पावसाला जरासा उशीर झाला तर सर्वांच्या तोंडचें अक्षरशः पाणी पळतें.

पावसासाठीं वारा, पाणी आणि वृक्षांची गरज आहे. ; म्हणूनच आपल्या देशांत वृक्षारोपणाची पद्धत फार प्राचीन कालापासून रूढ आहे.

मानवी सुख वृद्धिंगत करण्याच्या बाबतींत वृक्षांचें महत्त्व कमी लेखतां येणार नाहीं. झाडें ओलावा टिकवितात. ओढ्यांतील व नद्यांतील पाणीपुरवठ्याचें नियंत्रण करतात. पुरांचा ओलावा व जोर नष्ट करणाऱ्या वाऱ्याचा वेग कमी करून शेतीचें संरक्षण करतात. याशिवाय झाडापासून इमारती लांकूड, इंधन, फळें, फुलें, शेतकी अवजारें, बांबू, गवत, चारा, औषधें यांचाही पुरवठा होतो. झाडांपासून हा असा अमाप फायदा आपणांस होतो.

**जंगलयुक्त क्षेत्र**

या जिल्ह्याच्या एकूण ३६१२ चौरस मैल क्षेत्रफळांपैकीं १५१९ चौरस मैल क्षेत्रफळ जंगलयुक्त आहे. म्हणजेच या जिल्ह्यांतील ४२ टक्के भू–भाग जंगलांनीं व्यापला आहे. जंगल क्षेत्रांतील झाडापासून उद्योगधंद्यांस लागणारा कच्चा माल पुरविला जातो. काड्याच्या पेटीला उपयुक्त ठरणारें नरम जातीचें लांकूडही मोठ्या प्रमाणावर पुरविलें जातें. काजू व लाख यांच्या उत्पादनामुळेंही जंगल विभागास चांगले उत्पन्न होतें. वेतकाम व बुरुडकाम या उद्योगास उपयुक्त ठरणाऱ्या बांबूचेंही या जिल्ह्यांतील जंगलांत उत्पन्न निघतें. जंगलयुक्त क्षेत्रांचा अधिकाधिक विकास होईल याची दक्षता व काळजी या जिल्ह्यांत घेतली जाते. भारताचे पंतप्रधान पंडित नेहरू म्हणतात त्याप्रमाणें, झाड तोडणें फार सहज गोष्ट आहे, पण तें वाढविणें व जगविणें ही फार कठीण तपश्चर्या आहे. त्यासाठीं समाज सेवकांनीं लोकांना झाडाच्या आवश्यकतेचें महत्त्व पटवून देणें आवश्यक आहे.

जंगलाच्या कामासाठीं जिल्ह्याचीं पुढील तीन विभागांत विभागणी केली आहे.

**पूर्व विभाग–** या विभागांत शहापूर तालुका, मोखाडा महाल व वाडा तालुक्याचा कांहीं भाग यांचा समावेश होतो. या विभागानें ३२८.५ चौरस मैल क्षेत्रफळ व्यापलें आहे.

**पश्चिम विभाग–** वसई, भिवंडी, कल्याण, मुरबाड, व ठाणें व वाडा तालुक्यांचा कांहीं भाग यांचा या विभागांत समावेश होतो. या विभागानें व्यापलेलें क्षेत्र ४६८ चौ. मैल आहे.

**उत्तर विभाग–**यांत पालघर, डहाणू, तळाश्री महाल आणि जव्हार हे तालुके व मोखाडा महालाचा कांहीं भाग यांचा समावेश होतो. ५५८ चौ. मैल इतकें क्षेत्र या विभागानें व्यापलें आहे. ठाणें जिल्ह्यांतून दर वर्षी जंगलाचें उत्पन्न म्हणून सरकारला सुमारे ९० लाख रुपये मिळतात.

## पशुसंवर्धन

ज्या शेतीवर देशांतील ८० टक्के लोकांचें जीवन अवलंबून आहे त्या शेतीशीं पशुसंवर्धनाचा प्रश्न अत्यंत निगडित आहे.

या जिल्ह्याच्या पशुसंवर्धन अधिकाऱ्यांची कचेरी ठाण्याला आहे. जिल्ह्यांत ठाणें, कल्याण, मुरबाडवाडा, पालघर, जव्हार, भिवंडी, डहाणू, वसई, शहापूर आणि मोखाडा या ठिकाणीं गुरांवर औषधोपचार करणारे दवाखानें आहेत.

**तगाई केंद्र**

जव्हार तालुक्यांतील तळवाडा येथें वळूंसाठीं तगाई देण्याचें एक केंद्र आहे. तृतीय पंचवार्षिक योजनेच्या कार्यक्रमांत शहापूर आणि डहाणू या ठिकाणीं अशीं केंद्रें उघडण्यांत येतील. विकास गटांमार्फतहि वळू खरेदी करण्यासाठीं शेतकऱ्यांना तगाई दिली जाते. यांत दोन भाग आहेत. वळू खरेदी करण्यासाठीं विकास गट अधिकारी ३५० रु. तगाई देतात अथवा वळूच्या मूळ किमतीच्या पन्नास टक्के रक्कम देतात. ज्यांना तगाई दिली जात नाहीं त्यांना दरमहा दहा रुपये या प्रमाणें प्रत्येक वळूमागें तीन वर्षें मदत देण्यांत येते.

**वळू केंद्र–**गाईंच्या संवर्धनाच्या दृष्टीनें शहापूर व डहाणू या ठिकाणीं प्रत्येकीं एक वळू केंद्र उघडण्यांत येणार आहे.

**कृत्रिम गर्भधारणा–**भिवंडीला कृत्रिम गर्भधारणा केंद्र उघडून त्याचीं उपकेंद्रें प्रत्येक विकास गटांत उघडण्यांत येणार आहेत. तसेंच पालघरला कोंबडीपालन केंद्रें उघडण्यांत येणार आहे.

## पाटबंधारे व खार जमिनी

शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठीं नव्या विहिरी खोदणें व जुन्यांची दुरुस्ती करणें अत्यंत आवश्यक आहे. सामान्यपणें या गोष्टी करण्यासाठीं शेतकऱ्यांजवळ पुरेसें भांडवल असत नाहीं. त्यामुळें सरकार शेतकऱ्यांना तगाई देते. नव्या विहिरी खोदणें किंवा जुन्यांची दुरुस्ती करणें यासाठीं सढळपणें तगाई देण्याचें सरकारी धोरण आहे. शिवाय एकूण खर्चाच्या २५ टक्केपर्यंत रक्कम आर्थिक सहाय्य म्हणूनहि देण्यांत येत आहे. यामुळें जिल्ह्यांतील विहिरींचीं संख्या सारखी वाढत आहे.

जिल्ह्यांतील सध्याच्या विहिरी यंत्रानें अधिक खोल करून पाणीपुरवठा वाढविण्याची शेतकऱ्यांची जोरदार मागणी होती. ही मागणी विचारांत घेऊन जिल्ह्यासाठीं दोन बोअरिंग मशिन्स घेण्यांत आल्या असून

**पाटबंधाऱ्यांच्या सोयी**

त्यापैकीं एक जिल्हा लोकलबोर्ड, ठाणें, यांच्याकडे आणि दुसरें तालुका डेव्हलपमेंट बोर्ड, पालघाट, यांच्याकडे देण्यांत आलें आहे. या यंत्रांच्या सहाय्यानें आतांपर्यंत सहाशेंहून अधिक विहिरी खोल करण्यांत आल्या आहेत. पाणीपुरवठ्याच्या छोट्या योजनांच्या कार्यक्रमनुसार पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत २५ छोट्या पाणीपुरवठा योजना पूर्ण करण्यांतआल्या. यांतून सुमारें २१७१ एकर जमिनीस पाणीपुरवठा उपलब्ध झाला. या कार्याची माहिति पुढील प्रमाणें आहे–

| क्र. | कामाचें नांव | तालुका |
|---|---|---|
| १ | कात्रज बंधारा | कल्याण |
| २ | खाखी बंधारा | ,, |
| ३ | वराडे बंधारा | ,, |
| ४ | भोज बंधारा | ,, |
| ५ | वाडी बंधारा | ,, |
| ६ | कुंभार्ली बंधारा | ,, |
| ७ | उसाटणें बंधारा ( यु. एस्. ) | ,, |
| ८ | उसाटणें बंधारा ( डी. एस्. ) | ,, |
| ९ | बेळवली बंधारा | ,, |
| १० | कानाड बंधारा | ,, |
| ११ | तांबुर्डे बंधारा | मुरबाड |
| १२ | उचाळे बंधारा | ,, |
| १३ | नारिवली बंधारा (यु. एस् डी. एस्.) | ,, |
| १४ | चिरात बंधारा | ,, |
| १५ | नाणें बंधारा | वाडे |
| १६ | किरवली बंधारा | ,, |
| १७ | टेभोडे बंधारा | पालघर |
| १८ | वेवूर बंधारा | ,, |
| १९ | मोटिबीपाडा बंधारा | ,, |
| २० | ओसरें बंधारा | ,, |
| २१ | चाहाडें बंधारा | ,, |
| २२ | दहागांव बंधारा | शहापूर |
| २३ | सरमाला बंधारा | ,, |
| २४ | घसई बंधारा | मुरबाड |
| २५ | चावे भारे बंधारा | भिवंडी |

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत खालील कामें पूर्ण करण्यांत आलीं.

शहापूर तालुक्यांतील सरमाळा बंधारा
भिवंडी तालुक्यांतील चावे भोर बंधारा
पालघर तालुक्यांतील नांदरे बंधारा

या जिल्ह्याच्या विकास कार्यक्रमाचें मुख्य वैशिष्टच म्हणजे खार जमिनींची सुधारणा हें होय. समुद्र किनाऱ्याजवळ असलेल्या वसई, पालघर, डहाणू, भिवंडी तालुक्यांतून किनाऱ्यालगतच्या शेत जमिनींत समुद्राचें खारें पाणी शिरल्यानें त्या जमिनी अंशत: किंवा संपूर्णपणें निरुपयोगी ठरल्या आहेत. त्यामुळें खार व खाजण जमिनींना बांध घालून त्यांचें संरक्षण करणें व त्या जमिनी पुन्हा लागवडी योग्य करण्यासाठीं १९४८ चा मुंबई खार लँडस् ॲक्ट लागू करण्यांत आला आहे. त्यासाठीं खार लँडस् डेव्हलपमेंट बोर्ड स्थापण्यांत आलें आहे. खार जमिनींची सुधारणा करण्यासाठीं योजना आंखणें व ती अंमलांत आणणें यासाठीं या मंडळाला अधिकार देण्यांत आले आहेत. खार जमिनीं सुधारण्यासाठीं येणाऱ्या खर्चांत सरकार सहभागी असून सरकार, जमीनमालक व कुळें यांच्यामध्यें २:२:१ या प्रमाणांत हा खर्च विभागला जातो.

**खार जमिनींची सुधारणा**

**खार जमिनी सुधारण्याच्या पूर्ण झालेल्या योजना**

| क्रमांक | योजनेचें नांव | योजनेंत अंतर्भूत असलेलें क्षेत्र (एकर व गुंठयांत) खाजगी जमीन | सरकारी जमीन | एकूण | खर्चाची रक्कम ( रुपयांत ) |
|---|---|---|---|---|---|
| | **(१) ठाणें तालुका** | | | | |
| १ | साबे खार | १६८- २-० | - - - - - | १६८- २-० | १७,९९३ |
| २ | कालवा खार | २०५-३२-० | | २०५-३२-० | २०,२४४ |
| ३ | दातिवली | १७३-३५-० | | २०६-३१-० | १८,१०२ |
| ४ | अगाशी | २५८-२६-० | | २५८-२६-० | २४,२४० |
| ५ | बालकुम (ए) | २०८-३४-० | ९३-१२-० | ३०२- ६-० | ३२,१५६ |
| ६ | बालकुम (बी. व सी.) | ८९.२२ १/२ | | १६८- ०-० | २८,१७३ |
| ७ | दिवा उर्फ पोयनाड | २६८.३३ १/२ | २२.२५ १/२ | २९१-१९-० | २९,८९२ |
| ८ | कोठेखार ( सावे, आगाशी व दातिवली ) | | | | ८,७०९ |
| | **(२) भिवंडी तालुका** | | | | |
| ९ | नवी खार | २३५ ३ १/४ | | २३५-३ १/४ | १३,५७५ |
| १० | पेंबार–पाडेन वाघर | २३९-३३-८ | २६५-१८-४ | ५०५-११-१२ | ५४,११५ |
| ११ | काळखार-खारबाव | १४२-२७-० | | १४२-२७-० | १२,०८६ |
| १२ | मालकी खार | ११५.३८ १/४ | | ११५-३८ १/४ | १३,०९८ |
| १३ | काळखार कारोळी | १९८-२३-० | ०-१५-० | १९८-३८-० | १८,२५१ |
| १४ | गांवखार–जानद्रुखी | ९३.१४ १/२ | | ९३.१४ १/२ | ६,३६६ |
| १५ | गांवखार केवणी | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | **(३) वसई तालुका** | | | | |
| १६ | ससूनवघर | ११२१.१६ $\frac{५}{२}$ | | ११२१-१६ $\frac{५}{२}$ | ६१,८९८ |
| १७ | पाण्याची बरची | ३७०-१६-४ | ९- ६-८ | ३७९-२२-१२ | १३,४२२ |
| १८ | किला खार | १६९-३०-१४ | ११६-३८-० | २८६-२८-१४ | ३९,४९६ |
| १९ | शिरगांव–कोठे | १७३-३१ $\frac{३}{४}$ | | १७३-३१ $\frac{३}{४}$ | २६,१२६ |
| २० | जुचंद्र राजवळी | १९९-३९ $\frac{५}{२}$ | | १९९-३९ $\frac{५}{२}$ | २४,७४५ |
| | **(४) डहाणु तालुका** | | | | |
| २१ | डहाणू-मासोळी | १३०-२० $\frac{५}{२}$ | ९- ९-० | १३९-२९ $\frac{५}{२}$ | ८३८ |
| | **(५) पालघर तालुका** | | | | |
| २२ | पुरंदरे खार | १५९-२१ $\frac{३}{४}$ | | १५९-२१ $\frac{३}{४}$ | २२,४८८ |

जिल्ह्यांत लागवडीखालीं असणारीं एकूण जमीन तीन लाख, ८० हजार एकर असून खार लॅन्ड बोर्डाच्या मदतीनें गेल्या आठ वर्षांत जिल्ह्यांत १५ लाख एकर खार जमीन लागवडीखालीं आणली आहे. जिल्ह्यांत एकूण ३७ योजना खार लॅन्ड बोर्डानें पूर्ण केल्या आहेत. त्यासाठीं आलेल्या खर्चाची रक्कम १४ लाख रुपये इतकी आहे.

# शैक्षणिक प्रगति

ठाणें जिल्हा हा प्रामुख्यानें मागासलेल्या विभागांत मोडतो. जिल्ह्यांतील बारा तालुक्यांपैकीं पांच तालुक्यांचा समावेश वर्गीकृत विभागांत करण्यांत आला आहे. ते तालुके म्हणजे डहाणू, जव्हार, शहापूर, तळाश्री व मोखाडा हे होत.

प्राथमिक शिक्षणाच्या सोयीसाठीं ११ तालुक्यांचे २० विभाग पाडण्यांत आले आहेत.

जिल्ह्याच्या सुमारें १६,५३,३२७ लोकसंख्येपैकीं, फक्त ५,०५,६६९ इतके लोक साक्षर आहेत.

**प्राथमिक शाळा** जिल्ह्यांतील १६५१ प्राथमिक शाळांपैकीं चार सरकारी, १४२३ जिल्हा लोकल बोर्डाच्या व २२४ खाजगी आहेत. शाळेंत जाणाऱ्या एकूण विद्यार्थ्यांची संख्या १,६२,५३२ असून त्यांत १,०१,५३८ मागासलेल्या जातीचे विद्यार्थी आहेत.

मूलोद्योग शाळा स्कूल बोर्डाच्या १४२३ शाळांपैकीं १७८ मूलोद्योगी शाळा आहेत. सूत मूलोद्योगाच्या १६२ शाळा असून त्यांत ४३,८८५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शेती मूलोद्योगाच्या आठ शाळेंत २७५७ विद्यार्थी आहेत. सुतार कामाच्या आठ शाळांतून ४७५५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. स्कूलबोर्डाच्या ताब्यांतील १४२३ शाळा ७ वी पर्यंत म्हणजे पूर्ण प्राथमिक आहेत. त्यांत ७४,६९० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. स्कूल बोर्डाच्या ताब्यांतील एकूण शाळांपैकीं ९९६ एक शिक्षकी शाळा आहेत.

स्कूल बोर्डाच्या एकूण १४२३ शाळांतून ३३५९ शिक्षक आहेत. त्यापैकीं १०६७ प्रशिक्षित शिक्षक व ४७८ प्रशिक्षित शिक्षिका आहेत.

**वसतिगृहें** जिल्ह्यांत एकूण मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठीं १० वसतिगृहें आहेत आणि त्यांतील विद्यार्थ्यांची संख्या ३६५ एवढी आहे. स्कूल बोर्डामार्फत या वसतीगृहांवर प्रतिवर्षीं ७७०४२ रु. खर्च केला जातो.

१४७४ प्राथमिक शाळांपैकीं ४८४ शाळांच्या इमारती स्कूल बोर्डाच्या मालकीच्या आहेत. ६२९ शाळा भाड्याच्या इमारतींत असून ३६१ इमारती मोफत वापरल्या जातात. मागासलेल्या एकूण २९,९०५ विद्यार्थ्यांपैकीं ४७८७ अनुसूचित जातींचे १५५४० अनुसूचित जमातींचे व ९५७८ इतर वर्गांचे विद्यार्थी

होते. व एकूण १२,५९६ मुलींपैकीं २३६७ अनुसूचित जातींच्या ३७९५ अनुसूचित जमातींच्या व ६४४१ इतर मागासलेल्या वर्गांच्या मुली होत्या.

**खास सवलती**

(१) मागासलेल्या विभागांत ५० टक्क्यांपेक्षां अधिक विद्यार्थ्यांना हजर ठेवण्याचें काम करणाऱ्या विद्यार्थ्यांना ५। रु. जादा पगार दिला जातो.

(२) बोर्डी, कोसबाड व जव्हार येथील विद्यालयांत प्रशिक्षण घेतलेल्या शिक्षकांना मागासलेल्या विभागांत काम करण्याबद्दल १२-५० रुपयांपर्यंत खास पगार दिला जातो.

(३) शिक्षकांची भरती करतांना ४१० जागा मागासलेल्या जातीच्या विद्यार्थ्यांसाठीं राखून ठेवण्यांत येतात.

(४) बिगर मागासलेल्या जातींतील शिक्षकांकडून घेण्यांत येणारा बॉण्ड मागासलेल्या जातीच्या शिक्षकांकडून घेण्यांत येत नाहीं.

**दुय्यम शिक्षण**

शहरामध्यें ज्या दुय्यम शाळा चालविल्या जातात त्यांना सरकारतर्फे ४५ टक्के मदत देण्यांत येते. खेड्यांतील दुय्यम शाळांना मात्र ही ५० टक्के या प्रमाणांत देण्यांत येते. खेड्यांतून शिक्षणाचा प्रसार व्हावा यासाठीं खेड्यांतील दुय्यम शाळांना शहरांतील दुय्यम शाळांपेक्षां ५ टक्के मदत अधिक दिली जाते. पूर्वींच्या मुंबई राज्यांत सरकारकडून दुय्यम शाळांना मिळणारी मदत अनुक्रमें ३० व ३३⅓ टक्के या प्रमाणांत होती. महाराष्ट्र सरकारनें ती जवळ जवळ दहा टक्क्यांनीं वाढवून शैक्षणिक संस्थांची आर्थिक बाजू सुधारण्याचा प्रयत्न केला आहे.

पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या प्रारंभी ठाणें जिल्ह्यांत एकूण ५८ खाजगी संस्थांच्या व तीन सरकारी दुय्यम शाळा होत्या. पहिली पंचवार्षिक योजना पूर्ण झाली त्यावेळीं खाजगी संस्थांच्या दुय्यम शाळांची संख्या सत्तरावर गेली. यापैकीं आतां १७ दुय्यम शाळा बृहन्मुंबईंत सामील झालेल्या उपनगरांत आहेत.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत उपरोक्त संख्या आणखी सातनी वाढली. आज ठाणें जिल्ह्यांत एकूण ८१ दुय्यम शाळा आहेत.

महाराष्ट्र व गुजरात या राज्याच्या निर्मितीनंतर ठाणें जिल्ह्यांतील उंबरगांव तालुका गुजरात राज्यांत गेल्यावर त्या भागांतील चार दुय्यम शाळाही त्या भागांत गेल्या.

जिल्ह्यांतील दुय्यम शाळांतून एकूण २७ हजार २९७ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

**बहुउद्देशीय शाळा**

उपरोक्त शाळांपैकीं पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत ठाण्यांतील सरकारी मुलींची शाळा, व बोर्डी येथील एस्. पी. हकिमजी हायस्कूल या दोन दुय्यम शाळांचें बहुउद्देशीय शाळांत रूपान्तर करण्यांत आलें. वरीलपैकीं मुलींच्या शाळांत गृहशास्त्र व मुलांच्या शाळेंत शेती या विषयाचा अंतर्भाव करण्यांत आला. ठाणें येथील बी. एच. हायस्कूलचें रूपान्तरही १९४७ मध्यें तांत्रिक शाळेमध्यें करण्यांत आलें. ह्या शाळेमधील विद्यार्थ्यांना सरकारतर्फे घेतल्या जाणाऱ्या तांत्रिक शिक्षणाच्या परीक्षांस बसतां येते. वसई येथील आर. पी. वाघ हायस्कूल व अम्बरनाथ येथील एम. जी. वैद्य हायस्कूल या दोन्ही शाळांचें रूपान्तर बहुविध शाळांत करण्यांत

आलें असून त्यापैकीं पहिल्या शाळेंत तांत्रिक व दुसऱ्या शाळेंत शेतीविषयक शिक्षणाची सोय करण्यांत आली आहे.

पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत दुय्यम शाळांतील ४० टक्के शिक्षक प्रशिक्षित नव्हते. त्यासाठीं दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत जास्तींत जास्त शिक्षकांना प्रशिक्षित होण्याची संधी लाभेल अशा प्रकारच्या सवलती देण्यांत आल्या. खाजगी संस्थांना एस. टी. सी. चे वर्ग चालविण्याची परवानगी देण्यांत आली. शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठीं शिबिरें भरविण्यांत येऊन त्यामधूनही त्यांना शिक्षण देण्यांत येते. दुय्यम शाळांतून रेडिओ, प्रोजेक्टर, फिल्मस् पुरविण्यांची योजनाही सरकारनें हातीं घेतली आहे. या जिल्ह्यांतील अनेक दुय्यम शाळांनीं या योजनेचा फायदा घेतला आहे.

**शिक्षकांचें प्रशिक्षण**

गरीब समाजांतील जास्तींत जास्त विद्यार्थ्यांना शिक्षणाचा लाभ घेतां यावा म्हणून सरकारतर्फे त्यांना जास्तींत जास्त शिष्यवृत्त्या व इतर सवलती देण्यांत येतात. १९५९–६० मध्यें या जिल्ह्यांतील एकूण ७८८ विद्यार्थ्यांना मोफत शिक्षणाचा फायदा मिळाला. त्यासाठीं सरकारनें या वर्षी एकूण ३८,७२१ रुपये खर्च केले.

**मोफत शिक्षण**

जिल्ह्यामध्यें अधिकाधिक दुय्यम शाळा उघडल्या जाव्यात यासाठीं सरकारतर्फे शैक्षणिक संस्थांना त्यांच्या इमारतींसाठीं कर्ज देण्यांत येते. १९५९–६० या सालीं सरकारतर्फे अशा कामासाठीं एकूण ९९ हजार रुपयांची रक्कम कर्जरूपानें वाटण्यांत आली.


ग्रामीण भागांत दुय्यम शिक्षणाच्या सोयी उपलब्ध नसल्यामुळें बऱ्याचशा विद्यार्थ्यांना शहरांत यावे लागते. तेव्हां त्यांच्या राहण्यासाठीं वसतिगृहांची व्यवस्था असावी म्हणून सरकारतर्फे खाजगी संस्थाना या करितां कर्ज देण्यांत येतें.

तांत्रिक शिक्षणाच्या दोन शाळा अनुक्रमें ठाणें व उल्हासनगर या ठिकाणीं आहेत.

भारतास स्वातंत्र्य मिळाल्यावर लगेच त्यास एका मोठ्या संकटास तोंड द्यावें लागलें. पाकिस्तानमध्यें राहणाऱ्या हिंन्दु, शीख आदि अल्पसंख्यांकामध्यें घबराट निर्माण झाली. त्याचें पर्यवसान फार मोठ्या संख्येच्या स्थलांतरांत झालें. ह्या स्थलांतरितांच्या पुनर्वसनाची फार मोठी समस्या मध्यवर्ती सरकारच्या समोर उभी राहिली. ह्या पुनर्वसनाच्या कार्यासाठीं ठिकठिकाणीं स्थलांतरितांसाठीं वसाहती उभारल्या. त्या वसाहतींपैकीं कल्याणजवळील उल्हासनगर ही वसाहत होय. ह्या वसाहतीची उभारणी झाल्यावर त्यांच्या उपजीविकेचा प्रश्न सरकारपुढें उत्पन्न झाला. हा भाग मुंबईनजीक असल्यामुळें व्यक्तिशः पुष्कळ स्थलांतरितांना आपला उदरनिर्वाहाचा प्रश्न सोडविण्यास मदत झाली. पण सामान्य जनांस ते सहज शक्य नव्हते. तसेंच स्थलांतरितांमधील मुलांची व तरुणांची आबाळ होऊं नये म्हणून मध्यवर्ती सरकारनें कॅम्प चारमध्यें पुनर्वसन उत्पादन केंद्र व व्होकेशनल ट्रेनिंग सेंटर या संस्थांची स्थापना केली. उद्देश हा कीं, स्थलांतरितांमध्यें जे कारागीर असतील त्यांना रोजगार मिळावा व त्यांच्या मुलांस औद्योगिक शिक्षण मिळावें. ही दुहेरी दृष्टि ठेऊन औद्योगिक-शिक्षणास योग्य असे निरनिराळे विभाग सुरूं केले. त्यांना इलेक्ट्रिशिअन, इलेक्ट्रोप्लेटर, सुतारकाम, फिटर, लाइनमन, वायरमन, मोटार मेकॅनिक, मोल्डर पॅटर्नगेअर, टर्नर, वेल्डर इत्यादि विभागांतील कारागीर

**उल्हासनगर येथील धंदेशिक्षण**

# उद्योग-धंदे



भांडी
मध
बैलगाडया
लांकूड
कोळसा
मासळी
लुगडी
मीठ
बुरुडकाम
कापड गिरण्या
बांगडया
विटा
तांदळाची गिरणं
दूध
औषध
उंबरगांव
डहाणू
ड हा णू
चिंचणी
तारापूर
ज व्हा र
जव्हार
मोखाडे
मो खा डे
पालघर
पा ल घ र
सफाळा
वाडा
वा डा
श हा पू र
शहापूर
व स ई
वसई
भिवंडी
भि वं डी
भाईदर
ठाणें
ठा णें
बांद्रे
क ल्या ण
कल्याण
मु र बा ड
मुरबाड

तयार होण्यासाठीं एक शिक्षणक्रम सुरूं केला. तसेंच शिवणकाम, नीटिंग, हॅन्ड कम्पोझिंग, प्रूफ रीडिंग इत्यादि मूलोद्योगी विभागही सुरूं केले व या विभागांतील कांहीं भागांत स्त्रिया व मुली यांना प्रवेश देऊन स्त्रियांनाही स्वतःच्या पायावर उभे राहण्याची संधी दिली. ह्या व्यवस्थेचा फायदा हजारो स्थलांतरितांनीं फार मोठ्या प्रमाणावर घेतला व त्यांतील कारागीरांस रोजगारही मिळूं लागला.

सन् १९४८ते १९५८ पर्यंत जवळ जवळ दहा वर्षें हे सर्व विभाग स्थलांतरितांसाठींच कार्य करीत होते. सन १९५८ सालीं मध्यवर्ती सरकारनें राज्य सरकारच्या ताब्यांत ही संस्था दिली. कारण मध्यवर्ती सरकारचा मूळ उद्देश सफल झाला होता. याकरितां अगदीं पद्धतशीर शिक्षण देऊन धंद्यांतील तंत्र आत्मसात् करणारे कुशल कारागीर तयार करण्याच्या योजनेचा **कुशल कारागीर** फायदा मुंबईच्या उपनगरांतील जनतेस मिळावा या उद्देशानें सदर शिक्षणक्रम ह्याही संस्थेंत सुरूं केला.

मुंबईतील औद्योगिक वसाहत कल्याण परिसरांत होणार असल्यानें भविष्य काळांत अनेक कारखानें या भागांत सुरूं होणार आहेत. ह्या कारखान्यांत निरनिराळ्या विभागांतील वाकबगार कारागीर मिळाले तर उत्पन्नाच्या कार्यांत फार मोठी मदत होणार आहे. ह्या पुढील गोष्टींवर लक्ष ठेऊन सरकारनें उल्हासनगर येथील धन्दे शिक्षण संस्थेची फार मोठ्या प्रमाणावर वाढ **औद्योगिक वसाहत** करण्याचें ठरविलें आहे. ऑगस्ट १९६० पासून सुरू झालेल्या शिक्षणक्रमांत ८० विद्यार्थ्यांची वाढ केली आहे. सध्या सदर संस्थेंत २५६ टेक्निकल ट्रेडचे व ९६ व्होकेजनल ट्रेडचे मिळून एकंदर ३५२ विद्यार्थी व विद्यार्थिनीं शिक्षण घेत आहेत. फेब्रुवारी १९६२ पासून सुरूं होणाऱ्या शिक्षणक्रमाच्या वेळीं विद्यार्थ्यांची ही संख्या ४३२ एवढी असेल. सदर संस्थेचें नांव बदलून तें " इन्डस्ट्रिअल ट्रेनिंग इन्स्टीटच्यूट " असें ठेवलें आहे.

कारखान्यांत प्रत्येक कारागीराला एका विशिष्ट तऱ्हेचें काम करावें लागतें व त्या विभागांत तो कुशल कारागीर ठरावा लागतो. याचा विचार करून अभ्यासक्रम ठरविण्यांत आला आहे. सध्या सदर संस्थेंत (१) सुतारकाम, (२) इलेक्ट्रोप्लेटर, ( गिलीटकाम ) (३) इलेक्ट्रीशिअन, (४) फिटर , (५) वायरमन, (६) मशिनिस्ट, (७) मोटर **अभ्यासक्रम** मेकॅनिक, (८) मोल्डर, (९) पॅटर्न मेकर, (१०) शीट मेटल, (११) टर्नर, (१२) वेल्डर हे टेक्निकल विभाग असून, (१) शिवणकाम ( स्त्रियां व मुलांचें ) (२) शिवणकाम ( पुरुष ), (३) नीटिंग (हॅन्ड व मशीन) (४) हॅन्ड कॉम्पोझिंग आणि (५) प्रूफ रीडिंग हे व्होकेशनल विभाग आहेत.

टेक्निकल विभागाचा अभ्यासक्रम दोन वर्षांचा असून त्यांतील दीड वर्ष ह्या संस्थेंत दररोज सात तास याप्रमाणें प्रत्यक्ष काम करून व उरलेला सहा महिन्यांचा अभ्यासक्रम एखाद्या प्रसिद्ध **तांत्रिक** कारखान्यांत उमेदवारी करून पुरा केला जातो. **विभाग**

व्होकेशनल विभागांतील शिक्षणक्रम एक वर्षाचा असून तो सर्व शिक्षणक्रम ह्या संस्थेंतच पुरा केला जातो. स्त्रियांमध्यें ह्या वर्गासंबंधी आकर्षण निर्माण झालें असून दिवसें-दिवस ह्या संधीचा त्या जास्त फायदा घेत आहेत.

उल्हासनगर वसाहतीची कल्पना व त्यांत असलेल्या संस्थेची माहिती सामान्य जनांस व्हावी म्हणून ही संस्था हालवून ठाण्याजवळ मुलुंडमध्यें न्यावी असा सरकारचा विचार आहे. त्या दृष्टीनें मुलुंडला सुमारें १२ ते १५ एकर जागा मिळविण्याचा सरकारचा प्रयत्न सुरू आहे. ती जागा मिळाल्यानंतर ही संस्था फार मोठी व नमुनेदार होईल असा अधिकाऱ्यांचा विश्वास आहे. तसें झाल्यास कुशल कारागिरांची कारखान्यांतून होणारी मागणी जास्त प्रमाणांत पुरविणें शक्य होईल. आज अशी परिस्थिती आहे कीं, कारखान्यांस त्यांच्या जरूरीएवढे कुशल कारागीर मिळूं शकत नाहीत. ह्या संस्थेंतून पास होऊन गेलेल्या विद्यार्थ्यांस विनासायास व अल्पावधींत सहा महिन्याच्या शिक्षणक्रमासाठीं प्रवेश मिळतो व तशी अधिक मागणी कारखानदारांकडून संस्थेच्या चालकांकडे होत असते.

**छात्रवृत्ति**

विद्यार्थ्यांना हें शिक्षण मोफत दिलें जातें. याशिवाय विद्यार्थ्यांना दरमहा २५ रुपये छात्रवृत्ति देण्यांत येते. वरील छात्रवृत्ति मागासलेल्या विद्यार्थ्यांना व अतिशय कमी मिळकतीच्या विद्यार्थ्यांस मिळते. अभ्यासक्रमास लागणारें साहित्य सर्व विद्यार्थ्यांना मोफत पुरविण्यांत येते. शिवाय गणवेष मोफत पुरविला जातो.

**समाज कल्याण**

देशाचा विकास साधण्यासाठीं देशांतील लोकांचा विकास साधण्याची अत्यावश्यकता आहे. आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून लोकांचीं मनें विकसित करण्याच्या दृष्टीनें सरकारनें अनेक योजना हातीं घेतल्या आहेत. आपल्या देशांत असाही एक मोठा समाज आहे कीं, जो सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिकदृष्ट्या फारच मागासलेला आहे. त्याच्यांत सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक दृष्ट्या सुधारणा घडवून आणण्यासाठीं समाज कल्याणाची एक खास योजना हातीं घेण्यांत आली. या योजनेचा फायदा प्रामुख्यानें हरिजन, आदिवासी व इतर मागासलेल्या जमातींच्या लोकांना मिळतो. त्यांच्या उन्नतीसाठीं, उत्कर्षासाठीं त्यांना अनेक सवलती उपलब्ध करून देण्यांत आल्या आहेत.

या जिल्ह्याच्या समाज कल्याण अधिकाऱ्यांची कचेरी ठाण्यांत आहे.

अस्पृश्यता निवारणाचें काम उत्कृष्टपणें करणाऱ्या दोन खेड्यांना प्रतिवर्षी १००० रुपयांचें पहिलें व ५०० रुपयांचें दुसरें बक्षीस देण्यांत येतें.

या जिल्ह्यांतील भिवंडी येथें या विभागातर्फे बालवाडी चालविण्यांत येते. लहानपणींच मुलांच्या मनावर स्पृश्यास्पृश्यभेदाचे संस्कार होऊ नयेत यासाठीं हीं केंद्रें चालविलीं जातात. माणिकपूर व कल्याण येथें अशीं दोन संस्कार केंद्रेंहि चालविण्यांत येतात.

**मागासलेल्या वर्गांतील मुलांना सवलती**

मागासलेल्या वर्गांतील मुलांना सर्व प्रकारच्या शिक्षणासाठीं या विभागातर्फें सवलती देण्यांत येतात. फी माफ करणें, शिष्यवृत्त्या देणें, शाळा साहित्याचा मोफत पुरवठा करणें, वसतिगृहांत राहण्याची व खाण्याची मोफत सोय करणें इत्यादि सवलतीद्वारें या समाजांतील विद्यार्थ्यांना सुखसोयी उपलब्ध करून देण्यांत येतात. उच्च व परदेशीय शिक्षणासाठींही ह्या वर्गांतील विद्यार्थ्यांस खास सवलती देण्यांत येतात.

१९५९–६० सालीं या जिल्ह्यांतील माध्यमिक शाळांतील ५१३४ विद्यार्थ्यांना मोफत शिक्षणाचा लाभ घेतां आला. ११९ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देण्यांत आल्या.

मागासलेल्या जमातींतील लोकांना किरकोळ धंद्याकरितां व्याजानें व दीर्घ मुदतीचीं कर्जे देण्यांत येतात. दूध-दुभत्याचा व्यवसाय करण्याच्या दृष्टीनें गाई–म्हशी खरेदी करण्यासाठींहि आर्थिक मदत देण्यांत येते. जिल्ह्यांत मागासलेल्या वर्गांच्या एकंदर चाळीस जंगल कामगार सोसायटचा असून त्यामार्फत सहकारी तत्त्वावर व्यवसाय चालविण्यांत येतात.

**उद्योग धंद्याकरितां कर्जें**

मागासलेल्या वर्गांतील लोकांस घरें बांधण्यास जमीन व घरबांधकामास आर्थिक मदत देण्यांत येते. जिल्ह्यांत या योजनेनुसार एकंदर २९४ घरें बांधण्यांत आलीं आहेत.

**घरें बांधण्याकरितां जमीन व मदत**

पाण्याच्या सोयीसाठीं मागासलेल्या वर्गांतील वस्तींत विहिरी बांधण्यांत येतात. या वर्गांतील लोकांना नोकऱ्या मिळवून देण्याचा प्रयत्नहि केला जातो. नोकऱ्यांमध्यें या जमातींसाठीं कांहीं जागा राखून ठेवण्यांत येतात.

# स्थानिक स्वराज्य संस्था

आपल्या देशाच्या घटनेमध्यें प्रत्येक गांवासाठीं ग्रामपंचायत स्थापन करण्यांत येऊन ग्रामीण समाज संघटित, स्वायत्त, स्वयंपूर्ण बनविण्याचें मार्गदर्शक तत्त्व स्वीकारण्यांत आलें आहे. इतर राज्या-प्रमाणेंच महाराष्ट्र राज्यांतहि ग्रामपंचायती स्थापन झाल्या आहेत. ठाणें जिल्ह्यांत आतांपर्यंत ७७५ ग्रामपंचायती स्थापन झाल्या आहेत.

**ग्रामपंचायतीची तालुकानिहाय संख्या पुढीलप्रमाणें आहे.**

| **तालुका** | **ग्रामपंचायतींची संख्या** |
|---|---|
| ठाणें | ४० |
| कल्याण | ७० |
| मुरबाड | ७६ |
| वसई | ६३ |
| वाडा | ७० |
| भिवंडी | ७७ |
| शहापूर | ८२ |
| पालघर | १०१ |
| डहाणू | ७५ |
| तळाश्री | २१ |
| जव्हार | ६० |
| मोखाडा | ४० |

जिल्ह्यांतील सर्व ग्रामपंचायतींना सरकारकडून सुमारें पांच लाख रुपयांचें वार्षिक अनुदान दिलें जातें.

पाणीपुरवठा, रस्तेदुरुस्ती आणि आरोग्य या आवश्यक कामाबरोबरच ग्रामीण विकासाच्या पूर्ततेची जबाबदारी ग्रामपंचायती पूर्ण करतात.

पंचायती एकतेच्या भावनेनें गांवांतील सर्व कृत्रिम भेदभावांना बाजूस सारून गांवांत एक मजबूत संघशक्ति निर्माण करतात. स्वच्छतेची मोहीम सुरू करून वातावरण निर्मळ करतात व गांवांचें आरोग्य सुधारतात. दारुबंदीचा प्रचार करून गांवांतील व्यसनांना आळा घालतात. ज्ञान–विज्ञानाच्या साह्यानें अज्ञान व टाकावू रुढी नष्ट करतात. गांवांतील जीवन विविधतापूर्ण व संपन्न करतात. गांवांतील स्वच्छते-बरोबर गांवकऱ्यांच्या मनांतील मलिनता दूर करण्याची महान् कामगिरीहि पंचायती पार पाडतात.

**जिल्ह्यांत पुढील आठ नगरपालिका आहेत.**

| | | लोकसंख्या |
|---|---|---|
| ठाणें | तालुका ठाणें | १,०१,१०३ |
| कल्याण | " कल्याण | ७३,४८७ |
| उल्हासनगर | " " | १,०७,७५८ |
| डोंबिवली | " " | . . . |
| अंबरनाथ | " " | २०,९०३ |
| वसई | " वसई | २२,५६५ |
| जव्हार | " जव्हार | . . . |
| भिवंडी | " भिवंडी | १,१४,९१२ |

**लोकल बोर्ड**

या जिल्ह्याच्या लोकलबोर्डावर ५४ सभासद असून त्यापैकीं दोन जागा स्त्रियांसाठीं व आठ जागा हरिजनांसाठीं राखीव आहेत. बोर्डाचे एक अध्यक्ष व एक उपाध्यक्ष आहे. जिल्हा बोर्डाची कचेरी ठाण्यांत आहे. बोर्डाचा ठाण्यांत 'कै. आण्णासाहेब वर्तक' हा स्वतःच्या मालकीचा भव्य हॉल आहे. ग्रामीण भागांत दळणवळणाची सोय करणें, पाणीपुरवठा, ग्रामीण आरोग्य इत्यादि विविध कामांकरितां बोर्डाच्या सदस्यांच्या विविध समित्या नेमलेल्या आहेत. लोकल फंड, सेस, सरकारी मदत, वर्गण्या व देणग्या यापासून बोर्डाला उत्पन्न मिळतें. त्यांतून ग्रामीण विभागांतील रस्ते व जोड रस्ते तयार करणें, त्यांची दुरुस्ती करणें व ग्रामीण विभागांतील पाणीपुरवठा व औषधोपचाराची सोय करणें, ह्या गोष्टी बोर्डाला प्रामुख्यानें कराव्या लागतात.

**ग्रामीण रेडिओ**

ह्या जिल्ह्यांतील बहुसंख्य ग्रामीण जनता दूरवर विखुरलेल्या लहान खेड्यांतून राहात असल्यामुळें बाहेरच्या जगाशीं तिचा क्वचितच संबंध येतो. अशा जनतेचा बाहेरील जगाशीं व घडामोडीशीं संबंध जोड-ण्याचें महत्त्वाचें कार्य " ग्रामीण रेडिओ " योजनेद्वारें केलें जातें. आतापर्यंत जिल्ह्यांत १३० रेडिओ सेटस् बसविण्यांत आले आहेत. दैनंदिन घडामोडींच्या वृत्तांबरोबरच शेतीच्या आधुनिक पद्धतीची माहिती, ग्रामीण स्वास्थ्य व आरोग्य अशा स्वरूपाच्या प्रश्नांची चर्चा करणारे खास कार्यक्रम आकाशवाणीच्या विविध केंद्रावरून प्रासारित केले जात असल्यामुळें जिल्ह्यांत अशा रेडीओची मागणी वाढत आहे.

**सामुदायिक श्रवणासाठीं रेडिओ**

महाराष्ट्र सरकारच्या प्रसिद्धि विभागाच्या ग्रामीण रेडिओ विभागातर्फे सामुदायिक श्रवणासाठीं ग्रामपंचायती, सहकारी संस्था, नगरपालिका अथवा यासारख्या जबाबदार संस्था यांना रेडिओ सेटस् मिळू शकतात. सुरवातीला रेडिओ बसविण्याची वर्गणी रु. १७५ भरावी लागते व त्याचा वर्षभराचा दुरुस्तीचा व बॅटरीचा खर्च रु. ६० भरावा लागतो. या जिल्ह्यांतील रेडिओ बसविण्यासाठीं व त्याची दुरुस्ती करण्यासाठीं एका स्वतंत्र टेक्निशियनची नेमणुक करण्यांत आली आहे व त्याच्याकडे रेडिओ बसविण्याचें व दुरुस्तीचें काम सोंपविलें आहे.

**जिल्हा अल्पबचत मंडळ**

राष्ट्रोन्नतीसाठीं प्रत्येकाचा हात भार लागावा आणि राष्ट्राला अधिक संपन्नतेचें जीवन जगतां यावें या दृष्टीनें ग्रामीण पातळीवरहि अल्प बचतीचें कार्य नेऊन पोहचविण्याकरितां जिल्ह्यांतील विविध क्षेत्रांतील व्यक्ति, कार्यकर्ते व सरकारी अधिकारी यांचें जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालीं एक अल्पबचत सल्लागार मंडळ कार्य करते.

**जिल्हा विकास मंडळ**

जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीनें कार्यक्रम आंखणें व सरकारला सल्ला देणें ही जिल्हा विकास मंडळाचीं कामें आहेत. जिल्हा विकास मंडळांत सरकारी सभासद २८, बिनसरकारी सभासद ३७, खासदार दोन, आमदार ११, एम. एल. सी. एक असे एकूण ९२ सभासद आहेत. मार्गदर्शनाच्या दृष्टीनें कांहीं महत्त्वाच्या विभागाच्या विकासाचा विचारविनिमय व अंमलबजावणी व्यवस्थितपणें व्हावी म्हणून १२ उपसमित्या नेमल्या आहेत. त्या पुढील प्रमाणें आहेत–

शेती ग्राम विकास समिती
सहकार उपसमिती
दारुबंदी उपसमिती
जिल्हा आरोग्य उपसमिती
रस्तें व पाटबंधारे उपसमिती
जिल्हा जंगल सल्लागार उपसमिती
लेबर कॉन्ट्रॅक्ट उपसमिती
जिल्हा पोलीस सल्लागार उपसमिती
समाज शिक्षण उपसमिती
समाज कल्याण उपसमिती
राष्ट्रीय विस्तार व समाज विकास उपसमिती
ग्रामीण पुरवठा उपसमिती

प्रत्येक उपसमितीवर जिल्ह्यांतील त्या त्या विभागाच्या मुख्याधिकाऱ्यांची चिटणीस म्हणून नेमणुक करण्यांत आली आहे. जिल्हा विकास मंडळाचे अध्यक्ष जिल्हाधिकारी हे असून उपाध्यक्ष व चिटणीस ह्यांची बिनसरकारी व सार्वजनिक क्षेत्रांतील नामवंत कार्यकर्त्यांमधून सरकारनें नियुक्ती केली आहे.

पंचवार्षिक योजनेंत ग्रामीण भागांचा सर्वांगीण विकास करून त्या भागांतील जनतेच्या राहणीचा दर्जा वाढविण्यासाठीं समाज विकास व राष्ट्रीय विस्तार योजनांचा कार्यक्रम हातीं घेण्यांत आलेला आहे.

या योजनेचे तीन प्रमुख टप्पे आहेत. ते म्हणजे राष्ट्रीय विस्तार कार्यक्रम, समाज विकास कार्यक्रम व त्यानंतर विकासाच्या नंतरच्या स्थितींच कार्यक्रम हे होत. पहिल्या दोन स्थितीचा काल प्रत्येकीं तीन वर्षांचा असतो. प्रत्येक विकास गटाकरितां एक गट विकास अधिकारी आहे. विकास कार्याची अंमलबजावणी व संघटन यांची जबाबदारी त्यांच्यावर असते. त्यांच्या मदतीला शेती, उद्योगधंदे, सहकार, शिक्षण, आरोग्य वगैरे विभागाकरितां एक एक मदतनीस असतो. चार-पांच गांवांना एक या प्रमाणें ग्रामसेवक असतात. ग्रामसेवक हा जनता व सरकार यांमधील महत्त्वाचा दुवा आहे. समाजांतील सर्व थरांच्या लोकांशीं त्याचा संबंध असतो. त्यामुळें सर्व विकास कार्य त्याच्या कार्यक्षमतेवरच अवलंबून असते.

**राष्ट्रीय विस्तार व समाज विकास योजना**

स्थानिक परिस्थितीप्रमाणें उपलब्ध साधनांचा आणि लोकांच्या आवश्यक अशा गरजांचा विचार करून विकास कार्याची आंखणी केली जाते. त्यासाठीं गट विकास अधिकारी निरनिराळ्या मार्गांनीं जनतेशीं अधिक संपर्क ठेवतात. त्यांत विकास योजनेंतून लोकांना कोणती मदत मिळेल व जनतेस यांत कोणता वांटा उचलला पाहिजे याची तिला माहिती दिली जाते.

सुधारलेल्या बी–बियाण्यांचा वापर, रासायनिक खताचें वांटप, हिरवे खत व सुधारलेल्या पद्धतीनें शेतीची मशागत वगैरे कामें या गटाकडून केलीं जातात. त्याचप्रमाणें समाज शिक्षणाचा कार्यक्रम हातीं घेण्यांत आला असून जनतेची बौद्धिक व सांस्कृतिक उन्नति करण्यासाठीं भजनी मंडळें, नाटयमंडळें, व्यायाम शाळा, महिला मंडळें वगैरे गोष्टींचा अंतर्भाव त्यांत करण्यांत आलेला आहे. त्याचप्रमाणें कांहीं गांवांत समाज मंदिरें पण बांधण्यांत आलीं आहेत. खेड्यांतील वातावरण स्वच्छ ठेवण्यासाठीं पाणीपुरवठा, आरोग्य केन्द्रे आदींची व्यवस्था करण्यांत आलेली आहे. लहान मुलांसाठीं बालोद्यान केंद्रें पण स्थापन करण्यांत आलेलीं आहेत. सहकाराशिवाय बऱ्याच गोष्टी साध्य होत नसल्यामुळें विकास गटामध्यें ठिकठिकाणीं सहकारी सोसायटया स्थापन करण्यांत आलेल्या आहेत.

**विकास कार्याची रूपरेखा**

**ठाणें जिल्हयांतील समाज विकास व राष्ट्रीय विस्तार योजना गट**

प्रथमावस्थचें गट–

शहापूर
मुरबाड
पालघर
डहाणू ( पाट )
वाडा
डहाणू
जव्हार
दुसऱ्या अवस्थेचे गट

कल्याण

**बहुउद्देशीय गट**

मोखाडा

वरील गटांखेरीज खालीलप्रमाणें पूर्व प्राथमिक विकास गट सध्या सुरू आहेत.

भिवंडी

ठाणें

वसई

प्रत्येक विकास गटासाठीं गट विकास सल्लागार समित्या नियुक्त करण्यांत आल्या आहेत. सर्व गटांचा कारभार सदर समित्यांच्या सल्ल्यानें व सहकार्यानें केला जात असतो.

या शिवाय या जिल्ह्यांतील तळाश्री मागासलेल्या भागांसाठीं ट्रायबल ब्लॉक देण्यांत आला आहे.

**जिल्हा दारुबंदी कचेरी**

ठाणें येथें जिल्हा दारुबंदी अधिकाऱ्यांची कचेरी असून ग्रामीण भागांत सांस्कृतिक करमणुकीचे कार्यक्रम ठेवून या विभागातर्फें दारुबंदीचें कार्य केलें जातें. तसेंच नशायुक्त अथवा मादकपदार्थांवर या विभागामार्फत नियंत्रणहि ठेवलें जातें.

**एम्प्लॉयमेंट एक्स्चेंज कचेऱ्या**

सबंध महाराष्ट्र राज्यांत २४ एम्प्लॉयमेंट एक्स्चेंज कचेऱ्या व सात सब्-रिजनल एम्प्लॉयमेंट एक्स्चेंज कचेऱ्या आहेत. पैकीं ठाणें येथें एक एम्प्लॉयमेंट एक्स्चेंजची कचेरी या जिल्ह्याकरितां उघडली आहे. ह्या कचेरीची स्थापना १९४६ च्या सुमारास झाली. त्यावेळीं या केंद्राचें काम मर्यादित म्हणजे माजी सैनिकांना त्यांच्या योग्यतेप्रमाणें योग्य असा उद्योगधंदा मिळवून देण्याचें होतें.

१ नोव्हेंबर १९५६ सालपर्यंत एम्प्लॉयमेंट एक्स्चेंज कचेऱ्या सम्पूर्णतः केंद्र सरकारच्या अधिकार कक्षेमध्यें होत्या. तदनंतर या कचेऱ्यांचा शासनाधिकार राज्य सरकारकडे सोपविला गेला आहे. जिल्ह्यांतील नोकरी मिळवूं इच्छिणाऱ्या उमेदवारांना या ठिकाणीं नांवें नोंदवितां येतात. लोकसभेनें १९५९ मध्यें पास केलेल्या एम्प्लॉयमेंट एक्स्चेंज संबंधीचा कायदा महाराष्ट्र सरकारनें २ सप्टेंबर १९६० पासून संपूर्ण महाराष्ट्र राज्यांत लागू केला असून त्यान्वयें सरकारी, निमसरकारी आणि खाजगी कंपन्यामध्यें रिकाम्या झालेल्या जागा या विनियम कचेरीमार्फत भरण्याचें बंधन घातलें आहे. उमेदवाराची नांवनोंदणी झाली म्हणजे त्याच्या योग्यतेनुसार त्याला वरील कचेऱ्यांत व संस्थेंत या कचेरीमार्फत पाठविण्यांत येते. अशा तऱ्हेनें उमेदवाराला क्रमवार काम मिळवून देण्याचा प्रयत्न ही कचेरी करते.

केन्द्र सरकारनें उद्योग–व्यवसाय क्षेत्रांतील तपशिलवार माहिती गोळा करण्याची योजना आंखली असून त्या योजनेनुसार महाराष्ट्र सरकारनें मार्च १९५८ मध्यें केन्द्र सरकारच्या निरनिराळ्या कचेऱ्यांना व जून १९५८ मध्यें राज्य सरकारच्या निरनिराळ्या कचेऱ्यांना, निमसरकारी कचेऱ्यांना व स्थानिक स्वराज्य संस्थांना ही माहिती पुरविण्यांसाठीं पत्रकें पाठविलीं. या योजनेनुसार वर निर्देश केलेल्या प्रत्येक कचेरींत नियमितपणे प्रत्येक तिमाहीस त्यांच्या कचेरींत असणाऱ्या लोकांना किती माणसांची कमतरता भासते या संबंधीची माहिती पुरवावी लागते. या माहितीचा उपयोग राष्ट्रीय नियोजनासाठीं होतो. ही माहिती खाजगी व्यावसायिकांकडून जून १९६० पासून मागविण्यास सुरवात केली आहे.

# राजकीय विभाग



जिल्हा विकास मंडळ
तालुका विकास गट
बहु उद्देशीय विकास गट
सर्वोदय केंद्र
तालुक्याचें मुख्य ठिकाण
महालाचें मुख्य ठिकाण
पूर्व प्राथमिक गट
प्रथम अवस्था गट
द्वितीय अवस्था गट
तलासरी
डहाणू
कासा
जव्हार
मोखाडे
पालघर
वाडा
शहापूर
वसई
भिवंडी
ठाणें
कल्याण
मुरबाड

खाजगी व्यवसायामध्यें ज्यांच्याकडे पांच अथवा पांचहून अधिक लोक कामास आहेत अशा सर्व व्यावसायिकांकडून ही माहिती मागविण्यांत आली आहे. अशा तऱ्हेनें ठाणें जिल्ह्यांतील एकंदर व्यावसायिकांकडून ही माहिती मागविली जात आहे.

•

**स्थानिक संस्थांच्या विकास योजना**

ठाणें जिल्हा लोकल बोर्डाच्या कक्षेमध्यें ३७२१ चौ. मैलांचा १२१७९ लाख लोकवस्तीचा विभाग येतो. हातीं घेण्यांत आलेल्या व घ्याव्या लागणाऱ्या कामाचीं माहिती पुढें दिली आहे.

**वैद्यकीय मदत व सार्वजनिक आरोग्य**

१९५१–५२ ते १९५५–५६ या कालांत पुढील कामें पार पाडण्यांत आलीं.

प्रसूति गृह–चिंचणी ( ता. डहाणू )
प्रसूतिगृह–किन्हवली ( ता. शहापूर ) प्रारंभ २७ एप्रिल १९५२
दवाखाना व प्रसूतिगृह – मांडवी ( ता. वसई )
दोन दवाखानें – कुडुस ( ता. वाडा )
दवाखाना – वाशिंड ( ता. शहापूर )

याखेरीज जिल्हा लोकलबोर्डानें वज्रेश्वरी येथील दवाखाना व घोलवाडा येथील प्रसूति गृहाची व्यवस्था आपल्या ताब्यांत घेतली आहे. हे दवाखानें खाजगी व्यक्तींच्या पुढाकारानें निघाले.

लोकल बोर्डामार्फत जिल्ह्यांतील प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था जिल्हा स्कूल बोर्ड पाहाते. बोर्डानें सुमारें ५.३५ लाख रुपये खर्च करून शाळांच्या ६६ इमारती पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत बांधल्या.

**प्राथमिक शिक्षण** १९५६–५७ मध्यें‌ही हें काम चालूच होतें. व या काळांत ३९ खोल्यांच्या १५ इमारती शाळांसाठीं बांधण्यांत आल्या.

बोर्डानें स्वतःच्या पैशांतूनहि कांहीं विहिरी बांधल्या आहेत. तसेंच टेंभवली ( भिवंडी ), डाकीवली ( वाडा ), बाडा पोखरान ( डहाणू ), रानगांव ( वसई ), शिरगांव (वसई), दातिवरे ( पालघर ), अमणे ( भिवंडी ) येथील विहिरींची दुरुस्ती करण्यांत आली. १९५४ ते १९५७ मध्यें करण्यांत आलेल्या या कामासाठीं डायरेक्टर ऑफ सोशल वेल्फेअर यांच्याकडून मिळालेली रक्कम (फंड) खर्च करण्यांत आली.

**रस्ते:** लोकल बोर्डानें आतापर्यंत स्वतःच्या पैशांतून व सरकारनें दिलेल्या मदतीमधून रस्ते व पूल या संबंधीचीं पुढील कामें पार पाडलीं आहेत.

विरार–अर्नाळा रस्त्याचें डांबरीकरण
भाटासा पूल, ( शहापूर तालुका )
बोर्डी–झाई पूल, ( डहाणू तालुका )
धासई पूल – घासई उमरोळी रस्त्यावर, ( मुरबाड तालुका )
खापरी पूल – टोका वाडा– शिरोशी रस्त्यावर, ( मुरबाड तालूका )

घोयीपाडा पूल–कसारा–वाशाळे रस्त्यावर, ( शहापूर तालुका )

कोल्ही पूल, ( वसई तालूका )

वामगांव–चिंचणी रस्त्यावर फरशी

वर दिलेल्या कामाखेरीज किरकोळ रस्त्यांचीं अनेक कामें पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत पूर्ण करण्यांत आलीं.

पूर्वीच्या जव्हार संस्थानी भागांत सात नव्या चावड्या बांधण्याचें काम जिल्हा बोर्डाकडे सोपविण्यांत आलें होतें. त्यांपैकीं पांच चावड्या १९५६–५७ मध्यें पूर्ण करण्यांत आल्या. त्याकामीं रु. २५,६६७ खर्ची पडले. उरलेल्या दोन चावड्यांचें काम तीन ठिकाणीं **इमारती** खूप आंतील व बाजूच्या भागांत असल्यानें रद्द करण्यांत आलें.

**वाहतूक**

राष्ट्राच्या आर्थिक आणि सामाजिक विकासामध्यें वाहतूक आणि दळणवळण यांना फार महत्त्वाचें स्थान असल्यामुळें सरकारनें रस्ते बांधणी, रस्ते दुरुस्ती व पूल यासंबंधीचा कार्यक्रम हातीं घेतला आहे.

पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत पुढील रस्ते बांधणीचें काम हातीं घेण्यांत आलें.

**शेजवा–डोल खांब रस्ता :** हा रस्ता शहापूर तालूक्यांत असून त्याची लांबी दहा मैल आहे.

**मुरबाड-म्हासा-चिंचवाडी रस्ता :** हा दहा मैल लांबीचा रस्ता पुरा झाल्यावर ठाणें व कुलाबा हे जिल्हे जोडले जातील.

**वामगांव-रानशेत रस्ता :** हा रस्ता दहा मैल लांबीचा आहे. या प्रमुख रस्त्याखेरीज संजाण, डोंगरी रस्ता, उंबरगांव–झाई-रस्ता, सफाळें, मांडा, टेंबी रस्ता आदि रस्त्यांचीं कामेंही घेण्यांत आलीं. पहिल्या पंचवार्षिक योजनेंत सुरूं करण्यांत आलेलीं परंतु अपुरीं राहिलेलीं कामें दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत पूर्ण करण्यांत आलीं. याशिवाय कांहीं नव्या रस्त्यांचीं कामेंहि चालूं करण्यांत आलीं.

## खेड्यांतील जोडरस्त्यांची बांधणी व दुरुस्ती

हें काम स्थानिक संस्थांचें असून त्यासाठीं त्यांना मदत देण्यांत आली आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत या जिल्ह्यांत अनेक नवीन जोड रस्ते बांधण्यांत आले व जुन्यांची दुरुस्ती करण्यांत आली.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत हें काम चालूं ठेवून पुढें दिलेले रस्ते बांधण्यांत आले.

| रस्त्याचें नांव | लांबी (मैलांमध्यें) | अपेक्षित खर्च |
|---|---|---|
| **शिगांव रस्ता** | ५.१ | ०–८८ |
| **वठवा–माडगांव रस्ता** | २.१ | ०–४३ |

रस्ते बांधणीच्या योजनेंत नदी व नाले यावरील पूल बांधणीचाही समावेश करण्यांत आला. वर्ष-भर दळणवळण चालावे हा या योजनेचा हेतु आहे. पावसाळ्यांत पालघर, डहाणू हे तालुके जिल्ह्याच्या इतर भागापासून जवळ जवळ अलग पडतात. ही गोष्ट विचारांत घेऊन १९५० पासून पुलांच्या सहाय्यानें रस्ते एकमेकांना जोडण्याचें काम हातीं घेण्यांत आलें असून पुढील कामें पूर्ण करण्यांत आलीं आहेत.

| तपशील | काम सुरू झालें तें वर्ष | काम पूर्ण झालें तें वर्ष |
|---|---|---|
| मुंबई–अहमदाबाद रस्ता | | |
| तान्सा नदीवर पूल | १९४८ | १९५१ |
| तावा–तळाश्री रस्ता | १९५१ | १९५३ |
| वैतर्णा नदीवर पूल | १९५१ | १९५६ |
| पिंडल नदीवर पूल | | |
| भिवंडी–वाडा रस्ता | १९५१ | १९५६ |
| मुंबई–अहमदाबाद रस्ता | | |
| चिंचपाडा नाल्यावर पूल | १९५१ | १९५६ |
| सुर्यानदीवर पूल | | |
| तावा–तळाश्री रस्ता | | |
| सुसरी नाल्यावर पूल | १९५५ | १९५६ |

राज्य योजनेंत या कार्यक्रमाशिवाय मध्यवर्ती योजनेंतील राष्ट्रीय रस्त्यांच्या कार्यक्रमांत तावा-तळाश्री रस्त्याचें काम हातीं घेण्यांत आलें. सध्याचा राष्ट्रीय मार्ग (National high way) कासा अणि उदवा या गांवांच्या लांबून तळाश्रीकडे जातो. म्हणून तावा आणि तळाश्री यांना जोडणारा एक जवळचा रस्ता तयार करण्याचें काम सुरूं करण्यांत आलें. हा रस्ता आतां पूर्ण झाला आहे. सूर्या, गुलझरी, सुसरी कारंज-वीरा, हाळदपाडा आणि वारोळी या नद्यावरील पुलांचीं कामें ( बहुतांशीं ) पूर्ण झालीं आहेत.

रस्त्यांसंबंधीच्या मध्यवर्ती योजनेंत इस्टर्न एक्सप्रेस हायवेचें काम हातीं घेण्यांत येणार आहे. यांतील एक भाग सायन जंक्शन ते सायन ट्रॉम्बे रोड जंक्शनपर्यंत आहे.

मुंबईकडील वाढती वाहतूक ध्यानांत घेऊन मुंबई ते ठाणें असा एक इस्टर्न एक्सप्रेस हायवे नांवाचा स्वतंत्र रस्ता बांधण्यांत येत आहे. या रस्त्याच्या पहिल्या भागाचें काम १९५३ मध्यें सुरूं झालें.

**दळणवळणाचीं साधनें**

दळणवळणाच्या दृष्टीनें या जिल्ह्यांतील मोखाडा, वाडा, व जव्हार हे तालुकें सोडल्यास इतर सर्व तालुक्यांना रेल्वे वाहतुकीच्या सोयीचा चांगलाच फायदा मिळतो. तालुक्याचें मुख्य ठिकाणीं रेल्वे

स्टेशन असल्यामुळें पुढील तालुक्यांतील लोकांना मुंबई तर जवळ पडतेच पण वाहतुकीच्या दृष्टीनें सोयीचें पडते.

**डहाणू** – तालुक्याच्या मुख्य ठिकाणीं रेल्वे स्टेशन – डहाणू रोड
**ठाणें** – तालुक्याच्या मुख्य ठिकाणीं रेल्वे स्टेशन – ठाणें
**पालघर** – तालुक्याच्या मुख्य ठिकाणीं रेल्वे स्टेशन–पालघर
**वसअी** – तालुक्याच्या मुख्य ठिकाणीं रेल्वे स्टेशन–बसीन रोड
**कल्याण** – तालुक्याच्या मुख्य ठिकाणीं रेल्वे स्टेशन–कल्याण

इतर तालुक्यांच्या मुख्य ठिकाणीं जरी रेल्वे स्टेशन नसले तरी स्टेशनपर्यंत एस्. टी. नें अथवा टांग्यानें जातां येत असल्यानें त्यांनाही रेल्वेचा फायदा मिळतो. या गोष्टींचा फायदा खालील तालुक्यांना मिळतो.

**भिवंडी**–ठाण्यापासून तालुक्याचें ठिकाण केवळ दहा मैलावर असून दर तासाला एस्. टी. च्या बसची सोय आहे.

**शहापूर**–आसनगांव रे. स्टेशन पासून दीड मैलांवर तालुक्याचें ठिकाण असून टांग्याचा दर माणशी चार आणें आहे.

**मुरबाड–कल्याण**–रेल्वे स्टेशनपासून १८ मैलांवर तालुक्याचें ठिकाण असून दर तासाला एस्. टी. बसची सोय आहे.

वाडा, जव्हार आणि मोखाडा यांना जरी रेल्वेचा फायदा उपलब्ध नसला तरी मोखाड्याहून कसारा रेल्वे स्टेशनवर येऊन रेल्वे वहातुकीचा फायदा घेतां येतो. या तालुक्यांत व इतर सर्वत्र एस्. टी. ची वाहतूक अत्यंत वक्तशीर चालू असते. जिल्ह्यामध्यें एकंदर ९८ बसेस रोज धावतात.

एस्. टी. चे एकूण सात डेपो या जिल्ह्यांत असून २२ ठिकाणीं बस स्टँड आहेत. १५८६ फेऱ्या करून सबंध जिल्ह्यांतील वाहतुकींची सोय करण्याचें काम एस्. टी. कार्पोरेशन पार पाडते.

### जिल्ह्यांतील एस. टी. डेपो

वसई, भिवंडी, ठाणें, कल्याण, पालघर, अर्नाळा, जव्हार

### जिल्ह्यांतील एस. टी. चे स्टॅन्ड

खालील ठिकाणीं कॅन्टीन, शेड इ. सोयीं उपलब्ध आहेत.
वसई, भिवंडी, ठाणें, कल्याण, पालघर, जव्हार, खर्डी, वाडा, हाजिमलंग, वज्रेश्वरी.

## सहकारी चळवळ

कोकणांतील इतर जिल्ह्याप्रमाणें ठाणें जिल्हा आर्थिक दृष्टचा मागासलेला आहे. प्रदेश डोंगराळ असल्यानें पाऊस पुष्कळ असूनही वर्षांतून भाताचें फक्त एकच पीक निघतें. याशिवाय जमिनीचे लहान

लहान तुकडे पडलें असल्यानें प्रत्येक कुटुंबास पुरेशी जमीन मिळूं शकत नाहीं. अशा जिल्ह्यांतील जनतेच्या आर्थिक विकासासाठीं सहकारी चळवळीची कांस धरल्यावांचून गत्यंतर नाहीं.

ठाणें जिल्ह्यांत इ. स. १९११ सालीं सहकारी चळवळीची सुरुवात झाली. मुलकी अधिकाऱ्यांच्या प्रेरणेमुळें दोन शेतकी पतपेढ्या स्थापन झाल्या. इ. स. १९१३ साल हें ठाणें जिल्ह्याच्या सहकारी चळवळीच्या दृष्टीनें महत्त्वाचें ठरतें. त्या वर्षीं स्थापन झालेल्या मरोली, उंबरगांव व केळवा–माहीम या संस्था आदर्श काम करीत आहेत. इ. स. १९१२ ते १९३० सालापर्यंत सहकारी चळवळीची ठाणें जिल्ह्यांत चांगलीच वाढ झाली. १९२० ते १९३० या कालांत सभासदांची संख्या बरीच वाढली.

**सहकारी चळवळीचा प्रारंभ**

जंगल विभागांत राहणाऱ्या आदिवासींची आर्थिक स्थिति विशेष चांगली नसल्यामुळें शेतीच्या कामाच्या दिवसांत खावटीसाठीं लागणारें धान्य त्यांना सावकाराकडून दामदुप्पट पद्धतीनें आणावें लागे. त्यांत त्यांचें बरेंच नुकसान होई. म्हणून सहकारी पद्धतीवर धान्यकोठारें काढून त्यामार्फत त्यांना कमी दरानें धान्य देण्याची व्यवस्था जिल्ह्यांत अनेक ठिकाणीं करण्यांत आली आहे.

ठाणें जिल्ह्यांतील मुख्य उत्पन्न भाताचें. त्याच्यावर नियंत्रण नसल्यानें खरेदी–विक्री संस्थांना वाव नव्हता. परंतु आतां भातावर नियंत्रण बसविण्यांत आल्यामुळें खरेदी–विक्री संस्थांच्या कार्यास चालना मिळूं लागली आहे. शेतीच्या मालाची कमिशनवर विक्री करणें, शेतकऱ्याना पिकें घेण्याकरितां लागणारी मदत देणें, उत्पादन केलेल्या मालावर कर्ज देणें इत्यादि महत्त्वाचीं कामें ह्या संस्थांमार्फत केलीं जातात. मध्यस्थाऐवजी हें काम सहकारी संस्थांनीं केल्यास त्यापासून होणारा नफा अखेर शेतकऱ्यांच्या पदरांतच पडतो. अशा तऱ्हेच्या आठ संस्था जिल्ह्यांत कार्य करीत आहेत.

ग्रामीण भागांतील शेतकऱ्यांस लागणारे बीं– बियाणें, पेंड, खतें, निरनिराळा लोखंडी माल, सुधारलेलीं अवजारें, चांगल्या जातीचीं जनावरें इत्यादींचा पुरवठा करणें, शेतकऱ्यांच्या माहितींत भर घालण्यासाठीं प्रदर्शन भरविणें, चढाओढ लावणें, शेतीसाठीं उपयुक्त जोडधंदा काढणें, इत्यादि बाबतींत ग्रामीण विभागाचा विकास करण्यासाठीं तालुका निहाय मंडळें स्थापन करण्यांत आलीं आहेत. ठाणें जिल्ह्यांत अशीं दहा मंडळें आज काम करीत आहेत.

ठाणें जिल्ह्याच्या पश्चिम किनारपट्टीवरील प्रदेश विस्तीर्ण गवताळ कुरणांसाठीं प्रसिद्ध आहे. या भागांत गवत उत्पादन करणाऱ्या एकूण ५६६ संस्था आहेत. येथें मोठ्या प्रमाणावर दूध उत्पादन होतें.

जमिनीचे लहान-लहान तुकडे पाडल्यास शेती किफायतशीर होऊं शकत नाहीं. कारण सुधारलेल्या पद्धतीचा अवलंब करतां येत नाहीं व त्यामुळें शेती करूनहि योग्य मोबदला मिळत नाहीं. त्यासाठीं कांहीं किमान आकाराची जमीन कसण्यास घेतल्यांशिवाय शेती किफायतशीर होत नाहीं. यासाठीं सहकारी शेती संस्था स्थापन करण्यांत येत आहेत. अशा प्रकारच्या १७ संस्था जिल्ह्यांत आहेत.

**सहकारी शेती संस्थां**

ठाणें जिल्ह्याच्या पश्चिमेस अफाट अरबी समुद्र पसरलेला आहे. याशिवाय इतर अनेक खाड्याही आहेत. त्यामुळें भातशेती प्रमाणें मासेमारीचा व्यवसायहि ह्या जिल्ह्यांत मोठ्या प्रमाणावर चालतो. सुमारें एक लाख लोक या व्यवसायांत गुंतले आहेत.

मासेमारी व्यवसाय म्हटला म्हणजे तुफानी वारे, सोसाटयाची वादळी हवा, कडकडीत थंडी, सूर्याची प्रखर उष्णता तर कधी, धो-धो पाऊस, हीं संकटें आलीच. प्राचीन काळपासूनच हा व्यवसाय सहकारी पद्धतीनें सुरू आहे. साधारणपणें एका गलबतांत सहा ते ११पर्यंत कोळी असतात. १९४५ सालापर्यंत माश्यांची दलालामार्फत विक्री होत असे. त्यामुळें कोळ्यांची स्थिती हलाखीची होती. इ. स. १९४८ साली मुंबई येथें मासळी विक्रीची मध्यवर्ती संस्था स्थापन झाली. त्यामुळें या व्यवसायांत एक महत्त्वाचा बदल झाला.

**मत्स्यसंवर्धन**

ठाणें जिल्ह्यांत २८ मत्स्यसंवर्धन संस्था असून सातपाटी विविध कार्यकारी संस्थेनें जहाजें बांधण्याचा कारखाना सुरू केला आहे. आजपर्यंत या संस्थेनें सुमारे १३५ बोटी बांधून पूर्ण केल्या. सातपाटी येथील दुसऱ्या एका संस्थेनें एक शीतगृह बांधून बर्फ तयार करण्याचें काम चालविलें आहे.

**बेटींची बांधणी**

भात हें प्रमुख पीक असल्यानें जिल्ह्यांत भिवंडी, वासिंद, केळवा, माहीम, तळाश्री येथें भाताच्या गिरण्या सहकारी तत्त्वावर चालतात. वसई, मोखाडा, वाणगांव-लासा व बदलापूर येथें लवकरच भाताच्या सहकारी गिरण्या सुरू होत आहेत.

सहकारी संस्थांच्या मालकीचीं १५ गुदामें आहेत. त्यांत धान्य साठवून चांगला भाव येतांच तें विकून शेतकऱ्यांना योग्य भाव मिळविता येतो.

ठाणें जिल्ह्यांतील सहकारी संस्थांना पैसे पुरविणारी स्वतंत्र अशी संस्था नव्हती. त्यावेळीं जिल्ह्यांतील सर्व सहकारी संस्थाना राज्य सहकारी बँकेवर अवलंबून राहावे लागत असें. १९३८ साली मात्र जिल्हा मध्यवर्ती बँकेची स्थापना झाली.

सहकारी संस्थांचें रूपांतर सेवा सहकारी संस्थांत केल्यामुळें आतां १८२ सेवा सहकारी संस्था निघाल्या आहेत.

जिल्ह्यांतील सहकारी संस्थांचें खेळतें भांडवल एक कोटी १२ लक्ष रुपयांवर असून तीन कोटी रुपयांची उलाढाल होते. तीन तालुक्यांत जपानी भात शेती पद्धति सुरू असून त्यानुसार एकरीं १२५ रु. याप्रमाणें कर्जपुरवठा होत आहे. त्यामुळें भाताच्या उत्पादनांत बरीच वाढ होत आहे.

## जिल्ह्यांतील सहकारी संस्था

| | | |
|---|---|---|
| १ | जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक | १ |
| २ | शेतकी सहकारी पतपेढ्या | १४९ |
| ३ | विविध कार्यकारी सहकारी संस्था | ११५ |
| ४ | सेवा सहकारी संस्था | १८२ |
| ५ | मोठ्या आकाराच्या वि. कार्यकारी संस्था | १० |
| ६ | धान्य संस्था | १८४ |
| ७ | भू-तारण सहकारी बँक | १ |
| ८ | तालुका खरेदी विक्री संघ | ८ |
| ९ | खरेदी-विक्री सहकारी संस्था | २ |

| | | |
|---|---|---|
| १० | जिल्हा सहकारी मंडळ | १ |
| ११ | सहकारी भात गिरण्या | ४ |
| १२ | सहकारी शेती संस्था | १७ |
| १३ | तालुका विकास मंडळें | १० |
| १४ | दुग्धोपादन व्यवसाहिक संस्था | ५ |
| १५ | तालुका सहकारी नियंत्रण मंडळें | ९ |
| १६ | ग्राहक सहकारी संस्था | ६३ |
| १७ | नागरिक सहकारी संस्था | ३९ |
| १८ | मत्स्य व्यवसाय करणाऱ्या संस्था | २८ |
| १९ | सहकारी गृहमंडळें | ३२ |
| २० | ग्रामस्वराज्य सहकारी संस्था | ३ |
| २१ | शैक्षणिक , वाहतुक, विद्युत संस्था | ६ |
| २२ | औद्योगिक सहकारी संघ | १ |
| २३ | सहकारी विणकर संस्था | ३ |
| २४ | जंगल कामगार सहकारी संस्था | ४३ |
| २५ | अन्य औद्योगिक सहकारी संस्था | ७४ |
| २६ | अखिल भारतीय ताडगुळ सहकारी संस्था | १ |
| | एकूण | ९९० |

ठाणे जिल्ह्याच्या सहकारी चळवळीकडे दृष्टिक्षेप टाकला तर असे स्पष्ट दिसून येईल कीं, याकरितां जिल्ह्याचे दोन विभाग पाडले आहेत.पहिला विभाग जो बंदरपट्टी म्हणून ओळखला जातो, तेथें बसई, तालुक्यातील ग्राहक सहकारी संस्था, पालघर, डहाणू व तळाश्री तालुक्यांतील आदिवासी जंगल कामगार सहकारी संघ ह्यांचें जाळें पसरलेले दिसतें. या तीनही तालुक्यांत शेतकी पत पुरवठा संस्था काम करीत आहेत.

**सहकारी पत-पुरवठा**

सहकाराचा उगम हा शेतकी कर्जपुरवठ्यासाठींच झाला असें म्हटलें तर फारसे वावगे होणार नाहीं. त्या दृष्टीनें ह्या संस्थांनीं केलेली प्रगति अत्यंत महत्त्वाची ठरेल. खालील आंकडे हे पहिल्या व दुसऱ्या पंचवार्षिक योजना कालावधींत झालेली प्रगति दर्शवितात.

| | ३१-३-१९५१ | ३१-३-१९५३ | ३०-६-१९६० |
|---|---|---|---|
| सहकारी पतपेढ्या | ४०१ | ४३३ | ४५६ |
| सभासद | २३,३१७ | २३,४४५ | ३९,२३९ |
| भाग भांडवल | ६,५७,३७३ | ८,७८,८९६ | १४,६१,२२३ |
| गंगाजळी व इतर निधी | ४,३६,५४६ | ५,७७,९०८ | ५,९४,२१२ |
| बँक कर्ज | ७,५६,२५२ | ७,९१,६९८ | २०,४९,७३६ |
| खेळते भांडवल | २२,७५,११४ | २६,६४,३२० | ६८,८१,२४२ |


गुदाम
भात गिरणी
घोलवड
होट
वाडा
खुपरी
कुडूस
वासिंद
दुगाड
भिवंडी
पाडा
रायते

राज्य विभाजनामुळें उंबरगांव तालुक्यांतील सहकारी संस्था गुजरात राज्याकडे गेल्या. त्यानंतर कांहीं नवीन संस्था ह्याच काळांत अस्तित्वांत आल्या. ठाणे जिल्ह्यांत जिल्हा मध्यवर्ती बँकेनें १–४–५९ला प्रत्यक्ष कामाला सुरवात केली. ठाणे जिल्ह्यांतील पहिली सहकारी भाताची गिरणी वासिंद सोसायटीनें ह्याच वर्षी सुरू केली. आज अशा चार भात गिरण्या चालू आहेत. मच्छिमार सहकारी संघानें देखील ह्या काळांत बरीच प्रगति केली.

**भाताच्या सहकारी गिरण्या**

विशेषत: सातपाटी मच्छिमार संस्थेच्या जहाजें बांधण्याच्या कारखान्याचा उल्लेख करावयास हवा. जव्हार तालुक्यांतील धान्य सोसायटयांनीं केलेली प्रगति उल्लेखनीय आहे. ह्याच काळांतील वसई अर्नाळा प्रक्रिया सोसायटी व वसई पान मार्केटिंग सोसायटी यांचाही उल्लेख करणें आवश्यक आहे. वसई तालुक्यांतील तालुका पीपल्स कंझ्युमर्स सोसायटी व खुद्द ठाणें शहरांतील समर्थ कंझ्युमर्स सोसायटी त्याचप्रमाणें आजुबाजूच्या कारखान्यांतील नागरी पतपेढया व ग्राहक संस्था फार चांगल्या प्रकारें काम करीत आहेत.

इतर संस्थांनीं केलेली ही भरीव कामगिरी विचारांत घेतल्यास असें दिसून येतें कीं, शेतकी पतपुरवठा संस्थांची मात्र म्हणावी तशी प्रगति झालेली नाहीं. त्याला जिल्ह्यांतील डोंगराळ भाग, तेथील जनतेचें अज्ञान व शिक्षणाचा अभाव, ह्या तीन गोष्टी कारणीभूत आहेत. अशाहि परिस्थितींत आज ४७६ संस्था धान्य दुकानें व गुदामें बांधून आपल्या सभासदांना साह्य करीत आहेत. आजपर्यंत अशी २० गुदामें सहकारी संस्थांनीं बांधलीं.

१९५९–६० साली ठाणें जिल्हा भक्कम विकास योजनेसाठीं निवडला गेला. ह्या वर्षी सर्व तालुक्यास राष्ट्रीय विस्तार योजना लागू करण्यांत आली. त्यामुळें संस्थेच्या कार्याला व सहकारी चळवळीला एक निराळेच स्वरूप आलें.

**जिल्हा सहकारी बोर्ड**

सहकारी शिक्षणाचा प्रचार व प्रसार करण्यासाठीं ठाणें जिल्हा सहकारी बोर्ड १९४७ मध्यें स्थापन झालें. हें बोर्ड ठाणें जिल्हा सहकार समाचार नांवाचें त्रैमासिक प्रसिद्ध करते व जिल्ह्यांतील सहकारी चळवळ संघटित करण्याचा प्रयत्न करते.

जिल्ह्याचा बराचसा भाग डोंगराळ असून बहुतेक आदिवासी वस्तीचा आहे. डोंगराळ भागांत शेती हा उपधंदा असून जंगलांत काम करणें हा मुख्य धंदा आहे. ठाणें जिल्हा आदिवासी संघ या संस्थेच्या मार्गदर्शनाखालीं अनेक जंगल कामगार सहकारी संस्था काम करतात.

वसई व पालघर तालुक्यांत केळीं व विडयाचीं पानें यांचें उत्पन्न होतें. केळयांचा व्यापार मक्तेदारांच्या हातीं न राहतां, उत्पादकाला अधिकाधिक फायदा मिळावा म्हणून बागायतदार संस्था निघत आहेत. मध्यवर्ती बँकेच्या सहाय्यानें आपला आर्थिक व्यवहार सहकारी पद्धतीनें चालविण्याचा त्या प्रयत्न करीत आहेत. पालघर, वसई व डहाणू येथील बंदर पट्टींत मच्छिमार जमातीची मोठी लोकसंख्या आहे. तेथें मच्छिमार सोसायटया स्थापन झाल्या असून मासळी जतन करून ठेवण्याच्या उद्देशानें फ्रिझींग प्लँटस व आईस फॅक्टरी चालविण्यांत येतात. सहकारी पद्धतीनें बोटी बांधण्याचा व्यवसायहि चालतो.

लिफ्ट इरिगेशन शक्य असेल तेथें सुरू करून शेतकी संस्था स्थापण्याचा प्रयत्न सुरू आहे.

डहाणू तालुक्यांत दाबचरी येथें सरकार प्रणीत दूध योजना सुरूं होणार आहे. वसई, पालघर, तालुक्यांतून सरकारच्या वरळी योजनेस दूध पुरविण्याच्या दृष्टीनें कार्यकर्ते कामास लागले आहेत. तसेंच पालघर, डहाणू येथें खूप गवत होतें. परिस्थितीचा फायदा घेण्याच्या दृष्टीनें दूधउत्पादक संस्था काढावयास हव्यात. प्रत्येक तालुक्यांत एक तरी भाताची सहकारी गिरणी असावी ह्या दृष्टीनें केळवें–माहिम, वासिंद, भिवंडी याबरोबरच मुरबाड, शहापूर, डहाणू, सफाळा, तळाश्री, मोखाडा इत्यादि ठिकाणीं भाताच्या सहकारी गिरण्या काढण्याचे नेटाचे प्रयत्न चालू आहेत. भिवंडी येथील सहकारी विणकर सोसायटीचा कारभार वाढत आहे. जिल्ह्यांतील घाऊक व किरकोळ साखर वांटप सहकारी संस्था साखर वांटपाचें काम पार पाडीत आहेत. इंडियन ऑईल कंपनीचें डिसेल व केरोसिन विकण्याचें काम महाराष्ट्र राज्य सहकारी मार्केटिंग सोसायटी द्वारां करण्यांत येत आहे. तसेंच महाराष्ट्र राज्य सहकारी मार्केटिंग सोसायटीस सुमारें एक लाख मण भात विक्रीसाठीं पुरविण्याचें आश्वासन येथील सहकारी संस्थानीं व सहकारी भात गिरण्यांनीं दिलें आहे. नागरी सहकारी बँकांचें व्यवहार सुद्धां दुप्पट वाढले आहेत. सध्या ठाणें व कुलाबा जिल्ह्यांसाठीं एकच बँक काम करीत आहे.

**दूध योजना**

## सहकारी संस्थांना मिळणाऱ्या सवलती

पंचवार्षिक योजनेखालीं सहकारी विभागामार्फत ज्या प्रमुख योजना सध्या कार्यान्वित होत आहेत, त्या योजनान्वयें सहकारी संस्थांस पुढील प्रमाणें सवलती व मदत दिली जाते.

लहान आकारच्या शेतकी संस्थांना पहिल्या तीन वर्षासाठीं खेळत्या भांडवलाच्या अडीच टक्के किंवा प्रत्यक्ष झालेल्या तोटयाइतकी रक्कम सेक्रेटरीच्या पगाराकरितां सहाय्यार्थ मदत म्हणून मिळू शकते. या संस्था जर मागासलेल्या विभागांत असतील तर ही मदत पांच वर्षाकरितां दिली जाते.

**शेतकी पतवाढ योजना**

या संस्थांना सेक्रेटरीच्या पगाराकरितां पहिली तीन वर्षें ( प्रत्येक वेळी ) रु. ६०० सहाय्यार्थ मदत मिळते. तसेंच भाग भांडवलाकरितां संस्थेच्या भाग भांडवलाइतकी परंतु जास्तीत जास्त रु. १०,०००,०० एवढी रक्कम मिळू शकते.

या संस्थांना सेक्रेटरीच्या पगाराकरितां पहिली पांच वर्षें अनुक्रमें ५००, ३००, २०० व १०० रुपये मदत म्हणून मिळू शकतात.

मागासलेल्या लोकांना अन्नटंचाईच्या काळांत कर्जरूपानें धान्यपुरवठा करण्याकरितां विशिष्ट कार्यकारी सहकारी संस्थांमार्फत कर्ज दिलें जातें. या योजनेन्वयें प्रत्येक डेपोला धान्य खरेदी व तें सांठविण्यासाठीं कणगे तयार करण्याकरितां रुपये ५००० पर्यंत कर्ज मिळते.

**धान्य संस्था**

अशा संस्थामध्यें ज्या सहकारी संस्थांना सरकारी जमीन मिळाली आहे, त्यांना जमीन सुधारण्यासाठीं रु. २००० साह्यार्थ मदत व रु. ८००० पर्यंत कर्जही मिळतात. त्याचप्रमाणें खाजगी जमीन अस-

लेल्या संस्थानी फक्त साह्यार्थ मदत म्हणून रुपये २००० मिळतात. तसेंच सरकारी जमीन कसणाऱ्या

**सहकारी शेती संस्था** संस्थांना गुदामें बांधण्याकरितां रु. ५०० चें अनुदान मिळते. पहिली तीन वर्षे मॅनेजरच्या खर्चाकरितां दरमहा रु. १०० प्रमाणें अनुदान मिळतें. फक्त लायक संस्थांनाच ४००० रुपयापर्यंत भाग भांडवलाच्या स्वरूपांत मदत मिळते. त्याचप्रमाणें ज्या संस्थांची विशेष सुधारणा करण्यासाठीं निवड केली जाते, त्यांना पुढीलप्रमाणें कर्ज मिळू शकते.

शेती सुधारण्यासाठीं दर एकरीं रु. १०० व जास्तीत जास्त १०,०००,०० रु.

विहिरी खोदण्यासाठीं १०,०००,०० रु.

बांध–बंधारे व जमीन समपाळींत आणण्यासाठीं एकरीं ३० रु. व जास्तींत जास्त १००० रु.

पंपींग सेटस् बसविण्यासाठीं १५००० रु.

शेती, अवजारें व इतर साधनासाठीं १०,००० रु.

गुदामें व गोठे बांधण्यासाठीं ६००० रु.

इतर उद्योगधंद्यासाठीं २०,०००.०० रु.

**वीजपुरवठा संस्था**

या योजनेमध्यें सामाविष्ट असणाऱ्या संस्थांना पुढील प्रमाणें आर्थिक मदत मिळू शकते.

भांडवली खर्चाच्या $\frac{1}{2}$ इतकें कर्ज

भांडवली खर्चाच्या $\frac{1}{4}$ इतकें अनुदान

परंतु हें अनुदान व कर्ज शेतकऱ्यांना पाणीपुरवठा करण्याकरितां होणाऱ्या भांडवली खर्चासाठींच मिळते.

**पाणीपुरवठा संस्था**

या योजनेखालीं पाणीपुरवठा संस्थांना भांडवली खर्चाच्या ५० टक्के कर्ज व २५ टक्के अनुदान व खेळत्या भांडवलासाठीं भांडवली खर्चाच्या १५ टक्के मध्यम मुदतीचें कर्ज तसेंच सेक्रेटरीच्या पगारासाठीं पहिल्या वर्षी रु. ९०००, दुसऱ्या वर्षी व तिसऱ्या वर्षी ४५०० रु. याप्रमाणें अनुदान मिळते.

**प्रक्रिया संस्था**

या योजनेंतील संस्थांना सेक्रेटरीच्या पगाराबाबत पहिलीं पांच वर्षे प्रत्येकीं ३००० रु. साह्यार्थ मदत मिळते. तसेंच भाग भांडवलासाठीं पुढील प्रमाणेंच कर्जरूपानें मदत मिळते.

कापूस जिनींग ॲन्ड प्रेसिंग १५००० रु.
भात गिरणी २००,०० रु. पर्यंत

**मच्छिमारी सहकारी संस्था**

मच्छिमारी संस्थांची वाढ करण्याच्या योजनेनुसार सहकारी संस्थांना अनुदान व कर्ज देण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. या योजनेखालीं प्रत्येक संस्थेला मिळणारी मदत पुढीलप्रमाणें आहे.

सेक्रेटरीच्या पगारासाठीं पहिली दोन वर्षें ५०० रु. व तिसऱ्या वर्षी रु. २५०. प्रमाणें अनुदान मिळतें.

**सहकारी खरेदी-विक्री संस्था**

जिल्ह्यांत शेतकी मालाच्या खरेदी-विक्रीसाठीं संस्था स्थापन करावयाच्या आहेत. जुन्या मार्केटिंग व कापूस सहकारी विक्री सोसायटीचें किमान भांडवल ५०००० रु. ठरविण्यांत आलें असून यापैकीं ५१ टक्के रक्कम सरकारकडून कर्जरूपानें मिळते.

**गुदामें बांधण्यासाठीं कर्ज व मदत**

ठराविक पद्धतींच्या गुदामासाठीं खालीलप्रमाणें सरकारी कर्ज व मदत देण्यांत येत असते.

| गुदामाचे प्रकार | कर्ज रुपये | गुदामासाठीं मिळणारी मदत रुपये |
|---|---|---|
| मोठ्या आकाराचे | ३०,००० | १०,००० |
| मध्यम आकाराचे | ५,००० | ५,००० |
| लहान आकाराचे | ७,५०० | २,५०० |

**नोकरवर्गावरील खर्चासाठीं मदत**

खरेदी-विक्री संस्थांना अनुभवी व सुशिक्षित नोकरवर्ग नेमता यावा म्हणून नुकसानीत असलेल्या या संस्थांना नुकसानीच्या रकमेइतके व जास्तीत जास्त रुपये १००० याप्रमाणें पहिली तीन वर्षें अनुदान देण्याची योजना आखलेली आहे.

कमी उत्पन्नाच्या वर्गाकरितां घरबांधणीच्या योजनेखालीं प्रत्येक व्यक्तीस सरकारकडून जास्तीत जास्त घराच्या एकंदर खर्चाच्या ७० टक्के पण जास्तीत जास्त ८००० रु. इतकी रक्कम कर्ज म्हणून दिली जाते. सदर कर्ज पांच ते साडे-पांच दराच्या व्याजानें दिलें जातें व तें २५ वार्षिक हप्त्यानीं परत करावें लागतें.

**मागासलेल्या वर्गाकरितां घराची योजना**

ही योजना सहकारी घर बांधणारी संस्था यांनाच लागू आहे. योजनेनुसार सोसायटचांना कर्ज व मदत खालील प्रमाणें दिली जाते.

| | कर्ज | मदत | लोक वर्गणी |
|---|---|---|---|
| हरिजन | | २५% | २५% |
| आदिवासी | ३७½% | ३७½% | २५% |
| विमोचित जाती | ३७½% | २७½% | २५% |
| भटकी जमात | ५०% | २५% | २५% |

याशिवाय वरील योजनेखालीं, सभासद जर शेतकरी असेल तर गुरांचे गोठे बांधण्याकरितां १०० पर्यंत कर्ज व मदत मिळते. तसेंच घरें बांधून पूर्ण झाल्यावर पहिली दोन वर्षे प्रत्येक घरास दहा रु. व नंतर २३ वर्षेंपर्यंत पांच रुपये प्रमाणें खर्चाकरितां मदत दिली जाते. तसेंच घर बांधण्याकरितां लागणारी तांत्रिक मदत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून मोफत दिली जाते.

---

# वैद्यकीय सोयी आणि सार्वजनिक आरोग्य

महाराष्ट्र राज्यांत जनतेच्या आरोग्याची अत्यंत आस्थेनें काळजी घेण्यांत येते.

ठाणें जिल्ह्यांत पुढील सरकारी इस्पितळें व दवाखानें आहेत –

व्ही. एस्. सिव्हिल हॉस्पिटल, ठाणें
पी. एल. अढिया, कॉटेज हॉस्पिटल, डहाणू
पतंगशहा कॉटेज हॉस्पिटल, जव्हार
विक्रमगड दवाखाना, विक्रमगड
आशागढ दवाखाना, आशागढ
फिरता दवाखाना, जव्हार

याशिवाय फिरत्या दवाखान्यांचीहि व्यवस्था करण्यांत आली आहे.

फिरती गाडी– कासा
फिरती गाडी – शहापूर

याखेरीज वाकलपाडा येथेंहि अशा प्रकारचीं एक गाडी ठेवण्याची योजना आहे. या गाड्यांचा फायदा त्या त्या भागांत राहाणाऱ्या आदिवासींना व शेतकऱ्यांना होतो.

ठाणें जिल्हा लोकल बोर्डातर्फेंहि खेड्यांतून दवाखान्यांची सोय करण्यांत आली आहे.

जिल्हा पातळीवर काम पाहणाऱ्या आरोग्य अधिकाऱ्यांतर्फेंहि नागरिकांच्या आरोग्याची यथायोग्य काळजी घेतली जाते. ठाणें, जव्हार, वसई, डोंबिवली, अंबरनाथ, कल्याण, उल्हासनगर, भिवंडी या ठिकाणीं असलेल्या नगरपालिकांचा आरोग्य विभाग शहरांच्या आरोग्यासंबंधीं जागरूक असतो.

# आरोग्य-व्यवस्था


म्युन्सिपल दवाखाने
जिल्हा लोकल बोर्ड दवाखाने
आरोग्यकेंद्र
बाल-माता संगोपन केंद्र
कुटुंब नियोजन केंद्र
सिव्हिल हॉस्पिटल
कुष्टरोग इस्पितळ
साकरशेट
चिंचणी
जव्हार
मासवण
मोखाडा
पालघर
कै. माहीम
सफाळा
वाडा
कसारा
वज्रेश्वरी
वसई
शहापूर
भिवंडी
भाईंदर
ठाणे
कल्याण
अंबरनाथ
मुरबाड
धसई
डोंबिवली
गोवेली
बदलापूर
शिपला

ठाणें जिल्ह्यांत कुष्ठरोगाचें प्रमाण अधिक आढळते. त्यासाठीं वाडा येथें आरोग्य विभागातर्फें एक कुष्ठरोग नियंत्रण केन्द्रचालविण्यांत येते. वाडा गांवच्या आसपासच्या ९६ खेडयांना या केंद्राचा फायदा होतो. या केन्द्राचा फायदा जवळ जवळ ४४ हजार १९२ लोकांना मिळतो.

**कुष्ठ रोग नियंत्रण केंद्र**

डहाणू तालुक्यांतील वाणगांव, वसई तालुक्यांतील सोपारा, भिवंडी तालुक्यांतील अंजूर आणि पालघर या ठिकाणीं एस्. ई. टी. युनिटस ( पाहाणी, अध्ययन व उपचार ) चालविण्यांत येतात. डहाणू तालुक्यांत वडोळी येथें चालविल्या जाणाऱ्या खाजगी स्वरूपाच्या एस. ई. टी. युनिटला सरकारी मदत दिली जाते.

कल्याण नगरपालिकेतर्फे कुष्ठ रोग्यांवर औषधोपचार करणारें एक केंद्र चालविण्यांत येते. पालघर आरोग्य केंद्रहि आपल्या परिसरांतील लोकांची तपासणी करून कुष्ठरोग्यांवर यथायोग्य औषधोपचार करते.

**कुटुम्ब नियोजन केंद्रें**

या जिल्ह्यांत कुटुंब नियोजनाचा प्रचार चांगल्या प्रकारें होत आहे. जिल्ह्यात सहा कुटुंब नियोजन केंद्रें आहेत.

सरकारच्या आरोग्य विभागामार्फत मुरबाड तालुक्यांतील दहसी, शहापूर तालुक्यांत शहापूर व कसारा, मोखाडा तालुक्यांत साखरशेत आणि पालघर तालुक्यांत मासवण आणि पालघर या ठिकाणीं व ठाणें शहरांत कुटुंब नियोजन केंद्रें चालविलीं जातात. ठाणें नगरपालिकाहि अशा प्रकारचें एक केंद्र चालविते.

कुटुंब नियोजनाचा प्रचार खेडयापाडयांतून होत असून आदिवासी व शेतकरीहि स्वखुषीनें स्वत:वर शस्त्रक्रिया करून घेतात.

ज्यांचें मासिक उत्पन्न १५० रुपयांहून कमी आहे अशा प्रत्येक व्यक्तीस ही शस्त्रक्रिया करून घेतल्यास सरकारतर्फे वीस रुपये आणि शस्त्रक्रिया करणाऱ्या सर्जनला प्रत्येक व्यक्तीमागें ५ रुपये देण्यांत येतात.

**प्राथमिक आरोग्य केंद्रें**

ठाणें जिल्ह्यांत एकूण सहा प्राथमिक आरोग्य केंद्रें पुढील ठिकाणीं आहेत.

| | | |
|---|---|---|
| गोवेली | ता. | कल्याण |
| दसई | ,, | मुरबाड |
| कसारा | ,, | शहापूर |
| साखरशेत | ,, | मोखाडा-पेठा |
| मासवण | ,, | पालघर |
| पालघर | ,, | ,, |

यापैकीं कसारा प्राथमिक आरोग्य केंद्राची स्थापना नुकतीच झाली आहे. या सर्वच केंद्रांचा फायदा तेथाल गरीब ग्रामस्थांना होतो. या केंद्रामधून सर्व प्रकारचीं औषधें ठेवलेलीं असतात. रोग्याला आवश्यक वाटल्यास सिव्हिल हॉस्पिटलमध्यें पाठविण्यांत येते.

शहापूर येथील ॲम्ब्युलन्सचा फायदा गरीबांना मिळावा म्हणून सिव्हिल हॉस्पिटलपर्यंत गरीब रोग्यांना मोफत नेण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे.

आरोग्य विभागाची कोणतीहि योजना आंखण्यासाठीं वस्तुस्थितीला धरून असलेल्या आंकडे शास्त्रावरील माहिती फार आवश्यक असते. यामुळें जन्मसंख्या, मृत्युसंख्या, मृत्यूचीं कारणें वगैरेंची माहिती त्यापासून मिळते व त्यामुळें जनतेच्या आरोग्याची निगा राखण्याचा मार्ग आरोग्य विभागास सहजगत्या आंखतां येतो. गांवांतील पोलीस पाटील व मामलेदार यांच्यामार्फत ही माहिती आरोग्य विभागास मिळूं शकते. बऱ्याच वेळा जन्ममृत्यूची नोंद चुकीची होते अथवा अशा प्रकारची नोंद न होण्याचीहि शक्यता असते. त्यासाठीं जिल्ह्यांतील निरनिराळे देवी डॉक्टर, सॅनिटरी इन्स्पेक्टर हे पोलीस पाटीलांचीं रजिस्टरें तपासून त्यांना याबाबत मार्गदर्शन करतात.

**जन्ममृत्यूची नोंद**

कॉलरा, देवी यांसारख्या सांथीच्या रोगांना आळा घालण्यासाठीं आरोग्य विभाग सर्वतोपरी प्रयत्न करतें. अशा प्रकारच्या रोगांमुळें जनतेचें जीवित धोक्यांत येऊं नये यासाठीं सांथीच्या रोगाचीं लक्षणें दिसूं लागतांच त्यावरील उपायास प्रारंभ करण्यांत येतो.

**संसर्गजन्य रोगांचा प्रतिकार**

कॉलरा, देवी, विषमज्वर, कावीळ, नारू वगैरे सांथीचे रोग होऊं नयेत म्हणून आरोग्य विभाग काळजी घेतो.

जिल्ह्याच्या ठिकाणीं असलेल्या हॉस्पिटलमधून क्षयरोग्यांसाठीं जादा खाटांची व्यवस्था व्हावी म्हणून ठाणें येथील सिव्हिल हॉस्पिटलला जोडूनच एक टी. बी. क्लिनिक काढण्यांत आलें आहे. तेथें क्षयरोग्यांवर उपचार केले जातात व त्यांची काळजी घेतली जाते. याखेरीज उल्हासनगर टाऊनशिप नं. ३ हॉस्पिटलमध्यें ५० खाटा क्षयरोग्यांसाठीं राखून ठेवण्यांत आल्या आहेत.

**क्षयरोग**

राष्ट्रीय मलेरिया प्रतिबंधक योजनेखालीं या जिल्ह्यांत मलेरिया प्रतिबंधक मोहीम जोरानें सुरूं आहे. मलेरिया हा मानव जातीचा सर्वांत मोठा शत्रू असल्यामुळें १९५३ सालापासून भारत सरकारनें, राज्य सरकारांच्या मदतीनें ही योजना हातीं घेतली आहे. मलेरिया निर्मूलन योजनेची विभागीय कचेरी ठाणें येथें आहे. विभागीय अधिकाऱ्याच्या हाताखालीं ह्या जिल्ह्यासाठीं दोन अधिकारी नेमण्यांत आले आहेत. त्यांच्या कचेऱ्या पालघर व ठाणें या ठिकाणीं आहेत.

**मलेरिया निर्मूलन योजना**

या विभागामार्फत डी. डी. टी. चे फवारे मारणें व घरोघर जाऊन ताप आलेल्या लोकांची तपासणी करणें हीं कामें चालू आहेत. जिल्ह्यांतील ठाणें, कल्याण यांसारख्या नगरपालिकांच्या हद्दींत येणाऱ्या भागांखेरीज इतर सर्वत्र डी. डी. टी. फवारण्याचें काम हा विभाग पार पाडतो. नगरपालिकांच्या हद्दींत नगरपालिकेतर्फे हें काम पार पाडलें जातें. सरकार या नगरपालिकांना डी. डी. टी. चा मोफत पुरवठा करते.

पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत या जिल्ह्यामध्यें दोन लाख २५ हजार २५२ घरांत डी. डी. टी. फवारण्यांत आली. एक हजार ६६७ खेड्यांना मलेरिया पथकानें भेटीं दिल्या व नव हजार ९९६ रोग्यांवर उपचार केलें.

पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्यें पदव्युत्तर उमेदवारांना ग्रामीण विभागांतील आरोग्यासंबंधीचें शिक्षण देण्याची कांहींच सोय नव्हती. केवळ पुणें जिल्ह्यांतील शिरूर येथें नर्सेस, हेल्थ व्हिजिटर्स आणि मिडवाईफस यांना अशा प्रकारचें प्राथमिक शिक्षण देण्याची सोय होती.

**पालघर आरोग्य केंद्र**

आपल्या देशांतील ८५ टक्के लोक खेड्यांतून राहातात व खेड्यांत डॉक्टर्स आणि आरोग्यविषयक कार्य करणारे लोक यांची फार मोठी मागणी आहे. याकरतां या क्षेत्रांत काम करणाऱ्या लोकांना ग्रामीण विभागांतील आरोग्यासंबंधीं योग्य दृष्टि दणारें शिक्षण त्यांच्या शिक्षणकाळांत देणें जरूर आहे. त्याकरितां पालघर येथें एक आरोग्य केंद्र चालविण्यांत येतें. हें आरोग्यकेंद्र पुढीलप्रमाणें कामगिरी पार पाडतें.

**शिक्षणाचा कार्यक्रम**

ग्रामीण विभागांत वैद्यकीय पदवीधरांना दोन महिनें प्रत्यक्ष शिक्षण देणें. वैद्यकीय अधिकारी, एस्. एम्. पी. व ऑक्झिलरी हेल्थ विभागांतील नोकरवर्ग व ग्रामीण विभागांतील नर्सेस, हेल्थ व्हिजिटर्स, मिडवाईफ, सॅनिटरी इन्स्पेक्टर्स इत्यादींना ग्रामीण विभागांतील कामासंबंधीं शिक्षण देणें.

विशिष्ट विभागांतील ग्रामीण जनतेच्या आरोग्य सुधारणाच्या कार्यक्रममांत पुढील गोष्टींचा समावेश होतो.

**आरोग्य व्यवस्था**

यामध्यें पाणीपुरवठा, नाले, संडास, मुताऱ्या, घरयोजना, उपहारगृहें व बाजारांतील आरोग्य व्यवस्था, खेळत्या हवेची योजना व धूरविरहित चुलींची योजना यांचा समावेश होतो.

कॉलरा, प्लेग, देवी, विषमज्वर, हगवण इत्यादि साथींच्या रोगांवरील प्रतिबंधक उपाययोजना

बाळंतपणाची सोय. (यांत कुटुंब नियोजन या योजनांचा अंतर्भाव होतो. )

शाळेंतील आरोग्यव्यवस्था

सविस्तर अभ्यास व जरूर ती आंकडेवारी मिळविणें

जीवनसत्त्वाचा पुरवठा व प्रचार

सार्वजनिक आरोग्यविषयक शिक्षण व प्रचार

किरकोळ दुखण्यावरील उयचार

**ठाण्याचें मेंटल हॉस्पिटल**

येथील एन्. एम्. मेंटल हॉस्पिटलच्या हीरक महोत्सवानिमित्त आरोग्य मंत्री श्री. होमी जे. एच्. तल्यारखान ह्यांनीं सदर इस्पितळाच्या नव्या इमारतीचें नुकतेंच उद्घाटन केलें. ह्या इमारतीवर सरकारनें १२ लक्षाहून अधिक रुपये खर्च केले आहेत.

ह्या नव्या इमारतींत तीन मोठीं वसतिगृहें, दोन भोजनगृहें आणि रोग्यांसाठीं स्वतंत्र खोल्या यांची व्यवस्था करण्यांत आली आहे.

प्रत्येक वसतिगृहांत १५० रोग्यांची सोय असून त्यांत ३६ उन्मत्त रोग्यांसाठीं व्यवस्था आहे. अशा रीतीनें ह्या इस्पितळांत ५०० हून अधिक रोग्यांसाठीं सोय असून ही संस्था गेल्या ६० वर्षांपासून उत्कृष्ट कामगिरी बजावीत आहे.

सध्या देशांत ३३ मेंटल इस्पितळें असून त्यापैकीं चार महाराष्ट्रांत आहेत. त्यांत १५००० तें १७००० खाटांची सोय आहे. सध्यां देशांत सुमारें १० ते १५ लक्ष रोगी मानसिक विकृति जडलेले आहेत. महाराष्ट्रांतील इस्पितळांत ५००० रोगी असून त्यांच्यासाठीं राज्यातर्फे दरवर्षी जवळजवळ अर्धा कोटी रुपये खर्च करण्यांत येतात. तथापि, राज्यांतील अगर देशांतील सर्वच मानसिक विकृति जडलेल्या रोग्यांची इस्पितळांतून सोय होऊं शकत नाहीं. अशा परिस्थितींत शक्य तो रोग्यांवर इस्पितळाबाहेर उपचार करण्याची व्यवस्था करावयास हवी.

ठाणें येथील नरोत्तमदास माधवदास मेंटल हॉस्पिटल हें भारतांतील सर्वांत जुनें हॉस्पिटल असून मुंबईस तें जवळ आहे. या इस्पितळामुळें मुंबई शहराच्याच नव्हे तर ठाणें, नाशिक, कुलाबा, जळगांव, धुळें,

**संस्थेची कामगिरी**

परभणी व नांदेड या जिल्ह्यांच्या गरजाहि भागविल्या जातात.

ही संस्था सुरवातीस नरोत्तमदास माधवदास वेडयांचें उपचार केंद्र या नांवानें ओळखली जात असें. १९०१ मध्यें त्यावेळच्या मुंबई सरकारनें सुमारें चार लाख रुपये खर्च करून तें बांधलें. त्यापैकीं १.१[illegible] लाख रुपये कै. नरोत्तमदास माधवदास यांच्या पत्नी व मुलांनीं दिले.

सुरवातीस कुलाबा येथील वेडयांच्या उपचार केंद्रांतील रोगी या ठिकाणीं पाठविण्यांत आले. त्यानंतर कुलाब्याचें केंद्र बंद करण्यांत आलें. १९२२ पर्यन्त ठाण्याचे सिव्हिल सर्जन हेच मानसिक इस्पितळाच्या सुपरिंटेंडेंटचें काम पाहत असत.

१९२२ सालीं, वेडयांच्या उपचारासंबंधींच्या दृष्टिकोनांत झालेला बदल लक्षांत घेऊन वरील उपचार केंद्राचें नांव बदलून तें मानसिक उपचार इस्पितळ (मेंटल हास्पिटल) असें ठेवण्यांत आलें.

सुरुवातीस या इस्पितळांत सुमारें २०० रोगी होते. तथापि, रुग्णाइतांची संख्या १९४७ मध्यें हळूहळू ६०० इतकी वाढली. तदनंतर गेल्या कांही वर्षांमध्यें या रोग्यांच्या संख्येंत बरीच वाढ झाल्याचें खालील आंकडेवारीवरून दिसून येईल.

| १९५४ | १९५६ | १९५८ | १९६१ |
|---|---|---|---|
| ११९१ | १४४५ | १५७१ | १७६५ |

आज येथें ४४० खाटांची व्यवस्था असून त्याखेरीज ४३२ खाटा वाढविण्यांत आल्या आहेत

१९४६ मध्यें स्त्री–विभागामध्यें कांहीं अधिक वसतिगृहें बांधण्यांत आलीं. त्यामुळें त्या विभागांतील गर्दी कमी झाली. रोग्यांवर अधिक कार्यक्षमतेनें उपचार केले जावेत याकरितां १९५८ मध्यें अधिक नोकरवर्ग नेमण्यांत आला.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्यें प्रत्येकांत १४४ रुग्णाइतांचीं सोय होऊं शकेल अशीं तीन वसतिगृहें आणि दोन भोजनगृहें बांधण्यांत आलीं. पूर्वी असलेल्या दोन विभागांचें नूतनीकरण करण्यांत आलें. प्रत्येक

विभागांत ५२ रुग्णांची सोय होऊं शकेल अशा दोन नवीन विभागांचें बांधकाम चालू आहे. पाण्याच्या सोयींत सुधारणा करण्यांत आली असून रुग्णाइतांना नेण्यासाठीं एक मोटारगाडी पुरविण्यांत आली आहे.

**मनोरंजनाच्या सोयी**

मानसोपचार करणाऱ्या समाजसेवकांच्या दोन जागा निर्माण झाल्यापासून गेल्या कांहीं वर्षांत मनोरंजनाच्या सुखसोयींमध्यें वाढ झाली आहे.

रोग्यांकरितां ग्रंथालय, वाचनालय असून शिवाय त्यांना फुटबॉल, व्हॉलीबॉल, रिंगटेनिस, कॅरम, टेबलटेनिस. इ० मैदानी व बैठे खेळ खेळायला मिळतात. दररोज संध्याकाळीं रोगी एकत्र जमतात व गायन, खेळ इत्यादि कार्यक्रमांत भाग घेतात. दर पंधरा दिवसांनीं चित्रपट दाखविला जातो.

**उपचार पद्धति**

येथें इ. सी. टी. व इन्सुलिन थेरपी, ऑक्युपेशनल थेरपी यासारखे सर्व प्रकारचे उपचार रोग्यांवर केले जातात.

## वृत्तपत्रें

मुंबईपासून हा जिल्हा जवळ असल्यामुळें मुंबईचीं त्या दिवशीचीं वर्तमानपत्रें त्याच दिवशीं जिल्ह्यांत सर्वत्र येतात. त्यामुळें, जिल्ह्यांत दैनिक काढण्याचा प्रयत्न अद्याप झालेला नाहीं.

**सन्मित्र** — सन्मित्र नांवाचें एक साप्ताहिक गेलीं तेरा वर्षें ठाण्याहून दर शनिवारीं प्रसिद्ध होतें. १९४८ मध्यें सुरू झालेलें हें साप्ताहिक जिल्ह्यांत बरेंच लोकप्रिय आहे. श्री स. पां. जोशी आणि श्री शं. ना. लोठारे हे या साप्ताहिकाचे संपादक आहेत.

**प्रतियोगी** — १५ ऑगस्ट, १९५९ पासून ठाण्याहून श्री गो. धों. फडके यांच्या संपादकत्वाखालीं प्रतियोगी नांवाचें दुसरें एक साप्ताहिक दर गुरुवारीं प्रसिद्ध होतें. हेहि साप्ताहिक जिल्ह्यांत बरेंच लोकप्रिय आहे.

वरील दोन्ही साप्ताहिकें नाटय, कला, ललित वाङमय, जिल्ह्यांतील विविध घडामोडी, क्रीडा वगैरे विषयांचें संकलन करतात.

**लोकमार्ग** — कम्युनिस्ट पक्षाचा प्रचार करण्यासाठीं १ मे, १९६० पासून श्री. रमाकांत गुप्ते यांच्या संपादकत्वाखालीं 'लोकमार्ग' नांवाचें तिसरें एक साप्ताहिक ठाण्याहून दर रविवारीं प्रसिद्ध होतें.

**सहकार समाचार** — ठाणें जिल्हा सहकारी बोर्डातर्फें सहकार समाचार त्रैमासिक प्रसिद्ध करण्यांत येतें. श्री द. दा. काळे हे याचें संपादन करतात.

**अंबरनाथ** — अंबरनाथहून श्री. यशवंतराव एम. चव्हाण यांच्या संपादकत्वाखालीं अंबरनाथ पाक्षिक प्रसिद्ध होतें. हें पाक्षिकहि जिल्ह्यांत बरेंच लोकप्रिय आहे.

**दीपक** — जनसंघाचें मुखपत्र म्हणून कल्याणहून साप्ताहिक दीपक प्रसिद्ध होतें. केवळ कल्याण नगरपालिकेच्या सभांच्या वृत्तांसाठीं 'कल्याण नागरिक' हें एक वृत्तपत्र प्रसिद्ध होतें.

# उद्योगधंदे व कारखानें

आजचा महाराष्ट्र व्यापार व उद्योगधंदें या मार्गावर वेगानें प्रगति करीत आहे. ठाणें जिल्हाहि याबाबतींत आघाडीवर आहे.

मुंबईपासून ठाणें जिल्हा अत्यंत जवळ असल्यानें या जिल्ह्यांतील ठाणें, कल्याण, अंबरनाथ या ठिकाणीं कारखान्यांची उभारणी मोठ्या प्रमाणावर होत आहे.

या जिल्ह्यांतील लहानमोठ्या कारखान्यांची संख्या जवळजवळ साडेतीनशें आहे. त्यांत काम करणाऱ्या कामगारांची संख्या २४ हजारांच्या आसपास आहे.

ठाणें, कल्याण आणि अंबरनाथ या ठिकाणीं रेल्वे स्टेशन असल्यामुळें आणि हीं ठिकाणें मुंबई-पासून फारच थोड्या अंतरावर असल्यानें मुंबईहून अनेक लोक येथील कारखान्यांत कामासाठीं येतात. जिल्ह्यांतील लोकांनाहि या कारखान्यांचा फायदा मिळतो.

या ठिकाणीं असलेल्या निरनिराळ्या कारखान्यांतून गरम व सूती कापड, ब्लेडस् विजेचीं उपकारणें, कागद, पुठ्ठे, लोखंडी सामान, रासायनिक द्रव्यें, साबण, मोटारींचे इतर सुटे भाग, लांकडी सामान, घड्याळें, खिळें, लांकडाचीं खेळणीं, औषधें, दोरखंडें, हातमाग, आगपेट्या, रेडिओ, फाऊंटनपेन्स, बिस्किटें, पाव वगैरे अनेक वस्तु तयार होतात. त्याखेरीज जिल्ह्यांत अनेक ठिकाणीं कपडे रंगविण्याचे कारखानें असून बांगड्या तयार करण्याचा धंदाहि या जिल्ह्यांत बदलापूर येथें चालतो.

जिल्ह्यांतील या कारखान्यांपैकीं कांहीं महत्त्वाचे कारखाने पुढीलप्रमाणें आहेत.

| | |
|---|---|
| धरमसी मोरारजी केमिकल कं., लि. अंबरनाथ | रासायनिक द्रव्यें |
| पेपर प्रॉडक्टस् लि. ठाणें. | कागद |
| विम्को फॅक्टरी, अंबरनाथ | आगपेट्या |
| कलर केम लि. ठाणे | रंग |
| पनामा ब्लेडस् लि. ठाणें | ब्लेडस् |

| | |
|---|---|
| स्वस्तिक मेटल वर्क्स, ठाणें | धातूचीं उपकरणें, लांकडी खेळणीं इ० |
| वेस्टर्न इंडिया वॉच कं. अंबरनाथ | घड्याळें |
| रेमंड वुलन मिल्स लि, ठाणें | गरम व सुती कपडे |
| कॅसल वुलन मिल्स लि., ठाणें | गरम कापड |
| वायर नेटिंग फॅक्टरी लि., ठाणें | जाळी व तारा |
| रेनबो पेन प्रॉडक्टस्, वसई | फाऊंटनपेन्स |
| बेहरेझ इन्डस्ट्रीअल वर्क्स, डहाणू रोड | मशिन्स |
| वॅको रेडिओ लि., उल्हासनगर | रेडिओ |
| हंस स्टील इंडस्ट्रीज, ठाणें | मशिन्स |
| नॉर्दर्न इंडिया स्टील इंडस्ट्रीज, ठाणें | लोखंडी सामान |
| कॅझल इंडस्ट्रीज, भायंदर | प्लॅस्टिकच्या वस्तु |
| स्वस्तिक ऑपटिकल इंडस्ट्रीज् | चष्म्याचीं उपकरणें |
| अजंठा कूपर आर्टस् वर्क्स | विजेचीं उपकरणें |
| ऑटोझेम स्पेअर्स, डहाणू रोड | मोटारींचे सुटे भाग |
| कॅसळा मिल्स लि. ठाणें | गरम व सुती कपडे |
| अजंठा सिल्क मिल्स. लि, भिवंडी | सिल्क वगैरे |

**हातमागाचा धंदा**

ठाणें जिल्ह्यांत हातमागाचा धंदा भिवंडीला मोठ्या प्रमाणांत चालतो. या ठिकाणीं एकूण २,८५२ हातमाग असून एकूण २०६ लहानमोठे कारखानें विभंडी शहरांत आहेत. येथें उत्तम प्रकारच्या साड्या, गालीचे वगैरे तयार होतात. येथील विणकरांनीं स्थापन केलेल्या सहकारी सोसायट्यांमार्फत भिवंडी, कल्याण व पुणें येथें तीन विक्रीकेंन्द्रें चालविलीं जातात. कल्याण व वसई येथेंहि विणकरांची वस्ती असून हातमागाचें कापड काढलें जातें.

**विटांचे कारखाने**

कल्याणला विटा तयार करण्याचे कारखाने आहेत. कल्याण, भिवंडी या रस्त्याच्या नाक्यावर त्याचप्रमाणें कल्याणकडे शिळफाट्याकडून येणाऱ्या रस्त्याच्या नाक्यावर विटांच्या कारखान्यांचें जाळें पसरलेलें दिसतें.

सातपाटी या ठिकाणीं मचवे दुरुस्त करण्याचा एक कारखाना सहकारी पद्धतीवर उभारण्यांत आला असून इंजिनमध्यें आकस्मिकपणें कांहीं यांत्रिक बिघाड झाल्यास त्याची दुरुस्ती करण्यांत येते.

**ग्रामोद्योग बोर्ड कचेरी**

बोर्डी येथें मुंबई ग्रामोद्योग बोर्डाची कचेरी आहे. त्याच्या मार्गदर्शनाखालीं जिल्ह्यांत खादी, ताडगूळ, मधुमक्षिकापालन, कागद, मीठ, तेलघाणी, लाख, तूप, खडू, हातसडी तांदूळ, इत्यादि ग्रामोद्योग चालतात. सालीना बारा लाख रुपयांचीं या बोर्डाला मदत मिळते.

**मासेमारी**

वसई, पालघर व डहाणू या तालुक्यांतील समुद्रालगतच्या गांवांतून मासेमारीचा व्यवसाय मोठ्या प्रमाणावर चालतो. हीं ठिकाणें मोटार रस्त्यानें पश्चिम रेल्वेस जोडलेलीं असल्यानें तेथें पकडण्यांत येणारी मासळी मुंबईस पाठविणें सुलभ झालें आहे. हा धंदा सुधारण्याच्या योजनेंत मुख्यत्वें मासेमारीच्या धंद्याचें आधुनिकीकरण करणें, मचव्यांना इंजिनें बसविणें, जलद-रीत्या होणाऱ्या वाहतुकीसाठीं साधनसामुग्री उपलब्ध करणें, शीत गृहाची योजना कार्यान्वित करणें व अंतर्गत जलसंचयांतील मासेमारीची सुधारणा करणें यांचा समावेश होतो.

ठाणें जिल्ह्यांतील कोळ्यांना मुंबई ही मोठी बाजारपेठ जवळ असल्यानें त्यांच्या मालास चांगला भाव येतो.

ठाणें जिल्ह्यांत मच्छिमार लोकांच्या १९ सहकारी सोसायटचा आहेत. त्यांची सभासद संख्या ११ हजार २०४ इतकी आहे. यावरून या जिल्ह्यांत हा व्यवसाय किती मोठ्या प्रमाणावर चालू आहे याची कल्पना येऊं शकेल. या सोसायटचांचें शेअर भांडवल एक लाख ६६ हजार ७७०रु. असून राखीव व इतर फंड एक लाख ७२ हजार ३४४ रु. आहे.

**सर्वोदय सहकारी संस्था**

सातपाटी येथील कोळ्यांच्या सर्वोदय सहकारी संस्थेनें बर्फाचा कारखाना व शितगृह देखील बांधलें आहे.

**काथ्याचा धंदा**

पश्चिम भागांतील लोक काथ्या व दोऱ्या वळण्याचा धंदा करतात. काथ्यापासून ते गाद्याहि बनवितात. हा भाग समुद्र सान्निध्यात असल्यामुळें समुद्राच्या किनाऱ्यावर नारळीचीं झाडें दुतर्फा पसरलेलीं दिसतात. त्यामुळें हे लोक नारळाचा धंदाहि करतात.

वारली व दुबळी लोक शिंदीच्या पातींच्या चटया विणतात. हा ह्या लोकांचा उन्हाळयाच्या दिवसांतला प्रमुख धंदा होय.

**फळबागा**

पश्चिम भागांत राहणारे लोक प्रामुख्यानें ख्रिश्चन व आगरी जमातीचे आढळतात. यांच्या घरां - भोंवतीं असलेल्या अंगणांत व मळ्यांत ते माड, केळी, चिकू, पानवेली, अळू, मुळा, वांगी, भेंडा, शिराळी, कोबी, नवलकोल या प्रकारचीं फळें व भाजीपाला,आणि लाल, बसराळ, वेलची, मुठचाळ अशा जातींची केळीं यांचें पीक काढून त्याचा व्यापार करतात. ह्या जिल्ह्यास मुंबई जवळ असल्यानें त्यांना ह्या धंद्यांत फायदा होतो.

**दुधाचा धंदा**

माळ रानांत धान्य पिकत नाहीं. त्या ठिकाणीं हे लोक गवत पिकवितात. तें चांगलें वाढवितात. कापून त्यांचे गठ्ठे बांधतात व हे गठ्ठे मुंबईस विक्रीस पाठवितात. गवत भरपूर असल्यामुळें या भागांत कांहीं लोक म्हशी पाळून दुधाचा व्यापार करतात.

पश्चिम भागांतील उपरोक्त लोकांच्या जेवणांत फक्त भात, वरण व तोंडी लावण्यास माशाचा तुकडा आढळतो.

**मासळीचें खत**

समुद्र किनाऱ्यावरील लोक प्रामुख्यानें मासेमारीवर उपजीविका करतात. बारीक मासळी वाळवून ती खतासाठीं विकण्याचा धंदाहि ते करतात. पावसाळ्यांत हे लोक होडयांना रंग देणें, जाळीं दुरुस्त करणें व नवीं जाळीं विणणें हीं कामें करतात. या भागांतील लोक सुतार कामहि करतात.

बर्फाचा कारखाना व चुन्याची भट्टी चालविणें हेहि धंदे ह्या भागांत चालतात.

मध्यपट्टींत ह्या जिल्ह्याचा जो भाग मोडतो, त्या भागांतील जमिनी फारशा कसदार आढळत नाहींत. या जमिनी शेण, झाडांच्या डहाळ्या, पातेरा व गवत घालून भाजतात. शिवाय शेत तीन चार वेळां नांगरतात. ह्या भागांत भाताचें पीक निघतें. डोंगर उतरणीवर नागली व वरी यांची शेतें आढळतात. ह्या भागांत विटांचे व आगपेटयांचे कारखाने आहेत.

डोंगराळ भागांतील लोक शिकारीवर जगतात. जंगलांत लांकूडतोड करणें, मध, हिरडा व डिंक गोळा करणें, खैरापासून काथ तयार करणें, बाभळीपासून कोळसा तयार करणें इत्यादि उद्योगधंदे

**येथील आदिवासी**

करून येथील आदिवासी आपला उदरनिर्वाह करतात. ते पावसाळ्यांत डोंगर माथ्या-वरील व उतरणीवरील शेतांत नागली, वरी, भात, कुळीथ, उडीद यांचीं पिकें काढतात. पिकांचें उत्पन्न फारच थोडें निघतें. त्यामुळें या भागांतील आदिवासींना बाराहि महिने राबावे लागते. जिल्ह्यांत चालणारे उद्योगधंदे पुढील प्रमाणें.

| | |
|---|---|
| सुतारकाम | सरोली, चिंचणी, वसई |
| गाड्या बांधणें | पापडी, गिरीज, पडघे, शहापूर, भिवंडी |
| दागिन्यांचे साचे | चिंचणी, तारापुर |
| आगपेट्या | अंबरनाथ |
| दगडाच्या खाणी | धारावी |
| तांदुळाच्या गिरण्या तयार करणें | भिवंडी, डहाणू |
| लोखंडी रहाट बनविणें | डहाणू |
| कांचेच्या बांगड्या | चिंचणी, तारापूर |
| विटा तयार करणें | टिटवाळा |
| चुना तयार करणें | सातपाटी व ठाणें तालुका |
| कापड | ठाणें येथील तुरुंगांत–कापड, सतरंज्या |
| लोकरीचें कापड | अंबरनाथ व ठाणें येथील गिरण्यांत |
| हातमागांवरील लुगडीं | भिवंडी, सोपारें, पापडी, शहापूर |
| सुकेळीं | आगाशी, वठार, कोपराड, वोळींज, वाघेली, वसई |
| नीरेपासून गूळ तयार करणें | डहाणू, कोसबाड |
| वुरूडकाम | घोलवड, बोर्डी, मासोली, सरावली |
| तांब्या पितळयाचीं भांडीं | सोपारा, वसई, भिवंडी, ठाणें, शहापूर |

## मिठागरें

या भागांत मासेमारीप्रमाणेंच मीठ तयार करण्याचा धंदा मोठ्या प्रमाणावर चालतो. वसई तालुक्यांत तर हा धंदा फारच मोठ्या प्रमाणावर चालतो. मीठ तयार करण्याचीं अनेक मिठागरें जागोजाग आढळतात.

**मिठागरें**

पश्चिम रेल्वेनें प्रवास करीत असतांना भायंदर रेल्वे स्टेशनपासून जिकडेतिकडे पांढऱ्या शुभ्र मिठाचीं भव्य आगरें नजरेस पडतात. हींच तीं मिठागरें होत.

वसई, भायंदर, जूचंद्र या ठिकाणीं मिठाचें उत्पन्न कित्येक लाख मणाचें होतें. गरीब आणि श्रीमंत या दोहोंना अत्यावश्यक असणारी ही वस्तु ठाणें जिल्ह्यांत विपुल प्रमाणांत तयार होते. मिठाचा खतासाठींहि फार उपयोग होतो.

वसई तालुक्यांतील जूचंद्र येथील मिठागर कामगार संस्थेनें मीठ उत्पादनाचा व्यवसाय सहकारी पद्धतीवर सुरू केला आहे.

# प्राचीन देवस्थानें, तीर्थयात्रेचीं, सहलीचीं व ऐतिहासिक ठिकाणें

उज्ज्वल परंपरा असलेल्या या जिल्ह्यांत सृष्टीसौंदर्यानें नटलेल्या भागांत अनेक सुंदर देवालयें व तीर्थयात्रेचीं ठिकाणें असल्यास नवल कसलें ?

ठाण्यापासून सुमारें २६ मैलांवर उल्हास नदीच्या कांठीं एका लहानशा डोंगरांत ' वज्राबाई ' देवीचें देऊळ आहे. वज्रेश्वरी हें गांव या डोंगराच्या पायथ्याशींच वसलेलें आहे. तें भिवंडी तालुक्यांत आहे.

**वज्रेश्वरी**

चैत्र अमावास्येस येथें मोठी जत्रा भरते. येथून जवळच अकलोली या गांवीं गरम पाण्याचीं कुंडें आहेत. तेथें आतां आरोग्य धामही बांधण्यांत आलेलें आहे. सरकार-तर्फे लवकरच एक जलोपचार केंद्र या ठिकाणीं सुरूं करण्यांत येणार आहे. येथें येण्या-साठीं वसई व ठाणें स्टेशनवर एस्. टी. ची. खास व्यवस्था आहे. वज्रेश्वरीजवळ ' गणेशपुरी ' येथेंही गरम पाण्याची कुंडे आहेत. येथें परमहंसस्वामी नित्यानंद यांचा आश्रम आहे. अनेक भाविक भक्त सुटीच्या दिवशीं समाधीच्या दर्शनास येतात. या ठिकाणीं ठाण्याहून अथवा वसईहून एस्. टी. नें जातां येतें.

कल्याणपासून अवघ्या २० मैलांवर मलंगच्या उंच डोंगरावर ' बाबा ' नांवाच्या सिद्ध मुसल-मान फकिराची कबर आहे. प्रतिवर्षी माघ पौर्णिमेस येथें मोठा उत्सव भरतो. हिंदु व मुसलमान या दोन्ही

**हाजिमलंग**

जमातींची दर्शनास प्रचंड गर्दी जमते. कल्याण स्टेशनवरून एस्. टी. नें जाण्याची व्यवस्था आहे. या ठिकाणीं कल्याणहून एस्. टी. नें जातां येते.

वसई, विरार सडकेवर वसईपासून फक्त तीन मैलांवर श्री शंकराचार्य यांची समाधि आहे. कार्तिक वद्य एकादशीपासून २६ दिवस येथें मोठी यात्रा भरते. या यात्रेस सुमारें दोन लाख लोक

**शंकराचार्य यांची समाधि**

जमतात. येथील गणपतीचें मंदिर व आसपासचा निसर्ग अत्यंत रमणीय व आल्हाददायक असा आहे.

**महालक्ष्मी** डहाणूपासून १७ मैलांवर महालक्ष्मीचें देऊळ असून त्या ठिकाणीं चैत्र शु० पौर्णिमेस आदिवासींची फार मोठी यात्रा भरते. यात्रेस सुमारें ५० हजार लोक जमतात. ही यात्रा २५ दिवस भरते. या ठिकाणीं वसई-हून एस्. टी. नें जातां येतें.

मुंबई—पुणें रस्त्यावर कल्याण तालुक्यांत अंबरनाथ या ठिकाणीं अकराव्या शतकांत बांधलेलें एक प्राचीन शिवालय आहे. या ठिकाणीं महाशिवरात्रीस मोठी यात्रा भरते. मध्ययुगीन शिल्पकलेचा हेमाड-

**अंबरनाथ**

पंती नमुना म्हणून हें मंदिर प्रसिद्ध आहे. अंबरनाथ हें रेल्वे स्टेशन आहे.

**क्वाड** संत सखाराम महाराज म्हणून एक मोठे सत्पुरुष या भागांत होऊन गेले. त्यांचा समाधीकाल १७८९ इ०. स. १८६७ असून भिवंडीपासून चार मैलांवर कवाड मुक्कामी त्यांची समाधि आहे. मार्गशीर्ष शु. पौर्णिमेस येथें मोठी यात्रा भरते. या ठिकाणीं ठाण्याहून एस्. टी. नें जातां येतें.

**कासगांव** मुरबाड तालुक्यांत धसई गांवापासून नऊ मैलांवर हें ठिकाण असून महाशिवरात्रीस येथें मोठी यात्रा भरते.

**म्हसे** सह्याद्रीच्या पायथ्यालगत मुरबाड पासून नऊ मैलांवर गुरांचा मोठा बाजार प्रतिवर्षीं पौष शु. पौर्णिमेस भरतो. सुमारें अर्धा लाख जातिवंत जनावरें पुणें, नगर, नासिक आणि ठाणें या जिल्ह्यांतून येतात. महाराष्ट्रांतील जनावरांच्या खरेदी–विक्रीचें हें एक प्रमुख ठिकाण मानतात. या ठिकाणीं मुरबाडहून टांग्यानें जावें लागतें.

**केळवे** पालघर तालुक्यांत निसर्गशोभेसाठीं प्रसिद्ध असलेल्या केळवे ह्या गांवीं शितला देवीचें मंदिर आहे. चैत्र शुद्ध पौर्णीमेस शितला देवीची जत्रा भरते. आसपासच्या खेड्यांतील अनेक कोळी भक्तिभावानें या ठिकाणीं जातात.

**भिवंडी**–दरवर्षीं एप्रिल महिन्यांत येथें निजामशहाचा मोठा उरुस भरतो. येथें ठाण्याहून एस्. टी. नें जातां येते.

**जूचन्द्र**–वसईजवळ चंडिका टेकडीवर चंडिका देवीचें देऊळ आहे. येथें चैत्र महिन्यांत यात्रा भरते.

**आतांणे**–सफाळे स्टेशनपासून दीड मैलांवर वैशाखी पौर्णीमेस येथें देवीची यात्रा भरते.

**वसईचा किल्ला** महाराष्ट्राच्या इतिहासांतील सुवर्णपान ज्या किल्ल्यानें व्यापलें आहे तो वसईचा भुईकोट किल्ला वसई स्टेशनपासून सुमारें तीन मैल अंतरावर आहे. याच्या तीन बाजूस पाणी व एक बाजूस जमीन आहे. आरमारीदृष्ट्या किल्ल्यास फारच महत्त्व होते. मराठ्यांच्या पराक्रमाचें भूषण म्हणून हा किल्ला अरबी समुद्रावर आजही डौलानें उभा आहे. शिंदे, होळकर, भिमराव राणोजी शितोळे, तुकोजी व जिवाजी पवार वगैरे मातब्बर मराठे सरदार चिमाजी अप्पाच्या सामर्थ्यशाली नेतृत्त्वाखालीं एकत्र झाले व पोर्तुगीजांशी मोठ्या शौर्यानें लढून अजिंक्य समजला जाणारा हा किल्ला १९ मे १६३९ रोजीं सर करून परकीयांचें वर्चस्व नष्ट केलें. परंतु दुर्दैवानें दुसऱ्या बाजीरावानें मराठी राज्याचें उदक इंग्रजांच्या हातावर सोडले व हा किल्ला इंग्रजांच्या ताब्यांत गेला.

**अर्नाळा** विरार स्थानकापासून चार मैलांवर अर्नाळाजवळ समुद्रांत बांधलेला हा किल्ला अत्यंत प्रेक्षणीय आहे. हा किल्ला गुजरातच्या सुलतान महमूद बेगडा यानें बांधला. इ. स. १५३० मध्यें पोर्तुगीजांनीं तो किल्ला सर केला. पुढें इ. स. १६३७ सालीं मराठ्यांनीं हा किल्ला जिंकून घेतला. सन १९३० सालीं ठाणें जिल्ह्याचा मीठाचा पहिला सत्याग्रह अर्नाळा गांवींच झाला.

**तारापूर** पश्चिम रेल्वेच्या बोयसर स्टेशनपासून सात मैलांवर तारापूरचा किल्ला आहे "तारापूर हें निम्मी वसई आहे." या मराठ्यांच्या उद्गारावरून वसईच्या मोहिमेंतील तारापूर किल्ल्याचें महत्त्व कळून येईल. इ. स. १६३९ च्या सुमारास बाजीराव रेठारेकर यानें हा किल्ला सर केला. पण स्वतः बाजीराव मात्र धारातीर्थी पडला. ह्याच तारापूर गांवीं भारतांतील पहिलें अणुशक्ति विद्युत्केन्द्र निर्माण होणार आहे.


किल्ले
देवस्थान
ॲटोमिक रिॲक्टर
गरम पाण्याचे झरे
महालक्ष्मी
तारापूर
अर्नाळा
निर्मळ
सोपारा
वसई
वज्रेश्वरी
अकलोली
गणेशपुरी
तानसा
तलाव
ठाणे
हाजीमलंग

येथील भुईकोट किल्ला पोर्तुगीजांनीं इ० स. १६३४ मध्यें बांधला व वसईच्या मोहिमेंत मराठ्यांनीं तो इ. स. १६३८ सालीं जिंकला. इ. स. १६६४ च्या डिसेंबर महिन्यांत इंग्रजांनीं ठाणें शहर ताब्यांत घेतले. अखेरपर्यंत तें त्यांच्या ताब्यांत होतें. येथील किल्ल्यांत त्रिबकजी डेंगळ्यास कैदेंत ठेवले होते. पण मोठ्या युक्तीनें इंग्रजांच्या हातावर तुरी देऊन तो पळून गेला. सदर्हू किल्ल्याचा उपयोग सरकारनें तुरुंगासाठीं केला आहे.

**ठाणें**

**अग्रेरी** पालघर तालुक्यांत मनोर-महालक्ष्मी सडकेवर हें ठिकाण आहे. प्राचीन काळीं तेथें एक गांव होतें. पण आतां तें ओसाड पडलें आहे. येथें डोंगरांतील लेणीं पाहाण्यासारखीं आहेत.

**कोंकणबेर** पालघरपासून आठ मैलांवर हें ठिकाण असून येथेंहीं गरम पाण्याचे झरे आहेत. प्रतिवर्षी महाशिवरात्रीस येथें मोठी यात्रा भरते.

**पारगांव** पालघर तालुक्यांतील सफाळें गांवापासून चार मैलांवर हें गांव असून येथें ब्रह्मीभूत मंगोजी राघोजी यांचीं पुण्यतिथी चैत्र महिन्यांत मोठ्या थाटानें साजरी होते.

**शहापूर** याचें येथून जवळच तीन मैलांवर माहुलीचा किल्ला असून त्यावर शिवरायाच्या वेळचें एक मंदिर आहे. त्यांत बाजीप्रभू वगैरे सरदारांच्या नांवाच्या घंटा आहेत.

**लोवाड** भिवंडी तालुक्यांत कल्याणपासून तीन मैलांवर हें ठिकाण असून येथील डोंगरांत लेणीं आहेत.

## गरम पाण्याचे झरे

भूकंपानें झालेल्या उलथापालथीमुळें ठाणें जिल्ह्याचा कांहीं भाग समुद्रांतून वर आला असावा. त्यामुळें कांहीं भागांत उष्ण पाण्याचे झरे आढळतात.

महत्त्वाच्या उष्ण पाण्याच्या झऱ्यांचीं ठिकाणें–

वज्रेश्वरी

अकलोली

गणेशपूरी

सावेर ( तालुका -पालघर-मनोर बंदरापासून तीन मैलांवर )

कोकणेर ( पालघरपासून आठ मैलांवर )

निंबवली ( ता. वाडा )

# येथील आदिवासी

भाद्रपद महिन्याचा शुक्ल पक्ष सुरू होतो आणि हळव्या जातीचे भाताचें पीक येऊ लागते. हिरव्यागार शेतांतील भाताचें पीक आनंदानें डोलूं लागले कीं, आदिवासींच्या आनंदाला उत्साहाचे भरते येतें. त्यांचा निरागस आनंद त्यांच्या सामुदायिक नृत्यांतून व्यक्त होतो. लांबलचक दुध्याभोपळ्यापासून तयार केलेल्या ' तारप्याच्या " रान दणाणून सोडणाऱ्या आवाजांत आदिवासींच्या नृत्याचा प्रारंभ होतो. मध्यम तारप्याला " घोघा " म्हणतात व मोठ्याला "सोंगाडा" म्हणतात.

**लोकनृत्य**

आश्विन पौर्णिमेपासून ते त्रिपुरी पौर्णिमेपर्यंत रोज रात्रीं आजुबाजूच्या परिसरांतील शेकडों आदिवासी स्त्री–पुरुष एकत्र जमतात आणि तन्मयतेनें ह्या नादब्रह्माशीं समरस होऊन जीवनांतील सारीं दुःखें क्षणभर विसरून जातात. तारपेवाला मधें उभा राहतो. भोंवताली पुरुषांचें गोल कडें असते. त्याच्या बाहेर स्त्रियांचें रिंगण असते. घुंगुराच्या ठेक्यावर सारे ताल धरतात. धरतीवर पाय आपटून लय वाढूं लागते आणि क्षणार्धांत ती लय पूर्णावस्थेला जाऊन पोहोचते. त्यांच्या त्या सहस्र पावलांची लयबद्ध हालचाल मोठी मनोवेधक असते.

भाद्रपदांतील पंधरवड्यांत द्वादशीच्या संध्याकाळीं या भागांतील हजारों आदिवासी स्त्री–पुरुष एकत्र जमतात. या हजारो स्त्री–पुरुषांच्या वागण्याबोलण्यांत आनंद व उत्साह ओसंडत असतो. तरीं पण कुठेंही अश्लिलतेचा मागमूस आढळून येत नाहीं. सारेजण निःसंकोचपणे, मनमोकळेपणानें वावरतात. सारी रात्र आनंद सागरांत डुंबतात. पण सारे कांहीं निरागसपणें, सद्‌भावनेनें चालते.

**वसतिस्थान**

सह्याद्रीच्या पश्चिम उतरणीवरील दऱ्याखोऱ्यांतील साग, परस, खैर, आंबा यांच्या घनदाट जंगलांची रम्य वनश्री हेंच आदिवासींचें वसतिस्थान. हिरवीगार वनराजी, डोंगरांतील सतत वाहणारे ओढे अशा निसर्गसंपन्न प्रदेशांत हे लोक राहतात.

नफ्यातोटयाच्या यांत्रिक जीवनाचा यांना अद्याप स्पर्श झालेला नाहीं. निसर्गाच्या सान्निध्यांतील स्वच्छंदी जीवनाचे अजूनही ते भोक्ते आहेत.

**वारल्यांचीं खेडीं**

वारली लोकांचीं खेडीं लहान व विखुरलेलीं असतात. त्यांच्या शेतजमिनी एकमेकांल। लागून असतात. दहा पंधरा झोपडयांच्या एकत्र वस्तीला " पाडा " म्हणतात. मात्र ही वस्ती अत्यंत स्वच्छ असते. जमिनी सारवलेल्या व नेहमी स्वच्छ असतात. जंगलांतील बांबू, पालापाचोळा यांच्यां सहाय्यानें त्यांच्या झोपड्या तयार होतात. झोपडीला बहुधा खिडकी नसते. झोपडीतच त्यांच्या शेळ्या, मेंढ्या आणि कोंबड्या असतात. झोपडीबाहेर तीन चार फूट उंचीच्या ओटयावर स्वच्छ पाण्याची मडकी असतात.

**त्यांचासंसार**

तीन दगड मांडून ह्यांची चूल तयार होते. बांबूच्या नळकांड्यांत त्यांचें तिखट मीठ राहतें. एखाद दुसरें अल्युमिनिअमचे पातेलें सोडल्यास बाकीचीं भांडीं मातीचीच असतात. बऱ्या स्थितींतील झोपडीच्या लहानशा माळ्यावर तूर, चवळी, नाचणी वगैरे धान्यें, चिंच व मीठ यासारखे जरूरीचे पदार्थ मडक्यांत किंवा टोपल्यांत भरून ठेवलेले असतात. पळसाच्या पानावर ते जेवतात व आपटयाच्या पानांचा बिड्यांसाठीं उपयोग करतात.

त्यांचा मुख्य आहार म्हणजे भात. पण तो पुरेसा नसल्यामुळें नाचणी-वरी दळून त्यांच्या पिठापासून आंबवून तयार केलेली कांजी ( आंबील ) हाच त्यांचा आहार. ते चिंचेचें किंवा चिंचेच्या पानांचें "आंबड" तयार करतात. त्यासाठीं चिंचेचा कोवळा पाला ते वाळवून ठेवतात. ओढ्यांतून पकडलेली ओली मासळी व इतर वेळेला सुकट बोंबील हेहि त्यांच्या खाण्यांत असतात. पावसाळ्याच्या प्रारंभी बांबूना कोवळे कोंब येतात. त्यांना "वासे" म्हणतात. वासे मिठांत घालून त्याचा लोणच्याप्रमाणें उपयोग करतात. उन्हाळ्यांत धान्यसांठा संपल्यावर कंदमुळें खातात. झोपडीच्या मागील बाजूस असलेल्या लहानशा जागेला कुंपण घालून ते फुलझाडें व भाजीपालाही लावतात.

**लोक व पोषाख**

वर्णानें हे लोक काळसर, शरीरानें सडपातळ व मध्यम बांध्याचे असतात. पुरुष कमरेभोंवतीं रुमाल गुंडाळतात व अंगांत डगला घालतात. तरुण मुलें भडक कपडे वापरतात व केसांचा भांग पाडतात. कानांत लांब देठाची फुलें अडकवून आपली श्रृंगाराची हौस भागवितात. स्त्रिया नऊ वारी लुगडी नेसतात. लहान मुलींनाही साडीच नेसवितात. बहुतेक लहान मुलें नग्नावस्थेंतच असतात.

इतर वन्य जातींप्रमाणें यांच्यांतहि महत्त्वाकांक्षेचा अभाव असतो. त्यामुळें जरुरीपेक्षां अधिक काम न करण्याची प्रवृत्तीच अधिक दिसून येते. अल्पसंतुष्टता हाहि त्यांचा दोष आहे.

**आदिवासींच्या उन्नतीचे प्रयत्न**

देशांतील सर्व भागांचा सर्वांगीण विकास करून त्या त्या भागांतील जनतेच्या राहणीचा दर्जा वाढविण्यासाठीं पंचवार्षिक योजनांचा कार्यक्रम हातीं घेण्यांत आला. पहिली व दुसरी पंचवार्षिक योजना देशानें पुरी केली असून तृतीय पंचवार्षिक योजनेच्या उंबरठ्यावर देश उभा आहे. निरनिराळ्या जिल्ह्यांच्या व भागांच्या गरजा लक्षांत घेऊन तयार करण्यांत आलेल्या या योजनांमुळें बहुसंख्य लोकांचा विकास साधला जात आहे.

**कष्टमय जीवन जगणारा आदिवासी**

आदिवासींसारख्या अत्यंत मागासलेल्या अशा जमातीलाहि या योजनांमुळें लाभ झाला आहे. अत्यंत कष्टमय जीवन जगणाऱ्या, दारिद्र्यानें गांजलेल्या व अन्नालाहि महाग झालेल्या ह्या जमातीकरितां पंचवार्षिक योजना हे एक वरदानच ठरलें आहे. अंधारांत चांचपडत असलेल्या, डोळे असून आंधळे ठरलेल्या या जमातीला पंचवार्षिक योजनांनीं प्रकाश दाखविला आहे. ज्यांच्या अंगावर लक्तरें नसत, ज्यांच्या मार्गावर दगड–धोंडे, कांटे या

खेरीज दुसरें कांहींच नसे अशा या दुर्दैवी जीवांना आतां या योजनांमुळें सुखी जीवन जगणें शक्य झालें आहे.

ठाणें जिल्ह्यांतील शहापूर, मोखाडा, जव्हार, डहाणू, तळाश्री महाल, आणि वाडा या सहा तालुक्यांत आदिवासींची वस्ती बहुसंख्येनें आहे. जिल्ह्याच्या ठाणें, मुरबाड, पालघर, वसई, भिवंडी, कल्याण या उरलेल्या सहा तालुक्यांतहि आदिवासींची तुरळक वस्ती आढळते.

**आदिवासींची वस्ती**

तळाश्री महाल या भागांतील आदिवासींच्या वस्तीचें प्रमाण लोकवस्तीच्या ९३ टक्के इतकें पडतें. मोखाडा महालमध्यें डहाण तालुक्यांत यांची वस्ती ६० टक्कें आहे. हें प्रमाण ८० टक्क्यांहून अधिक आहे. शहापूर तालुक्यांत आदिवासींची वस्ती ३३ टक्के इतकी आहे.

आदिवासींची वस्ती असलेल्या डहाणू तालुक्याच्या पूर्व भागांत सर्वोदय योजना लागू करण्यांत आली आहे. ह्या योजनेसाठीं कासा हे मध्यवर्ती केंद्र मानण्यांत आलें आहे. याच्या भोंवतालची ३४ खेडीं सोईस्कर अशा पांच गटांत विभागण्यांत आलीं आहेत. प्रत्येक गटामागें एक कार्यकर्ता नेमण्यांत आला आहे. ह्या ३४ खेड्यांची एकूण लोकसंख्या जवळजवळ २५ हजार इतकी आहे. त्यांत वारली, कोळी, कोकणे व कातकरी ह्या जमातींचा समावेश होतो. हा भाग डोंगराळ व जंगलव्याप्त आहे.

**सर्वोदय योजना**

ही योजना आचार्य भिसे यांच्यासारख्या कर्तव्यनिष्ठ, कार्यक्षम आणि ध्येयनिष्ठ कार्यकर्त्यांच्या देखरेखीखालीं राबविली जात आहे. या योजनेमुळें या भागांतल्या आदिवासींचा विकास घडून येत आहे.

पूर्वी ज्यांच्या अंगावर वस्त्राचा तुकडाहि आढळत नसे तेच आदिवासी आज सदरा–विजार घालतांना आढळून येतात. आदिवासी स्त्रियाहि पोषाखाच्या बाबतींत काळजी घेऊं लागल्या आहेत. आदिवासी जीवनाचा सर्वांगीण विकास साधण्याच्या दृष्टीनें सरकारची ही योजना फार कार्यक्षम ठरली आहे.

**सरकारची प्रभावी योजना**

या योजनेनुसार आदिवासींना बी–बियाणें व खतांचा पुरवठा २५ टक्के मदतीच्या शर्तीवर करण्यांत येतो. त्यामुळें आदिवासींना शेती करण्यास मदत होते. पूर्वी कंद मुळें खावून राहणारी ही जमात या योजनेमुळें शेती कसून व धान्य पिकवून स्वतःचा उदरनिर्वाह करीत आहे.

वाघाडी, वेती, घोळ व सारणी येथें आदिवासींच्या मुलांसाठीं स्वावलंबी छात्रालयें चालविण्यांत येतात. या छात्रालयांत एकूण ८२ मुलें आहेत. हीं सर्व मुलें नियमितपणें छात्रालयांत येतात. ती स्वतःचा शिधा घरून आणतात. या छात्रालयांत सर्वांना सूतकताइचें शिक्षण देण्यांत येतें. वाघाडी येथें मुलांसाठीं व कासा येथें मुलींसाठीं सर्वोदय योजनेमार्फत छात्रालयें चालविलीं जातात. सर्वोदय योजनेमार्फत संस्कार केंद्रेंहि चालविलीं जातात. छात्रालयांमुळें आदिवासींच्या मुलांवर देखरेख ठेवली जावून त्यांच्यावर चांगले संस्कार घडविले जातात. चांगल्या लोकांचा सहवास लाभल्यानें लहानपणापासून त्यांच्या मनांत आत्मविश्वास निर्माण होतो. आचार्य भिसे यांच्या सारख्या निष्ठावान कार्यकर्त्यांचें मार्गदर्शन लाभल्यानें त्यांच्या जीवनाला निश्चितपणें चांगलें वळण लागत आहे.

**आदिवासींच्या मुलांसाठीं छात्रालयें**

**सध्याची आणि पूर्वीची आदिवासी स्त्री** आदिवासीं स्त्रियांना पूर्वी आपल्या केसांची निगा कशी राखावी हें समजत नव्हते पण आतां त्या सुंदर कपडे घालून वेणींत विविध रंगाचीं फुलें माळून कपाळावर व्यवस्थित कुंकु लावून समाजांत वावरतांना दिसतात.

तलवाडा येथील आश्रमशाळेंत ७५ मुलें व ७५ मुलीं आहेत. त्यांचा अभ्यास नियमितपणें चालतो. ह्या शाळेचें वैशिष्ट्च म्हणजे या शाळेच्या आठ एकर जमिनींत आदिवासींच्या मुलांना शेतीचें शिक्षण देण्यांत येतें. लहानपणींच हें शिक्षण मिळाल्यामुळें पुढें त्यांना चांगलाच फायदा होतो.

**वाचनालयें** कासा येथील वाचनालयांत दैनिकें, साप्ताहिकें, मासिकें, पुस्तकें यांचा संग्रह आहे. लहानपणापासून मलांना वाचनाची गोडी लावण्यांत येत आहे.

लहान मुलांसाठीं सर्वोदय केंद्रामार्फत जें काम पार पडते त्याचा आदिवासींच्या जीवनावर अत्यंत चांगला प्रभाव पडला आहे. मुलांच्या सुखासाठीं अवरित श्रम करणाऱ्या या आदिवासींना आपल्या मुलांचा होत असलेला विकास पाहून अत्यंत समाधान वाटतें. गोठेघर, तळासरी महाल या ठिकाणींहि आदिवासींच्या मुलांसाठीं आश्रमशाळा चालविल्या जातात. पाल घर येथेंहि म. सेवा संघातर्फे आदिवासींसाठीं शाळा व वसाति गृह चालाविण्यांत येतें.

**आदिवासीसाठीं वसाहती** ज्या आदिवासींना वस्त्रें कशीं घालायची याचीं कल्पना नव्हती त्यांची घरें कशा प्रकारची असतील, याची कल्पना सहज करता येईल. म्हणून आपल्याप्रमाणें त्यांनाहि चांगल्या घरांत राहतां यावें याकरितां आदिवासींना घरें बांधून देण्यांत येतात.

शहापूर तालुक्यांत कोठरें या गांवीं ३४ घरांची व वाडा तालुक्यांतील मौजे-गोराड या गांवीं २३ घरांची अशा दोन वसाहती खास आदिवासींसाठीं बांधण्यांत आल्या आहेत.

**आरोग्यांकरितां सोयी** आदिवासींच्या आरोग्याची काळजीहि घेतली जाते. गांवोगांवीं फिरून रोग्यांना औषधें देण्यासाठीं महाराष्ट्र सरकारतर्फे औषधोपचाराच्या फिरत्या गाड्यांची व्यवस्था करण्यांत आली आहे. यांपैकीं एक गाडी कासा येथें व दुसरी शहापूर येथें ठेवण्यांत आली आहे. या गाडीचा फायदा आसपासच्या भागांतील आदिवासींना मिळतो. तलवाडा, कसारा, शिवाळी या आदिवासींच्या भागांत दवाखानें व प्राथमिक उपचार केंद्राची व्यवस्था करण्यांत आली आहे.

**सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारें विकास** दरवर्षी एप्रिल महिन्यांत डहाणू तालुक्यांत महालक्ष्मींची यात्रा भरते. या ठिकाणीं सुंदर प्रदर्शनें भरविण्यांत येतात. जंगल सोसायटयांचें, आदिवासी युवकांचें, महिलांचें व प्रगतिशील शेतकऱ्यांचें अशीं विविध शिबिरें घेण्यांत येतात. या यात्रेस आदिवासी मोठ्या संख्येनें येतात. या कार्यक्रमामुळें त्यांचा सांस्कृतिक विकास साधण्यास मदत होतें.

**मोखाडा महालांतील आदिवासी** मोखाडा महालाचा बहुतेक भाग खडकाळ व डोंगराळ आहे. या भागांत आदिवासींची वस्ती सर्वांत जास्त आहे. या महालाला विविधोद्देशी विकास गटांची योजना लागू करण्यांत आली आहे. या महालाचें एकूण क्षेत्रफळ १६२ चौरस मैल आहे. पण फक्त ४१ हजार २५० एकर जमिनींत पीक निघते. ६१ हजार ५०० एकर जमीन जंगलव्याप्त आहे. या भागांतील आदिवासींचें दरसाल दरमाणशीं उत्पन्न अवघें २० रु. इतकें पडते. त्यामुळें सरकारतर्फे या भागाची फारच काळजी घेतली जाते. त्यासाठीं एक विकास

अधिकारी नेमण्यांत आला आहे. या भागांतील आदिवासींचें राहाणीमान सुधारण्यासाठीं हा अधिकारी सदैव प्रयत्न करीत असतो.

**आदिवासींसाठीं सरकारी सवलती**

जव्हार, शहापूर, डहाणू व मोखाडा या तालुक्यांत आदिवासींची म्हणजेच वर्गीकृत जनजातींची वस्ती जास्त असल्यामुळें हे तालुके जिल्ह्यांतील वर्गीकृत प्रदेश म्हणून जाहीर करण्यांत आले आहेत. त्यामुळें या भागांतील आदिवासींना पुढील सोयी उपलब्ध झाल्या आहेत.

आदिवासींच्या मुलांना प्राथमिक शिक्षण मोफत देण्यांत येतें. त्यांना पुस्तकें, पाटचा, कपडे, मोफत देण्यांत येतात. त्यांच्यासाठीं खास शिष्यवृत्त्या ठेवण्यांत आल्या आहेत. दुय्यम शाळेचें शिक्षणहि त्यांना मोफत देण्यांत येतें. सरकारी नोकऱ्यांपैकीं वर्ग ३ व ४ या नोकऱ्यांमध्यें त्यांच्यासाठीं राखीव जागा असतात.

**आदिवासींच्या उत्कर्षाच्या योजना**

त्यांच्या कारागिरीस वाव मिळावा म्हणून त्यांना कारागिरीचें शिक्षणहि देण्यांत येतें. कष्टमय जीवन जगणाऱ्या या जमातीचा उत्कर्ष होईल, विकास होईल, त्यांचें दैनंदिन जीवन सुखी होईल, समृद्ध होईल असा प्रयत्न सरकारतर्फें करण्यांत येतो.

**विकास योजना**

तृतीय पंचवार्षिक योजनेच्या कार्यक्रमांत प्रत्येक २५ हजार आदिवासींच्या वसाहतीमागें एक विकास गट सुरू करण्याची सरकारची योजना आहे. या प्रत्येक गटासाठीं एकंदर २२ लक्ष रु. रक्कम मंजूर करण्यांत येईल. या रकमेपैकीं ५० टक्के रक्कम आदिवासींच्या आर्थिक उन्नतीसाठीं खर्च करण्यांत येईल. ही रक्कम खर्च करतांना शेती, उद्योगधंदे यासारख्या गरजेच्या गोष्टींवर अधिक प्रमाणांत खर्च करण्यांत येईल. रकमेची विभागणी करतांना आदिवासींच्या जीवनास स्थैर्य आणण्यावर भर देण्यांत येईल.

**कार्यकर्त्यांच्या सहकार्याची गरज**

आदिवासींचें दारिद्र्य शक्य तितक्या लवकर दूर करण्याच्या दृष्टीनें योजना आंखून व कायदे करून प्रयत्न करण्यांत येत आहे. पण दारिद्र्य कायद्यानें नष्ट होणार नाही. त्यासाठीं लोकांमध्यें विश्वास निर्माण करण्याची गरज आहे. ही कामगिरी यशस्वीपणें पार पाडण्यासाठीं सरकारला सार्वजनिक, कार्य करणाऱ्या जबाबदार कार्यकर्त्यांच्या सहकार्याची गरज आहे.

# कोणाकडे कशाची चौकशी करावी

| कामाचें नांव | संबंधित अधिकारी |
|---|---|
| लागवडीकरितां जमीन, तगाई, कर्ज लोखंड, सिमेंट | जिल्हाधिकारी व अध्यक्ष, जिल्हा विकास मंडळ ठाणें व तालुका पातळीवर तालुक्याचे मामलेदार |
| शेतीच्या सुधारलेल्या पद्धति, बियाणें, अवजारें आणि कीटकनाशक औषधें | जिल्हा शेतकी अधिकारी, ठाणें अथवा तालुका पातळीवरील संबंधित तालुक्याचे शेती अधिकारी |
| भातशेतीच्या सुधारलेल्या पद्धति बियाणें, अवजारें व खतासंबंधी | जिल्हा शेतकी अधिकारी, ठाणें |
| ४ खार जमिनींतील पिकाच्या लागवडीसंबंधी | खार जमीन संशोधन केंद्र, पनवेल |
| ५ उन्हाळी पिकांच्या लागवडीसंबंधी | जिल्हा शेतकी अधिकारी, ठाणें |
| ६ सुधारलेल्या जातींच्या फळझाडांची लागवड | फलोद्यान अधिकारी, पुणें १ |
| ७ पीक-स्पर्धा व प्रदर्शनें | जिल्हा विकास मंडळ, ठाणें |
| ८ जपानी भातशेती संबंधी माहिती | जिल्हा शेतकी अधिकारी, ठाणें |
| ९ सहकारी संस्थांची स्थापना, कार्यपद्धति व संस्कृति चळवळीसंबंधी माहिती | डेप्युटी रजिस्ट्रार, सहकारी, संस्था, ठाणें, किंवा तालुका पातळीवर विकास योजना क्षेत्रांतील सहकारी विभागाचे अधिकारी |
| १० शिक्षण संस्थांची स्थापना, कार्य आणि तत्संबंधी माहिती | जिल्हा शिक्षणाधिकारी, ठाणें |
| ११ प्राथमिक शिक्षण व तत्संबंधी माहिती | प्रशासक, जिल्हा शिक्षण मंडळ, ठाणें |
| १२ आर्थिक दृष्टीनें मागासलेल्या वर्गातील जनतेस मिळणाऱ्या शैक्षणिक सवलतीसंबंधी | समाज कल्याण अधिकारी, ठाणें |
| १३ रस्ते, पूल, पाटबंधाऱ्यांचें बांधकाम, दुरुस्ती व तत्संबंधीची माहिती | एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर, सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणें |
| १४ जनावरांचें संगोपन, त्यांच्या रोगांवरील उपाययोजना आणि कोंबडी पालन | जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी ठाणें |
| १५ ग्रामीण विभागांत ग्रामपंचायती, सहकारी संस्थांतून सामुदायिक रेडियो बसविणें | ग्रामीण रेडियो विभाग, ठाणें |

| कांमाचें नांव | संबंधित अधिकारी |
|---|---|
| १६ अस्पृश्य व मागासलेल्या वर्गातील जनतेला मिळणाऱ्या सहकारी सवलती, सहाय्य व सुखसोयींसंबंधी माहिती | जिल्हा समाज कल्याण अधिकारी, ठाणें |
| १७ सार्वजनिक आरोग्यसंवर्धन व उपचार व्यवस्था व सांथींचे रोग, प्रतिबंधक उपाय योजना | जिल्हा आरोग्याधिकारी, ठाणें |
| १८ मलेरिया निर्मूलन व डी. डी. टी. फवारण्यासंबंधीं | आरोग्याधिकारी ( मलेरिया निर्मूलन ), ठाणें |
| १९ विहिरी तलाव, रस्ते, शालागृहें आदींच्या स्थानिक विकास कार्यक्रमांतून होणाऱ्या कामासंबंधीं | जिल्हा विकास मंडळ, ठाणें |
| २० विकासगट क्षेत्रांतील विकास विषयक कामें. त्यांची कार्यपद्धति व त्यास मिळणाऱ्या मदतीसंबंधीं | संबंधित विकास गटाचे अधिकारी अथवा जिल्हा प्रकल्प अधिकारी, ठाणें |
| २१ सर्वोदय क्षेत्रांतील विकास कामें व त्यांची कार्यपद्धति | संचालक सर्वोदय केन्द्र, कासा, ता. डहाणू |
| २२ जिल्ह्यांतील पोलीस यंत्रणा व तत्संबंधी माहिती | जिल्हा पोलीस प्रमुख, ठाणें |
| २३ जंगलांचें संरक्षण व संवर्धन आणि तत्संबंधीचे नियम व माहिती | डिव्हिजनल फॉरेस्ट ऑफिसर, जव्हार, शहापूर ठाणें |
| २४ गावांत पोस्ट सुरूं करणें, टपालाची अथवा तारेची व्यवस्था किंवा टपाल व तारविभाग संबंधीची कार्यपद्धति व इतर माहिती. | सुपरिंटेंडेंट, पोस्ट ऑफिसेस, ठाणें |
| २५ एस्. टी. चे मार्ग, त्यांची कार्यपद्धति व तत्संबंधी माहिती | डिव्हिजनल मॅनेजर, स्टेट ट्रान्स्पोर्ट, ठाणें विभाग, ठाणें |
| २६ हौशी प्रवाश्यांचीं आकर्षणें व तत्संबंती माहिती | जिल्हा प्रसिद्धि अधिकारी, ठाणें |
| २७ ग्रामीण भागांत रस्ते, आरोग्य व पाणीपुरवठ्या संबंधी | जिल्हा लोकलबोर्ड, ठाणें |
| २८ नोकरी मिळवूइच्छिणाऱ्यांच्या नांव नोंदणीसंबंधीं | जिल्हा एम्प्लॉयमेंट एक्स्चेंज अधिकारी |
| २९ माजी सैनिकांच्या, त्यांच्या मुलाबाळांच्या व कुटुंबियांच्या हितसंबंधाचे प्रश्नासंबंधीं | जिल्हा माजी सैनिक मंडळ, ठाणें |
| ३० जिल्ह्यांतील विविध विभागांच्या योजनांची माहिती व त्यासंबंधीची प्रगति | जिल्हा प्रसिद्धि अधिकारी, ठाणें |
| ३१ अल्पबचत योजना व तत्संबंधीची कार्यपद्धति | राष्ट्रीय बचत अधिकारी, जिल्हाधिकारी कचेरी, ठाणें. |
| ३२ जिल्ह्यांतील विकासकामें व तत्संबंधी माहिती | जिल्हा विकास मंडळ, ठाणें |
| ३३ फॅक्टरी अॅक्ट संबंधी | [illegible] इन्स्पेक्टर, ठाणें |
| ३४ मरजुंची गाऱ्हाणीं, तक्रारी [illegible] | [illegible] लेबर ऑफिसर, ठाणें |

REFBK-0028954
REFBK-0028954